| १८ | श्री साईनाथ सगुणो (झरीन) आरती इंग्रजी आवृत्ती क्र.८ | ८००० | १२.९४ | - | - | - | - | २०.०० | २०.०० | ११५.०० | ११५.०० |
| १९ | श्री साईनाथ सगुणो.आरती गुजराथी आवृत्ती क्र.१६ | ६००० | ३.१२ | - | - | - | - | ८.०० | ८.०० | २०.०० | ११.०० |
| २० | श्री साईनाथ सगुणो-मराठी -आवृत्ती क्र.५२ | १००००० | २.८५ | - | - | - | - | ६.५० | ६.५० | ६.८० | ६.५० |
| २१ | श्री साईनाथ स्तवन मंजरी , हिंदी -आवृत्ती क्र.९ | ५०००० | २.९८ | - | - | - | - | ५.०० | ५.०० | १५.७५ | ६.०० |
| २२ | श्री साईनाथ स्तवन मंजरी , कन्नड -आवृत्ती क्र.४ | १३००० | २.४५ | - | - | - | - | ५.०० | ५.०० | १७.५० | १७.५० |
| २३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी , तेलगू -आवृत्ती क्र.३ | ३०००० | ३.२७ | - | - | - | - | ५.०० | ५.०० | १५.७५ | १५.७५ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | अर्वाचिन भक्त व संत लिलामृत (४ अध्याय)हिंदी आवृत्ती क्र.१ | २५०० | - | - | - | - | - | - | - | ८०.०० | ८०.०० |
| २५ | अर्वाचिन भक्त व संत लिलामृत (४ अध्याय)बंगाली आवृत्ती क्र.१ | २५०० | - | - | - | - | - | - | - | ८०.०० | ८०.०० |
| २६ | श्री साईबाबा चित्रावली मराठी/इंग्रजी आवृत्ती क्र.९ | १५००० | ५.५० | ६.३० | ६.३० | ५.३० | **५.३०** | ६०.०० | ६०.०० | १६.०० | १६.०० |
| २७ | रुद्राध्याय (११ वा अध्याय) आवृत्ती क्र.१६ | २०००० | २.३५ | - | - | - | - | १०.०० | १०.०० | १४.०० | १४.०० |
| २८ | साईबाबा थ्रीडी फोटो (फ्रिलिप) २.५ X ३.५ | ३०००० | ५.५० | - | - | - | - | - | - | - | - |

| अ.नं. | पुस्तकाचे/फोटोचे नांव | छपाई संख्या | मागिल छपाई दर | मे.जयंत प्रिंटरी,मुंबई | | मे.जॅस्मीन आर्ट प्रिंटर्स प्रा.लि.,मुबई | | मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि.,मुंबई | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ दर | वाटाघाटीतील दर | मुळ दर | वाटाघाटीतील दर | मुळ दर | वाटाघाटीतील दर |
| ०१ | श्री साई सतचरित्र, हिंदी - आवृत्ती क्र.२६ | १५०००० | ४१.०३ | ६६.४७ | ६६.४७ | ५४.१० | ५४.१० | ४९.२० | ४९.२० |
| ०२ | श्री साई सतचरित्र, इंग्रजी-आवृत्ती क्र.२४ | ६०००० | २३.३० | ५३.३३ | ५३.३३ | ४३.४० | ४३.४० | ३९.४० | ३९.४० |
| ०३ | श्री साई सतचरित्र, तेलगू-आवृत्ती क्र.२४ | १५०००० | ३७.३७ | ७०.४१ | ७०.४१ | ५७.५० | ५७.५० | ५२.२० | ५२.२० |
| ०४ | श्री साई सतचरित्र, कन्नड -आवृत्ती क्र.१७ | ४०००० | ४४.९५ | ७४.७५ | ७४.७५ | ६१.१० | ६१.१० | ५५.५० | ५५.५० |
| ०५ | श्री साई सतचरित्र, तामिळ-आवृत्ती क्र.१८ | ४०००० | ४५.१२ | ८४.४० | ८४.४० | ६८.९० | ६८.९० | ६२.४० | ६२.४० |
| ०६ | श्री साई सतचरित्र, मल्याळम-आवृत्ती क्र.२ | ७००० | ६३.५० | ८५.२६ | ८५.२६ | ६४.३० | ६४.३० | - | - |
| ०७ | श्री साई सतचरित्र, बंगाली-आवृत्ती क्र.५ | ३००० | ५१.२० | ९८.०६ | ९८.०६ | ७३.४० | ७३.४० | - | - |
| ०८ | श्री साईचे सत्यचरित्र ,तेलगू-आवृत्ती क्र.२ | ६००० | ७०.५० | १५६.७४ | **११७.००** | १५७.५० | १५७.५० | - | - |
| ०९ | मातृसाई,तेलगू-आवृत्ती क्र.४ | २०००० | २३.७९ | ५०.७० | ५०.७० | ४१.६० | **३५.००** | - | - |
| १० | श्री साई सतचरित्र - ओडीया आवृत्ती क्र.३ | २५००० | ३७.९३ | ६१.१५ | ६१.१५ | ४८.३० | ४८.३० | - | - |
| ११ | दैनंदिन साईबोध -मराठी आवृत्ती क्र.६ | ५००० | ७०.३० | १११.२८ | १११.२८ | ८३.५० | ८३.५० | - | - |
| १२ | खापर्डे डायरी -तामिळ आवृत्ती क्र.५ | ७००० | १३.६५ | २२.५५ | २२.५५ | २०.५० | २०.५० | - | - |
| १३ | मुलांचे साईबाबा मराठी -आवृत्ती क्र. ११ | ८००० | ३.७५ | १०.५२ | १०.५२ | ०६.३० | **६.३०** | - | - |
| १४ | मुलांचे साईबाबा हिंदी आवृत्ती क्र.११ | १०००० | ३.७३ | १०.२९ | १०.२९ | ०६.१० | **६.१०** | - | - |
| १५ | मुलांचे साईबाबा गुजराथी- आवृत्ती क्र.०८ | २००० | ४.८७ | १३.८५ | १३.८५ | ०८.८० | **०८.८०** | - | - |
| १६ | मुलांचे साईबाबा कन्नड आवृत्ती क्र.०७ | ७००० | ५.६२ | १२.०० | १२.०० | ०७.६० | **७.६०** | - | - |
| १७ | एक फकीर की पाठशाला हिंदी -आवृत्ती क्र.६ | १५००० | २५.०० | ३७.२० | ३७.२० | ३८.८० | ३८.८० | ४३.९० | ४३.९० |
| १८ | श्री साईनाथ सगुणो (झरीन) आरती इंग्रजी आवृत्ती क्र.८ | ८००० | १२.९४ | १७.१४ | **१५.३०** | १६.४० | १६.४० | - | - |
| १९ | श्री साईनाथ सगुणो.आरती गुजराथी आवृत्ती क्र.१६ | ६००० | ३.१२ | ४.८२ | ४.८२ | ०३.६० | **०३.६०** | - | - |
| २० | श्री साईनाथ सगुणो-मराठी -आवृत्ती क्र.५२ | १००००० | २.८५ | ५.५६ | **४.९५** | ०५.४० | ५.४० | - | - |
| २१ | श्री साईनाथ स्तवन मंजरी, हिंदी -आवृत्ती क्र.९ | ५०००० | २.९८ | ३.९८ | **२.९७** | ०३.१० | ०३.१० | - | - |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | श्री साईनाथ स्तवन मंजरी , कन्नड -आवृत्ती क्र.४ | १३००० | २.४५ | ४.०६ | ०४.०६ | ०२.९० | **०२.९०** | - | - |
| २३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी , तेलगू -आवृत्ती क्र.३ | ३०००० | ३.२७ | ४.७५ | ०४.७५ | ०३.३० | **०३.३०** | - | - |
| २४ | अर्वाचिन भक्त व संत लिलामृत (४ अध्याय)हिंदी आवृत्ती क्र.१ | २५०० | - | १२.३२ | १२.३२ | ११.५० | **११.५०** | - | - |
| २५ | अर्वाचिन भक्त व संत लिलामृत (४ अध्याय)बंगाली आवृत्ती क्र.१ | २५०० | - | १२.३२ | १२.३२ | ११.५० | **११.५०** | - | - |
| २६ | श्री साईबाबा चित्रावली मराठी/इंग्रजी आवृत्ती क्र.९ | १५००० | ५.५० | ०८.१२ | ०८.१२ | ०५.९० | ०५.९० | - | - |
| २७ | रुद्राध्याय (११ वा अध्याय) आवृत्ती क्र.१६ | २०००० | २.३५ | ३.७१ | ३.७१ | ०२.७० | **०२.७०** | - | - |
| २८ | साईबाबा थ्रीडी फोटो (फ्रिलिप) २.५ X ३.५ | ३०००० | ५.५० | ८.०० | ८.०० | - | - | ४.३० | **४.३०** |

**निर्णय क्र.३५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**(२) जे प्रेसधारक कार्यादेश दिल्यानंतर निम्नतम दराने छपाई करुन देणार नाहीत त्यांचा कार्यादेश रद्द करुन, सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी व सदर छपाईचे काम द्वितीय निम्नतम दरधारक करणेस तयार असल्यास त्यांचेकडून छपाई करुन घेण्यात यावी.**

**(३) छपाईसाठी समान दर असणा-या प्रेसधारकांना समप्रमाणात विभागुन कार्यादेश देणेत यावे.**

**(४) सिकंदराबाद येथे संस्थानचे माहिती केंद्र असल्याने मे.प्रिमेअर प्रेस,सिकंदराबाद यांची श्री साईचरित्र तेलगू या पुस्तकांची ५०,००० नग डिलिव्हरी सिकंदराबाद येथे घेणेत यावी.**

**(५) सदर छपाईकामी येणा-या एकूण रु. २,३०,१०,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग )

---

**विषय नं.१० सन २०१३-१४ करीता व्दारावती भक्तनिवास यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग कामासंबंधीचे प्राईस बीड उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ या वर्षात द्वारावती भक्तनिवास विभागाचे दैनंदिनी आवश्यक हाऊसकिपींग कामासाठी जाहिरात देऊन नविदा मागविण्यास संदर्भ क्र.०१ नुसार मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे.

हाऊसकिपींग कामासंबधी दि.१८/०२/२०१३ रोजी सार्वमत,देशदुत व दि.१९/०२/२०१३ रोजी केसरी या वर्तमान पत्रातुन जनसंपर्क कार्यालयामार्फत निविदा विक्रीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली.

निविदा विक्री दि.२०/०२/२०१३ ते दि.२६/०२/२०१३ अखेर कार्यालयाीन वेळेत होती. निविदा विक्री मुदतीत ०१ ते २० क्रमांकाच्या निविदापैकी अ.नं.९ ते १५ व १८ ते २० ह्या क्रमांकाच्या निविदा शिल्लक राहुन बाकी एकूण १० निविदा (मुंबई कार्यालयात ०२ व शिर्डी कार्यालयात ०८) विक्री झालेल्या आहेत.

सदर विक्री झालेल्या निविदा दि.०४/०३/२०१३ रोजी कार्यालयीन वेळेत मुंबई व शिर्डी कार्यालयात सिलबंद निविदा सादर करणे बाबत तशी प्रसिद्धी देण्यात आलेली होती.

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अ.नं.०१ ची निविदा शिर्डी कार्यालयात व अ.नं.०२ ची निविदा मुंबई कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा झालेल्या आहेत.

( शिर्डी व मुंबई कार्यालयात आलेल्या सिलबंद निविदेचा तपशिल.)

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदा जमा झाल्याचे ठिकाण | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे. | शिर्डी कार्यालय | १८५६५/०४.०३.२०१३ |
| २ | मे.न्युटेक जेटींग इक्युपमेन्टस इंडिया प्रा.लि.फरीदाबाद, हरियाणा | मुंबई कार्यालय | २११/०४.०३.२०१३ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तसेच खालील तक्त्यात दर्शविलेल्या निविदा मुदतीनंतर अनुक्रमे ०२ व ०४ दिवसाच्या अंतराने उशिरा शिर्डी कार्यालयात जमा झालेल्या आहेत. म्हणजेच १० निविदा विक्रीपैकी ०४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

(शिर्डी कार्यालयात मुदतीनंतर आलेल्या सिलबंद निविदेचा तपशिल.)

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदा जमा झाल्याचे ठिकाण | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.स्पेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. | शिर्डी कार्यालय | १८७६०/०७.०३.२०१३ |
| २ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे | शिर्डी कार्यालय | १८८८५/०९.०३.२०१३ |

निविदेतील अटी शर्ती ०२ मध्ये दोन लिफाफे पद्धतीने निविदा मागविण्यात येत असल्याचे नमुद केलेले आहे. लिफाफा नं.०१ मध्ये निविदेमधील टेक्नीकल बीडचे ०४ पाने व अटी शर्ती १६ नुसार इतर मागणी केलेले कागदपत्रे सादर करावे, तसेच निविदेतील पान नं.१९ कंपनी बाबतची माहिती सादर करावी. क्र.०१ चा लिफाफा प्रथम उघडुन त्यातील कागदपत्रे व बयाणा रक्कम मागणी प्रमाणे असल्यास तसेच कंपनी बाबतची दिलेली माहिती वरुन ७०% व त्यापेक्षा जास्त गुण मिळतील अशा कंपनीचे प्राईस बीड समक्ष उघडुन अशाच कंपनी प्रतिनिधींना चर्चा वाटाघाटीसाठी बोलविण्यात येईल. लिफाफा नं.०२ मध्ये निविदेमधील प्राईस बीडचे पान नं.२० सादर करावे असे नमुद केलेले आहे.

निविदाधारकांचे शंका अडी- अडचणीचे निरसन करणेकामी दि.२८/०२/२०१३ रोजी शिर्डी येथे प्री-बीड बैठक आयोजित केली होती.सदर बैठकीसाठी ०५ निविदाधारक उपस्थित होते.त्यावेळी त्यांना निविदा संदर्भातील अडी - अडचणींचे निरसन करण्यात आले.

संदर्भ क्र.०३ च्या मंजूर टिपणीनुसार लिफाफा नं.०१ (टेक्नीकल बीड ) दि.११/०३/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साो,यांचे समक्ष उघडण्यात आले असुन,निविदाधारकांनी सादर केलेले कागदपत्रे व Technical Score चा तुलनात्मक तक्ता तयार करुन सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

प्राप्त निविदाधारकांच्या कागदपत्रांच्या अपुर्तते बाबतची माहिती पुढील प्रमाणे.

| अ. नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | सादर न केलेल्या कागदपत्राचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.स्पेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. | | - | सदर कंपनीने वार्षिक उलाढालीचे कागदपत्र सादर केलेले आहेत.परंतु कंपनीची वार्षिक उलाढाल मागील दोन वर्षापासुन लाखाच्या रकमेत असुन १० कोटी पेक्षा कमी आहे. |
| | | १ | इन्कमटॅक्स चलनाच्या सत्यप्रती नाहीत. | - |
| | | २ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामा विषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती नाहीत. | - |
| २ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे | | - | सदर कंपनीने वार्षिक उलाढालीचे कागदपत्र सादर केलेले आहेत.परंतु सदर कंपनीची वार्षिक उलाढाल १० कोटी पेक्षा कमी आहे. |
| | | १ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती नाहीत. | - |
| ३ | मे.न्युटेक जेटींग इक्युपमेन्टस इंडिया प्रा.लि.फरीदाबाद. हरियाणा | १ | गुणवत्ता राखण्याबद्दलचे नियोंजनाची माहिती सादर केलेली नाही. | - |

निविदेतील पान नं.१९ कंपनी बाबतची माहितीच्या आधारे Office of the Comptroller and Auditor General of India, New Delhi Tender No ४१८ / GS / ५ - २०११ Dated ०६ September २०११ या कॅग रिपोर्ट प्रमाणे १०० पैकी ७० व त्यापेक्षा जास्त गुण असलेले एकच निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडीया लि,पुणे Successful Bidder आहेत.

या नियमावली नुसार खालीलप्रमाणे गुणवत्ता नमुद केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | १०० पैकी प्राप्त गुण ( ७० व त्यापेक्षा जास्त गुण असल्यास पात्र ) | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | पात्र | अपात्र | |
| १ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे. | ८० | - | १. सदर कंपनीला ७० % पेक्षा जास्त म्हणजे ८० % गुण असल्यामुळे, सदर कंपनी पात्र ठरत आहे.<br>२. सदर कंपनीकडे आय एस ओ प्रमाणपत्र नामांकनासह<br>१) SA ८००० - २००८<br>२) SA ८००० - २००१<br>३) सेफ्टी मॅनेजमेंट सिस्टिम प्रमाणपत्र OH SAS - १८००१ ३ १९९९<br>४) मेंबरशिप प्रमाणपत्र<br>५) BICS प्रमाणपत्र<br>हि हाऊसकिपींग कामासंदर्भातील नामांकन प्रमाणपत्र आहेत. |
| २ | मे.स्पेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. | - | ११ | १. निविदेतील अटी शर्ती नुसार कंपनीची वार्षिक उलाढाल कमी असल्याने अपात्र.<br>२. ७० % पात्र गुणापेक्षा कमी गुण असल्यामुळे अपात्र.<br>३. इन्कमटॅक्स चलनाच्या सत्यप्रती नाहीत.<br>४. सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती नाहीत. |
| ३ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे | - | २९ | १. सदर कंपनीची वार्षिक उलाढाल १० कोटीपेक्षा कमी आहे.<br>२. ७० % पात्र गुणापेक्षा कमी गुण असल्यामुळे अपात्र.<br>३. सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती नाहीत. |
| ४ | मे.न्युटेक जेटींग इक्युपमेन्टस इंडिया प्रा.लि.फरीदाबाद. हरियाणा | - | ४४ | १. ७० % पात्र गुणापेक्षा कमी गुण मिळालेले आहे.<br>२. गुणवत्ता राखण्याबद्दलचे नियोंजनाची माहिती सादर केलेली नाही.<br>३. सदर कंपनीकडे आय एस ओ प्रमाणपत्र नामांकनासह<br>१) OH SAS - १८००१ - २००७<br>२) ISO - १४००१- २००४<br>हाऊसकिपींग कामासंदर्भातील नामांकन प्रमाणपत्र आहेत. |

दिनांक ११/०३/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो,यांचे समक्ष उघडण्यात आलेले टेक्नीकल बीड व कंपनीकडून मागविण्यात आलेली कंपनी बाबतची माहिती वरुन तांत्रीक गुण (Technical Score) देण्यात आले. कंपनीला प्राप्त झालेल्या गुणानुक्रमानुसार खालील तीन निविदाधारकांना चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आलेले आहे.

१) मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे. २) स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे ३) मे.न्युटेक जेटींग इक्युपमेन्टस इंडिया प्रा.लि.फरीदाबाद. हरियाणा

उपरोक्त निविदाधारकांकडून प्राप्त झालेले सिलबंद लिफाफा नंबर ०२ (प्राइस बीड) आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन निविदाधारकांना सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीकरिता बोलविणेत आले असता, त्यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे. | १०,३६,२८१ | ८,३०,००० |
| २ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे | ८,७७,८०७ | ८,००,००० |
| ३ | मे.न्युटेक जेटींग इक्युपमेन्टस इंडिया प्रा.लि.फरीदाबाद. हरियाणा | १०,५०,५६६ | ८,३५,००० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.३५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, १) मे.बी.व्ही.जी.इंडीया लि,पुणे २) स्पार्क ऑल सिक्युरिटी,पुणे ३) मे.न्युटेक जेटींग इक्युपमेंट, हरीयाणा या तीन कंपन्याचे प्राईस बीड (दरपत्रके) समक्ष उघडण्यात आले व तीनही कंपन्यांचे प्रतिनिधींना अंतीम दराबाबत चर्चा/ वाटाघाटीसाठी सभेसमोर बोलविणेत आले असता त्यांनी देऊ केलेल्या सुधारीत दरानुसार Financial Value चा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.**

| Sr. No. | Name Of Agency | Quoted Amount On the Tender (Rs) | Financial Value | Bidders Status | **Amount after Negotiation** | **Financial Value** | **Bidders Status** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | B.V.G.India Ltd, Pune | 10,36,281 | 25.41 | F-2 | **8,30,000** | **28.92** | **F-2** |
| 2 | Spark-all Security & Allied Services Pvt.Ltd.Pune | 8,77,807 | 30.00 | F-1 | **8,00,000** | **30.00** | **F-1** |
| 3 | Nutch Jetting Equipments India Pvt Ltd.Faridabad. | 10,50,566 | 25.07 | F-3 | **8,35,000** | **28.74** | **F-3** |

उपरोक्त Financial Value मध्ये Technical Value एकत्रीत करुन Successful Bidder चा तक्ता खालील प्रमाणे.

| Sr. No. | Name Of Agency | Technical Marks / Value ( 70% Weightage ) | | | Financial Value after negotiation ( 30% Weightage ) | | Total Final Value ( col 4 + 6 = 8 ) ( 100% Weightage ) Successful Bidder | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks | **Value** | Status | **Value** | Status | **Value** | Status |
| 1 | 2 | 3 | **4** | 5 | **6** | 7 | **8** | 9 |
| 01 | B.V.G.India Ltd, Pune | 80 | **56.00** | T-1 | **28.92** | F-2 | **84.92** | **SB-1** |
| 02 | Spark-all Security & Allied Services Pvt.Ltd.Pune | 29 | **20.30** | T-3 | **30.00** | F-1 | **50.30** | SB-3 |
| 03 | Nutch Jetting Equipments India Pvt Ltd.Faridabad. | 44 | **30.80** | T-2 | **28.74** | F-3 | **59.54** | SB-2 |

उपरोक्त दोन्ही तुलनात्मक तक्त्याचा विचार करता,

**अ)** स्पार्क ऑल सिक्युरिटी, पुणे हे Financial Value मध्ये अग्रस्थानी असले, तरी ते Technical Value मध्ये मे.बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे व न्युटेक जेटींग इक्युपमेंट, हरियाणा यांच्यापेक्षा त्यांचा Technical Value दर कमी आहे. कॅग रिपोर्ट प्रमाणे Technical Score मध्ये कमीत कमी ७०% गुण असणे आवश्यक असते, ते सदर कंपनीला प्राप्त होत नाही.

**ब)** मे.बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे हे Financial Value मध्ये २८.९२ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर असून Technical Score मध्ये कॅग रिपोर्ट प्रमाणे ७०% गुणापेक्षा जास्त म्हणजेच ८० गुणासह अग्रस्थानी आहेत.

उपरोक्त दोन्ही कंपन्यांचा Technical व Financial Value चा विचार करता मे.बी.व्ही.जी. इंडीया लि, पुणे यांना एकत्रीत Value ८४.९२ प्राप्त झालेले असून ते Successful Bidder आहेत.

**त्यामुळे मे.बी.व्ही.जी.इंडीया लि,पुणे यांचे दर रु.३०,०००/- ने जास्त असले तरी ते Successful Bidder असून त्यांचा सदर विभागातील कामाचा पुर्वानुभव तसेच भक्तांना चांगली सेवा मिळावी व स्वच्छतेच्या कामाचा दर्जा कायम रहावा यासाठी Successful Bidder मे.बी.व्ही.जी. इंडीया लि,पुणे यांना स्वच्छता कामाचे साहीत्य,केमीकल्स व पदनिहाय प्रतीदिनी ७६ कर्मचाऱ्यासह दरमहा रु.८,३०,०००/- मात्र (सर्व करांसह) या रकमेमध्ये दि.०१/०५/२०१३ ते दि.३०/०४/२०१४ अखेर या कालावधीसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींगचे काम देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**विषय नं.११** **सन २०१३-२०१४ या वर्षाकरिता द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदीची बंद कोटेशन्स उघडणे व वार्षिक निविदा ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वारकामाई मध्ये धुनी ज्वलनासाठी सरपण व रान शेणी गोवऱ्यांचा वापर केला जातो. या मधुन काढलेली उदी साईभक्तांना देण्यात येते. श्रींचे द्वारकामाईतील धुनीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या प्रति वर्षी कोटेशन पद्धतीने खरेदी करण्यात येतात. त्यानुसार मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष कोटेशन्स उघडुन सर्वात निम्नतर दर असलेले श्री विजय पितांबर देवरे, मु.पो.-पंचशील नगर, मालेगाव कॅम्प, जि- नाशिक यांचेकडून प्रति किलो रु.०६.०० प्रमाणे माहे-एप्रिल-२०१२ ते माहे-मार्च-२०१३ अखेर या आर्थिक वर्षासाठी १,००,००० किलो राणशेणी व त्याच दरामध्ये २५,००० किलो थापील गोवरी खरेदी करणेबाबत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार श्री.विजय पितांबर देवरे यांनी गोवऱ्यांचा पुरवठा पुर्ण केला आहे. सदर गोवरी पुरवठ्याची मुदत माहे-३१ मार्च २०१३ अखेर संपत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.त्रिसदस्य समितीचे दि.२६.०२.२०१३ चे सभेमध्ये सन-२०१३-१४ या वर्षाकरीता गोवरी खरेदी करणेकामी कोटेशन्स मागविणेबाबत मंजुरी घेण्यात आली असून दि.१८/०३/२०१३ रोजीचे दैनिक सार्वमत या वृत्तपत्रामध्ये त्याबाबत निविदा मागणीची जाहिरात देऊन दि.२६/०३/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स मंदिर विभागाकडे जमा झाली आहेत.

| अ.क्र | रानशेणी व थापील गोवरी कोटेशनधारक नाव व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि- नाशिक | १९४८४ /<br>दि.१९.०३.२०१३ |
| ०२ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि- नाशिक | १९४८५ /<br>दि.१९.०३.२०१३ |
| ०३ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.श्री.विजय पितांबर देवरे, रा.पंचशील नगर, मालेगाव | १९४८६ /<br>दि.१९.०३.२०१३ |
| ०४ | श्री.रविंद्र विजय देवरे,<br>मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव, जि.-नाशिक | १९४८७ /<br>दि.१९.०३.२०१३ |
| ०५ | श्री.सिताराम आनंदराव तिपासले,<br>मु.पो.मुर्शतपूर, ता.कोपरगांव, जि- अहमदनगर | १९६८० /<br>दि.२२.०३.२०१३ |
| ०६ | श्री.नारायण सुरेश सदाफळ,<br>मु.पो.खंडाळा, ता.श्रीरामपुर, जि.-अहमदनगर | १९७३२ /<br>दि.२३.०३.२०१३ |
| ०७ | श्री.सुनील एकनाथ ढोकचौळे (ढोकचौडे),<br>मु.पो.खंडाळा, ता.श्रीरामपुर, जि.-अहमदनगर | १९७३३ /<br>दि.२३.०३.२०१३ |

तरी उपरोक्त जमा झालेले कोटेशन्स मा.त्रिसदस्य समितीचे सभेत उघडणेस व त्यातील न्युनतम दरधारकास गोवरी खरेदीचे आदेश देणेस व खरेदीसाठी होणाऱ्या खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सादर.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०७ कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | कोटेशनधारक नाव व पत्ता | गोवरी प्रकार | अंदाजे मागणी | कोटेशनमधील दर (प्रति किलो) रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव,<br>जि- नाशिक | राणशेणी | १,००,००० | ५.८० |
| | | थापील | २५,००० | **५.८०** |
| ०२ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव,<br>जि- नाशिक | राणशेणी | १,००,००० | ६.०० |
| | | थापील | २५,००० | ६.०० |
| ०३ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.प्रा.श्री.विजय पितांबर देवरे,<br>मालेगाव, जि- नाशिक | राणशेणी | १,००,००० | ९.०० |
| | | थापील | २५,००० | ९.०० |
| ०४ | श्री.रविंद्र विजय देवरे,<br>मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव,<br>जि.-नाशिक | राणशेणी | १,००,००० | ९.५० |
| | | थापील | २५,००० | ९.५० |
| ०५ | श्री.सिताराम आनंदराव तिपासले,<br>मु.पो.मुर्शतपूर, ता.कोपरगांव,<br>जि- अहमदनगर | राणशेणी | १,००,००० | **५.७५** |
| | | थापील | २५,००० | ७.०० |
| ०६ | श्री.नारायण सुरेश सदाफळ,<br>मु.पो.खंडाळा, ता.श्रीरामपुर,<br>जि.-अहमदनगर | राणशेणी | १,००,००० | --- |
| | | थापील | २५,००० | २५.०० |
| ०७ | श्री.सुनील एकनाथ ढोकचौळे<br>(ढोकचौडे), मु.पो.खंडाळा,<br>ता.श्रीरामपुर, जि.-अहमदनगर | राणशेणी | १,००,००० | --- |
| | | थापील | २५,००० | ३०.०० |

**निर्णय क्र.३५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत निम्नतम दर मान्य करणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. निम्नतम दरधारक पुरवठा करणेस असमर्थ ठरलेस द्वितीय निम्नतम दरधारकास गोवरीच्या पुरवठयाबाबत कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.**

**तसेच, सदरहू कामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१२** **श्रीना अर्पण केलेले नारळ विक्री करणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारकामाई, समाधीमंदिर बाहेरील काऊंटर, गुरुस्थान या ठिकाणी साईभक्त श्रीफळ अर्पण करतात. सदर नारळ आपण गोळा करुन नारळ स्टॉल या ठिकाणी साठवण करण्यात येते व गरजेप्रमाणे वापरतो.

मंदिर परिसरात सारंमजामे बागेत श्रीना अर्पण केलेले श्रीफळ एका खोलीत (काऊटरला) जमा करण्यात येतात. साईभक्त या काऊटरला नारळ जमा करतात. जमा झालेले नारळ बगीचा विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत पोत्यात भरुन सदरची पोते नारळ जमा करण्याच्या काऊंटरच्या पाठीमागील स्टोअरमध्ये जमा करतात व तेथूनच प्रसादालयात बनविण्यात येणाऱ्या बर्फीसाठी व सत्यनारायण पुजेसाठी नारळ पोते देण्यात येतात.

संस्थानच्या दैनंदिन वापरा व्यतिरिक्त शिललक राहिलेले नारळ फळे विक्री करणेचा प्रस्ताव दिनांक २८.०२.२१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. दिनांक १८.०३.२०१३ रोजीचे पुढारी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि.२६.०३.२०१३ पर्यंत होती.

मुदती अखेर ०७ दरपत्रके व मुदतीनंतर ०१ या प्रमाणे ०८ दरपत्रक प्राप्त झालेल्या आहे. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पाटीचे नाव | आवक नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. दिपक राजाभाऊ चांडवले,श्रीरामपुर | १९६०७ २१-०३-२०१२ | बंद पॉकिट |
| ०२ | श्री .रखमाजी मुरलीधर गाढे, बेलापुर | १९७३५ २३.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०३ | श्री.सुनिल एकनाथ ढोकचौळे, खंडाळा | १९७३४ २३.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०४ | श्री. शरद मगन देवरे, कोपरगांव | १९८८७ २६.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०५ | श्री.पठाण इम्तीयाज रफिक, कोपरगांव | १९८८८ २६.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०६ | श्री. अदिनाथ पंढरीनाथ बानकर, शनिशिंगणापुर | १९८२७ २५.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०७ | श्री.अशोक गंगाराम डुकरे, कोपरगांव | १९८८९ २६.०३.२०१३ | बंद पॉकिट |
| ०८ | श्री.सुलतान सुभान मन्सुरी, येवला | २४ ०१.०४.२०१३ | बंद पॉकिट मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०८ दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | पाटीचे नाव | दरप्रत्रकामधील प्रति शेकडा दर रुपये | चर्चेअती देऊ केलेले प्रति शेकडा दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. दिपक राजाभाऊ चांडवले,श्रीरामपुर | ३१५/- | ३१५/- |
| ०२ | श्री .रखमाजी मुरलीधर गाढे, बेलापुर | ४५१/- | ५१०/- |
| ०३ | श्री.सुनिल एकनाथ ढोकचौळे, खंडाळा | ४६०/- | ४६०/- |
| ०४ | श्री. शरद मगन देवरे, कोपरगांव | ४२५/- | ६२५/- |
| ०५ | श्री.पठाण इम्तीयाज रफिक, कोपरगांव | ४७५/- | ५६०/- |
| ०६ | श्री. अदिनाथ पंढरीनाथ बानकर, शनिशिंगणापुर | ३२५/- | ६२०/- |
| ०७ | श्री.अशोक गंगाराम डुकरे, कोपरगांव | ४३०/- | अनुपस्थित |
| ०८ | श्री.सुलतान सुभान मन्सुरी, येवला | ३००/- | ५३०/- |

**निर्णय क्र.३५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.शरद मगन देवरे, कोपरगाव यांचे उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३** **सुरक्षा कन्सल्टंट यांनी साई आश्रम भाग ०१-०२ व संस्थानचे इतर परिसरासाठी सादर केलेल्या निविदेतील दरापत्रकांचा तुलनात्मक तक्त्यानुसार निर्णय होऊन सुरक्षा कन्सल्टंटची नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग ०१/०२, श्री साईप्रसादालय,श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती व इतर संस्थान संलग्न इमारती तसेच संस्थानचे महत्वाचे परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व इतर अनुषंगीक सुरक्षा साहित्य खरेदी करुन कार्यान्वीत करणेकामी तांत्रीक सुरक्षा सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असल्याने संदर्भ क्र.०१ अन्वये दि.१७/०४/२०१२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वर्तमान पत्रात नाशिक,पुणे,मुंबई या ठिकाणी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. निवीदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२०१२ अखेर पर्यंत ठेवण्यात आलेली होती.

उपरोक्त मुदतीअंती १) महेंद्रा स्पेशल सर्व्हीस ग्रुप,पुणे २) इंडियन इंडस्ट्रीअल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि, दिल्ली ३) डिग्निटी आय.टी.कन्सल्टंट,पुणे ४) मे.डॉल्फिन, अहमदनगर अशा ०४ निविदाधारकांनी सुरक्षा कन्सल्टंट बाबत निविदा या कार्यालयाकडे सादर केलेल्या होत्या.सदरच्या निविदा संदर्भ क्र.०२ दि.०१/०५/२०१२ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये दि.१४/०७/२०१२ रोजी मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे समक्षपणे उघडण्यात आल्या.परंतु निविदाधारकांनी निविदेच्या दरामध्ये एकत्रीत मानधन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रकमेचा सर्व करांसहित स्पष्टपणे उल्लेख केलेला नसल्याने सदर निविदाधारकांना सर्व करांसहित एकत्रीत मानधनाची रक्कम पुढील १५ दिवसांत सुधारीत दरासहित सादर करावी असे सांगण्यात आले.

त्यानुसार संदर्भ क्र.०३ अन्वये दि.२९/०७/२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे उपरोक्त ०४ निविदाधारकांना बोलविण्यात आले.त्यांनी सुरक्षा कन्सल्टंन्सी बाबत सर्व करांसहित एकत्रीत मानधन रकमेची सुधारीत दरपत्रके पुन्हा सादर केली.सदरची सुधारीत दरपत्रके पुन्हा त्याच दिवशी समक्षपणे उघडण्यात आली. त्या सुधारीत दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्याच दिवशी सभेपुढे सादर करण्यात आला. त्यानंतर उपरोक्त निविदाकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.

१) निविदाधारकांनी दि.१४/०७/२०१२ सादर केलेल्या सुधारीत दरपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता तयार करुन चर्चा / वाटाघाटीमध्ये त्यांनी मान्य केलेले सर्व करांसहित दर त्याच तुलनात्मक तक्त्यात नमुद करण्यात आलेले आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेला आहे.

२) दि.२९/०७/२०१२ रोजी निविदाधारकांचा तांत्रीक तुलनात्मक तक्ता तयार करुन तो अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त कामी चर्चा करणे करीता-

अ) महेंद्रा स्पेशल सर्व्हीस ग्रुप,पुणे

ब) इंडियन इंडस्ट्रीअल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि,दिल्ली

क) डिग्निटी आय.टी.कन्सल्टंट,पुणे

ड) मे.डॉल्फिन, अहमदनगर या ०४ निविदाधारकांनी मिटींगच्या दिवसी हजर राहाणे कामी दुरध्वनी व्दारे कळविता येईल.

साई आश्रम भाग ०१ /०२ व संस्थानचे इतर परिसरासाठी सुरक्षा कन्सल्टंटची नियुक्ती करणे बाबतचे उपरोक्त दोन्ही तुलनात्मक तक्ते आपले अवलोकनार्थ व निर्णयास्तव सादर,

**निर्णय क्र.३५६** **साईआश्रम भाग ०१/०२, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती व इतर संस्थान संलग्न इमारती तसेच संस्थानचे महत्वाचे परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व इतर अनुषंगीक सुरक्षा साहित्य खरेदी करुन कार्यान्वीत करणेकामी तांत्रीक सुरक्षा सल्लागाराची नेमणूक करणेबाबत वर्तमानपत्रातील जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०४ निविदाधारकांच्या दरांचे व तांत्रिक बाबींचे तुलनात्मक तक्ते समिती सदस्यांना पुरविणेत येऊन चारही निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी सभेसमोर बोलविणेत आले व समितीने विचारलेल्या प्रश्नांची निविदाधारकांनी समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता पहाता त्यांनी निविदेत दिलेल्या दरांमध्ये फारच तफावत दिसून आली. सदरहू कामासाठी बोलविण्यात आलेल्या निविदा प्राप्त होऊन बराच कालावधी झालेला असल्यामुळे निविदाधारकांना बंद पाकिटामध्ये पुन्हा नवीन दर देणेबाबत सांगणेत आले तसेच, त्यांचा कामाचे स्वरुप, कामाच्या टप्प्यानुसार लागणारे मनुष्यबळ, त्यांचा खर्च, परिसराची पहाणी करुन अहवाल सादर करणे, याबाबतचा तपशील निविदाधारकांकडून प्राप्त करुन घेणेत यावा.**

**सदरचा तपशील निविदाधारकांकडून प्राप्त झालेनंतर त्यांचेकडील तांत्रीक बाबींची छाननी करणेत यावी व पुढील सभेमध्ये नवीन दरांचे बंद पाकिटे उघडणेत येऊन अंतीम निर्णय घेणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१४** **साईआश्रम भाग ०१ व ०२ अंतर्गत असलेल्या इमारतीसाठी टी.व्ही.खरेदीकामी आलेले दरपत्रक उघडून दरपत्रकधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे (त्रिसदस्य) दि. ११.१०.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७९५ नुसार साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये सोनी कंपनीचे LED TV मॉडेल नं. KDL ४६ EX ६५० वॉल मॉ.ब्रॅकेटसह २० नग खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.१९,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणाविस लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्थाव दि.२०.०३.२०१३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार सोनी कंपनीचे LED TV मॉडेल नं. KDL ४६ EX ६५० वॉल मॉ.ब्रॅकेटसह २० नग खरेदीकामी दिनांक ०३.०४.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि. १५.०४.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती खालील प्रमाणे चार पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | आशादिप, नाशिक | ७११/ १३.०४.२०१३ |
| ०२ | निलेश एजन्सीज, अहमदनगर | ७३६/ १५.०४.२०१३ |
| ०३ | ऑडिओ व्हिडीओ सर्व्हिस, अहमदनगर | ७३७/ १५.०४.२०१३ |
| ०४ | न्यु अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | ७३८/ १५.०४.२०१३ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे मा.त्रिसस्यीय समितीपुढे उघडणेत येऊन त्यांना चर्चा/ वाटाघाटीकरिता सभेसमोर बोलाविणेत आले असता त्यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | मागणीचा तपशील | दरपत्रकामधील दर (व्हॅटसह) रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर (व्हॅटसह) रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | आशादिप, नाशिक | Edge 46" (Sony Company Model no. KDL46EX650) | ७०,०००/- | ६८,९००/- |
| ०२ | निलेश एजन्सीज, अहमदनगर | | ९३,९००/- | अनुपस्थित |
| ०३ | ऑडिओ व्हिडीओ सर्व्हिस, अहमदनगर | | ८९,९९०/- | अनुपस्थित |
| ०४ | न्यु अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | | ८६,९००/- | ६८,९००/- |

**निर्णय क्र.३५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये सोनी कंपनीचे LED TV मॉडेल नं. KDL ४६ EX ६५० वॉल मॉ.ब्रॅकेटसह २० नग खरेदीकामी अ.नं.०१ चे मे.आशादिप, नाशिक व अ.नं.०४ चे मे. न्यु अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर या दोन्ही पुरवठादारांचे समान निम्नतम दर स्विकारणे येऊन, दोघांनाही समप्रमाणात म्हणजे १०-१० नग प्रस्तावित टी.व्ही. पुरविण्याचा कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, सदरहूकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१५ मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.०४.०३.२०१३ चे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२ - १३ (नोव्हें.-१२ ते मार्च-१३) साठी प्रसादालय विभागासाठी ९००० क्विंटल गहु आटा खरेदीकामी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे सम्राट कंपीचे गहु आट्याचे प्रति क्विंटल (व्हॅटसह) दर रु.२,०१०/- (अक्षरी रुपये दोन हजार दहा) न्युनतम असल्याने मान्य करण्यात आले, व त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ वशी/ खरेदी-प्रसाद/३७३०/२०१२ दि.१९.११.२०१२ नुसार खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

| अ. क्र | मालाचा तपशिल | मागणी क्विंटलमध्ये | दर प्रति क्विंटल व्हॅटसह | एकुण रक्कम | ५% सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | गहु आटा - सम्राट | ९,००० | २,०१०/- | १,८०,९०,०००/- | ९,०४,५००/- |
| ०२. | तांदुळ- नवीन सोना मसुरी | ३,५०० | २४४१/- | ८५,४३,५००/- | ४,२७,१७५/- |
| ०३. | मसुर - आख्खा | १६० | ४,१५१/- | ६,६४,१६०/- | ३३,२०८/- |
| | | | एकुण रक्कम रुपये | २,७२,९७,६६० / | १३,६४,८८३/- |

पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांचेकडून दि.२७.११.२०१२ रोजी १०० क्विंटल गहु आट्याचा पुरवठा झालेला होता.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचे दि.२२.११.२०१२ रोजीचे पत्रामध्ये पुरवठा आदेशातील सम्राट ब्रॅण्ड गहु आटा मिल मालक देण्यास तयार नसल्याने सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत असल्याने आम्ही सम्राट ब्रॅण्डचा गहु आट्याचा पुरवठा करु शकत नाही. आपल्या टेंडर फॉर्ममध्ये ४ प्रकारचे गहु आट्याची मागणी केली होती, त्यातील कॅप्टन कुक ब्रॅण्डचा गहु आटा हा बेस्ट क्वॉलिटीचा मी त्याच दरात प्रति क्विंटल रु.२,०१०/- प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. तरी माझ्या अर्जाचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती केलेली होती.

त्यानुसार सदरचे विषयाबाबत दि.३०.११.१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे झालेल्या मा.व्य.स.(त्रीसदस्य) च्या सभेपुढे मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेसह निवड समितीने निवडलेल्या सम्राट आटयाच्या उर्वरीत तीन निविदाधारकांना चर्चा-वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते.

सदर सभेत गहु आटा खरेदीबाबत सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय क्र.८८७ संमत करण्यात आलेला आहे. "सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करणेसाठी द्वितीय निम्नतम दरधारक मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना त्यांनी चर्चेअंती देऊ केलेल्या रु.२,०५२/- प्रति क्विंटल (व्हॅटसह) या दराने संस्थान प्रसादालयासाठी सम्राट ब्रॅण्ड गहु आटा पुरवठा करणेसाठी कार्यादेश देणेत यावा. सदरचा आटा जादा दराने खरेदी केल्यामुळे दरातील फरकाची रक्कम न्युनतम दरधारक मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून वसुल करणेत यावी. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी पुरवठा आदेशानुसार सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा न केल्यामुळे त्यांची गहु आट्यासाठी असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी व त्यांना ३ वर्षासाठी संस्थानमध्ये गहु आटा पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही, असा निर्णय झालेला आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१२ सभेतील निर्णयाप्रमाणे गहु आट्यासाठी असलेली ५% डिपॉझिट रक्कम रु.९,०४,५००/- व द्वितीय

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



न्युनतम दरधारक यांचेकडून जादा दराने खरेदी केलेल्या गहु आट्याच्या फरकाची रक्कम रु.३,७३,८००/- असे एकुण रु.१२,७८,३००/- (अक्षरी रुपये बारा लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे) मात्र वसुल करण्यात आलेली आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचेकडील दि.०४.०३.२०१३ चे पत्रान्वये "प्रसादालयाकरिता सम्राट गहु आटयाचे टेंडर आम्हांला मिळाले होते, परंतू सम्राट कंपनीने आम्हाला माल पुरवठा करणेस नकार दिल्यामुळे तो माल आम्ही पुरवू शकलो नाही. तो सविस्तर विषय आम्ही बोर्डाच्या मिटींगमध्ये मांडला होता. याप्रकरणामध्ये आंम्हाला भाव फरकाचे रु.३,७३,८००/- व ५% सिक्युरिटी डिपॉझिटचे अंदाजे ९ लाख रुपये व तीन वर्षाच्या आटयाच्या टेंडरमध्ये बंदी असे तिहेरी दंड लावण्यात आले आहेत.

**१.** तरी आमची विनंती अशी आहे की, मागील १० ते १२ वर्षापासून श्री साईबाबांची सेवा व माल पुरवठा करित आहोत, परंतू आजपर्यंत आमच्या हातून काहीही चुकीचे घडलेले नाही व हि सेवा पुढे व्यवस्थित चालु राहील.

**२.** सध्या तांदुळ पुरवठ्याचे टेंडर आम्हांला मिळालेले आहे. सध्या पाऊस नसल्यामुळे व दुष्काळ पडल्यामुळे तांदळाचे भाव एक हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे वाढलेले आहे, त्यामध्ये सुद्धा आम्हांला अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान होत आहे.

**३.** तरी वरील विषयी विनंती करण्यात येते की, गहु आट्याचे प्रकरणामध्ये आमची काहीही चुक नाही व यामध्ये आम्हांला जास्तीत २ लाखापर्यंत दंड लावण्यात यावेत व तांदुळामध्ये काही भाव वाढवून देण्यात यावेत व बाकी दोही दंड माफ करण्यात यावेत. आपण सहानुभूतीपुर्वक या विषयावर निर्णय घेण्यात यावेत" अशी विनंती केलेली आहे.

मे.हिरालाला चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी दि.२२.११.२०१२ दि.२१.१२.२०१२ व दि.२१.०१.२०१३ रोजी उपरोक्त विषयाबाबत वेळोवेळी पत्र दिलेले आहेत, सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर पुढील प्रमाणे निर्णय क्र.७५ झालेला आहे. "सदरहु विषय स्थगित ठेवण्यात यावा, परंतू व्यवस्थापन समितीने यापुर्वी घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाही चालु ठेवावी."

तरी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.०४.०३.२०१३ रोजीचे पत्राबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.०४.०३.२०१३ चे विनंती पत्राबाबत संस्थान कायदे सल्लागाराचा अभिप्राय घेण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१६** **मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसित करणे कामाचे ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कं.संगमनेर यांचे दुसऱ्यांदा मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** वरील विषयांकित रस्त्याचे कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०२/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र. १७६ अन्वये ठेकेदार मे.एस. के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना त्यांची निम्नतम दराची निविदा स्विकारुन जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/७४७/ २०११, दि. ०४/०५/२०११ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. उपरोक्त प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Name of work: - | Construction of Helipad Link Road on Distributory No.11 of GRBC, Nimgaon Korhale, Shirdi. |
| Contractor: - | M/s S. K. Yewale & Co., Sangamner |
| Project Management Consultant:- | Unison Project Management Pvt. Ltd. |
| Resolution no. & date: - | No.176, dt.27/02/2011. |
| Work order no. & date: - | No.SSST/Const/747/2011, dt.04/05/2011. |
| Contract Value: - | Rs.6,60,81,150/- |
| Date of Commencement: - | 04 May 2012. |
| Time for Completion: - | Nine calendar months. |
| Scheduled date of completion: | 03 February 2012. |
| Extended date of completion | 31 December 2012 ( 1st Extension) |

ठेकेदार यांना काम पूर्ण करणेसाठी निविदा शर्तीनुसार ०९ महिन्यांचा कालावधी देणेत आलेला होता. त्यानुसार ठेकेदार यांना काम पूर्ण करण्याची मुदत दि. ०३/०२/२०१२ रोजी पर्यंत होती. त्यानंतर ठेकेदार यांनी केलेल्या विनंतीवरुन मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



क्र. ७४६ अन्वये दि.३१/१२/२०१२ अखेर ठेकेदार यांना मूदतवाढ देण्यात आली . या कालावधीत ठेकेदार यांनी खालील कामे पूर्ण केलेली आहेत.

| Sr. No | Particulars | Total length | Comleted length | % Completion |
|---|---|---|---|---|
| 1 | Utility relocation | Electirc poles-2 &Water pipes-3 nos | | Shifted |
| 2 | Excavation | | | |
| a | Roadway (LHS) | 2000 m | 2000 m | 100% |
| b | Roadway (RHS) | 2430 m | 2430 m | 100% |
| c | Chari bed | 2000 m | 2000 m | 100% |
| 3 | Laying of Pipe | 2000 m | 2000 m | 100% |
| 4 | Embankment with 8% CBR | | | |
| a | LHS (Completed) | 2000 m | 2000 m | 100% |
| b | RHS (In progress) | 2430 m | 2430 m | 100% |
| 5 | GSB , LHS<br>RHS | 2000 m<br>2430 m | 2000 m<br>2430 m | 100%<br>100% |
| 6 | WBM II LHS<br>RHS | 2000 m<br>2430 m | 2000 m<br>2430 m | 100%<br>100% |
| | WBM II LHS<br>RHS | 2000 m<br>1540 m | 2000 m<br>2430 m | 100%<br>63.67% |
| 7 | BBM LHS<br>RHS | 1540 m<br>1540 m | 2000 m<br>2430 m | 77%<br>63.67% |
| 8 | BM LHS<br>RHS | 1540 m<br>1540 m | 2000 m<br>2430 m | 77%<br>63.67% |
| 9 | BC | 1540 m | Nill | Nill |
| 10 | Kerb fixing (LHS/ RHS) | 2000 m | 1000 m | 50% |

साईभक्तांचे निवासाकरीता सर्व्हे नं.१०७,१०८ व १०९ पै. शिर्डी येथे साई आश्रम प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा उद्‌घाटन समारंभ मा. राष्ट्रपती, भारतीय गणराज्य यांचे शुभहस्ते दि.१६/११/२०१२ रोजी आयाजीत करणेत आला होता. यावेळी मा. राष्ट्रपती व इतर मान्यवरांचे हेली कॉप्टर मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे हेलीपोर्टवर उतरवण्यात येणार होते. याकरीता सदर हेली पॅडचे विस्तारीकरण करणेस व सदरचे काम ठेकेदार मे.एस.के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांचेकडून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/११/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.८६३ अन्वये निर्णय घेणेत आला. ठेकेदार यांनी हेलीपॅड विस्तारीकरणाचे काम त्यांचेकडील सर्व मशिनरी व लेबर वापरुन वेळेत पूर्ण केले.

ठेकेदार यांनी हेलीपॅडचे काम तातडीचे असल्याने त्यासाठी चारी नं.११ वरील रस्त्याचे कामावरील लेबर व मशिनरीचा वापर केला. त्यामुळे चारी नं.११ वरील रस्त्याचे कामास विलंब झाला आहे. करीता त्यांनी सदरहू काम पूर्ण करण्यासाठी दि.३१/०३/२०१३ अखेर मूदतवाढ मिळणेची विनंती दि.१४/०१/२०१३ रोजीचे पत्रान्वये केली आहे.

सदर रस्त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी त्यांचे दि.१४/०१/२०१३ रोजीचे पत्राने ठेकेदार यांची मुदतवाढीची मागणी रास्त असून रस्त्याचे एकुण कामासाठी त्यांना दि.१५/०३/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस शिफारस केली आहे.

तरी ठेकेदार मे.एस.के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र. ११ बंदिस्त करुन त्यावर रस्ता विकसीत करणेचे कामास दि.१५/०३/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी, संगमनेर यांना मौजे निमगांव को-हाळे ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसित करणेचे कामासाठी दुसऱ्यांदा दि.२०.०४.२०१३ अखेर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७** **मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर- मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे वर्ग-४ कर्मचा-यांकरीता मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं. १६९ मध्ये ८ इमारतींमध्ये एकूण ९६ निवासी सदनिका आहेत. सदर निवासी सदनिका सेवाधाम येथील कर्मचारी व साईबाबा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



हॉस्पिटल येथील डॉक्टर व नर्स यांना रहीवासाकरिता देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर निवासस्थानचे लगत संस्थान कर्मचा-यांची श्री साईप्रसाद हौसींग सोसायटी आहे. सदर परिसरातील रहिवाशांनी नगर मनमाड रस्ता ते हौसींग सोसायटी पर्यंतचा रस्ता खराब झालेला असल्याने रस्त्याचे डांबरीकरण करुन मिळणेबाबत निवेदन दिलेले आहे.

संस्थानने निमगांव हद्दीतील ४५ हे. ७४ आर जमिनीचा ताबा शेती महामंडळाकडून भूसंपदनाचे माध्यमातून घेतला आहे. सदर जमिनीवर संस्थान उपयोगी विविध विकास प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावीत आहे. मौजे निमगांव हद्दीतील चर रस्तालगत (नगर मनमाड ते गोदावरी उजवा कालवा गट नं. २२१ व २४५ पर्यंत एकुण लांबी २००० मी.) संस्थानचे गट १७२, १६९ पैकी, २१८, २२१, २४५, २४९ असे एकुण ६ प्लॉट आहे. सदरचे प्लॉटमध्ये जाणेकरीता चर रस्त्याचा वापर करण्यात येतो. संस्थानचे गट नं. १७२ मधील साई आश्रम प्रकल्प भाग-२ कडे जाणेकरीता सदरचे चर रस्त्यापर्यंतचा अंतर्गत रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच गट नं. २१८ मध्ये प्रसाद लाडू निर्मीती करिता इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावीत आहे.

नगर मनमाड ते गोदावरी उजवा कालवा संस्थानचे गट नं. २२१ व २४५ लगतचा चर रस्ता (लांबी १७०० मी.) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संस्थान निधीतून सन २००९ साली पूर्ण करणेत आलेले आहे. सदर रस्त्यावरुन परिसरात सुरू असलेल्या बांधकामाकरीता वीट, वाळू, खडी व मुरूमाचे तसेच पाण्याचे टँकर इ. जड वहातूक सतत सुरु असल्याने काही भागात रस्ता खचलेला असून जागोजागी रस्त्यावर खड्डे पडलेले आहे.

सदर रस्त्याचा वापर संस्थानकरिता मोठया प्रमाणात होणार असल्याने रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेकामी डब्ल्यू. बी. एम. बी. बी. एम, व डांबरीकरणात कारपेट, सिलकोट, अशा प्रकारची कामे करावी लागेल, याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Item No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Excavation for Road Side gutter in all type of soil. | 600.00 | Cum | 29.00 | 17,400.00 |
| 02. | Picking the road surface | 1875.00 | Sqm | 07.00 | 13,125.00 |
| 03. | Supplying trap stone metal of 40 mm size including conveying and stacking. | 185.00 | Cum | 462.42 | 85,547.70 |
| 04. | Supplying hard murum at the road side including conveying and stacking. | 400.00 | Cum | 299.00 | 1,19,600.00 |
| 05. | Supplying Soft murum at Side. | 62.00 | Cum | 299.00 | 18,538.00 |
| 06. | Spreading 40 mm metal including sectioning. | 185.00 | Cum | 24.24 | 4,484.40 |
| 07. | Spreading Soft and hard murum | 460 | Cum | 14 | 6,440.00 |
| 08. | Compacting the sub grade gravel over size metal with power roller. | 1850.00 | Sqm | 8.00 | 14,800.00 |
| 09. | Providing and laying 75 mm thk compacted Bitumen Bound macadam with 80/100 grade bitumen over B T Surface. | 7400.00 | Sqm | 211.00 | 15,61,400.00 |
| 10. | Providing 20 mm thk open graded premix bitumimous carpet | 7400.00 | Sqm | 154.00 | 11,39,600.00 |
| 11. | Providing bituminous liquid seal coat to black top surface with 60/70 Grade bitumen. | 7400.00 | Sqm | 51.26 | 3,79,324.00 |
| | Amount : | | | | 33,60,258.70 |
| | Add 5% Contingencies : | | | | 1,68,012.95 |
| | Add Consultant Fee @ 3% | | | | 1,00,808.00 |
| | Total Amount : | | | | 36,29,080.00 |

तरी मौजे निमगांव हद्दीतील नगर मनमाड ते संस्थानचे गट नं. २२१ व २४५ पर्यंतचे लांबीतील चर रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३६,२९,०८०/- मात्रचे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव हद्दीतील नगर मनमाड रस्ता ते संस्थानचे गट नं. २२१ व २४५ पर्यंतचे लांबीतील चर रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३६,२९,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहू रस्ता ज्यांचे अखत्यारित आहे त्यांची परवानगी घेऊन, प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१८** **संस्थानतर्फे सध्या चालू असलेल्या बांधकाम प्रकल्पांसाठी यापुढे येणारे खर्चास परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज करणेसाठी नेमणुक करणेत आलेल्या आर्किटेक्ट/ सल्लागार यांचे फी बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानतर्फे सध्या मोठ्या स्वरुपाच्या खर्चाचे विविध बांधकाम प्रकल्प चालू आहेत. या प्रकल्पांसाठी मंजूर करण्यात आलेल्या निविदा रकमेपैकी आजपावेतो काही रक्कम खर्च झालेली असून प्रकल्प पूर्णत्वास नेणेसाठी उर्वरित खर्च अपेक्षित आहे.

पी आय एल नं. १८/२०११ मधिल सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर मे. कोर्टाने दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये खालिलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

" ६) We direct that, without prior permission of this court, the committee,

..........................................................................................

c) Shall not take any major financial descision of whatsoever nature ;"

तसेच मा. अध्यक्ष सो यांनी दि.१८/१०/२०१२ रोजीच्या पत्राव्दारे सध्या चालू असलेल्या प्रकल्पांसबंधी मा. उच्च न्यायालयाचे परवानगीशिवाय कुठलेही पेमेंट करु नये अशी सूचना केली आहे. त्यामुळे सदर बांधकाम प्रकल्पांचे ठेकेदार, आर्किटेक्ट व कन्सल्टंट यांची बिले सध्या प्रलंबित ठेवावी लागणार आहेत. सदर बांधकाम प्रकल्पांवर यापुढील खर्च करणेसाठी परवानगी मिळणेकामी मा. उच्च न्यायलय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करणेसाठी इकडील दि.२३/११/२०१२ रोजीचे टिपणीवर मंजुरी प्रदान करणेत आलेली आहे.

मा. उच्च न्यायालय यांचेकडे वरीलप्रमाणे दाखल करावयाचे अर्जासोबत प्रत्येक बांधकाम प्रकल्पाबाबत आर्किटेक्ट/ सल्लागार यांचा अहवाल जोडणे आवश्यक आहे. सध्या ज्या प्रकल्पांसाठी आर्किटेक्ट/ सल्लागार यांची सेवा घेण्यात येत आहे त्यांचेकडून संबंधित प्रकल्पांबाबतचे अहवाल घेणेत आले आहेत. तथापी ज्या प्रकल्पांसाठी अशा प्रकारची सेवा घेण्यात येत नाही त्यांचेकरीता प्रकल्पांची पहाणी करुन अहवाल सादर करणेसाठी आर्किटेक्ट / सल्लागार यांची नेमणूक करावी लागणार होती. अशा प्रकारची कामे खालिलप्रमाणे आहेत.

| Sr.No | Name of the work |
|---|---|
| 01 | Asphalting of Parking and Internal Roads in Sansthan Premises at Shirdi |
| 02 | Providing & Supplying of Single Beds having M.S (CRCA) frame for the halls and rooms of Sai Ashram project |
| 03 | Erection of shed for patients relatives and laying paver blocks in the premises of Building no. 2 of Sainath Hospital |
| 04. | Renovation of Shed and external development work for Palkhi Visava at Pandhurli, Tal- Sinnar. |
| 05 | Renovation of Roof domes of New Prasadalaya. |
| 06 | Providing and Applying external paint to Education complex and Sainath Hospital buildings |
| 07 | Renovation work of Toilet and Bathroom in the educational complex |
| 08 | Renovation of Shed & external Development for Palkhi Visava at Musalgaon. |

वरिल कामांबाबत सध्या संस्थानला इतर कामांसाठी सेवा देत असलेले तसेच यापुर्वी सेवा दिलेले आर्किटेक्टस् / सल्लागार यांचेकडून अहवाल मागविणेबाबत विचारले असता काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी वरीलप्रमाणे सेवा देणेस सहमती दर्शविली त्यानुसार मा. व्यवस्थापन समतीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेत संमत करण्यात आलेल्या निर्णय क्र. ९५२ नुसार मा. अध्यक्ष यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांची संस्थानचे जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/४६३०/२०१२ दि.७/०१/२०१३ रोजीचे पत्राने याकामी नेमणूक करणेत आली. याकामी त्यांना अदा करावयाची फी ही मा. अध्यक्ष सो यांचेमार्फत ठरविण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेमार्फत दि.०८/०१/२०१३ रोजी शिर्डी, सिन्नर व पांढुर्ली येथील संस्थानचे वरील प्रकल्पांची पाहणी करुन त्यांचेबाबतचा Status Report व Technical Inspection Report सादर केले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तथापी त्यानंतर दि.०७/०२/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रीसदस्य समिती सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.११३ संमत करण्यात आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०८/११/२०१२ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८६२ अन्वये संस्थानमधील सर्व कारणांसाठीचे रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाची देयके मा. व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मान्यतेने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच पारीत करणेत यावीत, असे ठरलेले आहे.

सदर निर्णयामुळे पुरवठाधारक/ ठेकेदार यांनी पुरवठा आदेशातील काम पूर्ण करुनही सदर कामाबाबतची देयके आदा करणेस उशीरा होतो व पुरवठाधारक/ ठेकेदार संस्थानला बाकी असलेल्या रकमेबाबत येणारी रक्कम व्याजासह मिळावी, अशा नोटीसा पाठवितात.

पुरवठाधारक/ ठेकेदार यांची देयके प्रलंबीत राहिल्यास व त्यांनी उर्वरित रकमेची व्याजासह मागणी केल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होऊन, लेखापरिक्षाणातील आक्षेपांना विनाकारण सामोरे जावे लागेल. तसेच भविष्यात पुरवठाधारक मालाचा पुरवठा करणार नाहीत. याबाबी विचारात घेऊन संस्थानचे बांधकाम, विद्युत व इतर कोणत्याही विभागांची पुरवठाधारक/ ठेकेदार यांचेमार्फत पुर्ण झालेल्या किंवा चालू असलेल्या विविध कामांची व त्यानुषंगीक इतर बाबींची तसेच, आर्किटेक्ट / सल्लागार यांची देयेके त्वरीत आदा करणेत यावीत, असे ठरले".

सदरहू निर्णयानुसार वर नमूद केलेल्या कामांची बिल अदा करता येणार असल्याने यापुर्वीचे दि.२३/११/२०१२ रोजीचे टिपणीवरील मंजुरीअन्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात आलेले नाही.

उपरोक्त कामापोटी काबरे चौधरी आर्किटेक्टस् , नाशिक यांनी त्यांचे दि.१५/०२/२०१३ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे फीची मागणी केली आहे.

| Sr.No | Services Provided | Amount |
|---|---|---|
| 01 | Inspection & Certification of work Fees due @ lumpsum | Rs.5000/ Job |
| 02 | For 8 No. of Jobs Total Fees Rs.5000/ Jobx8 Nos | Rs.40,000.00 |
| | Total fees | Rs.40,000.00 |
| | Service tax @ 12.36% | Rs.4,944.00 |
| | Total Amount Payable | Rs.44,944.00 |

तरी काबरे चौधरी आर्किटेक्टस् नाशिक यांनी दिलेल्या Status & Techincal Inspection Report चे फी पोटी त्यांना उपरोक्त तपशिलाप्रमाणे रु.४४,९४४/- मात्र (सर्व्हीस टॅक्ससह) अदा करणेसाठी मा.त्रीसदस्य समिती सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि शिर्डी शहराचे सांडपाणी विल्हेवाट लावणेसाठी उभारलेल्या शिर्डी नगरपंचायत सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प चालविणेसाठी येणारा खर्च (भरपाई) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** शिर्डी शहरात येणा-या हजारो साईभक्तांसाठी संस्थानमार्फत विविध भक्तनिवासस्थान इमारती, उभारण्यात आलेल्या आहेत. तसेच शिर्डी शहरात संस्थानचे रुग्णालये व कर्मचारी वसाहत आहे. तसेच मौजे निमगांव को-हाळे शिवारातील साई प्रसादालयाचे सांडपाणी शिर्डी शहराचे दक्षिणेकडील नाल्याजवळ जोडण्यात आले होते. दि. २१/०१/२०१३ रोजी पासुन सदर सांडपाणी शिर्डी नगरपंचायतचे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पास जोडणेत आले आहे. संस्थानच्या शिर्डी परिसरातील विविध भक्तनिवास, कर्मचारी वसाहत, मंदिर परिसर, प्रसादालय इ. ठिकाणचे अंदाजे २ MLD पाणी शिर्डी नगरपंचायतचे ड्रेनेज लाईनला जोडले आहे. ज्यावर शिर्डी नगरपंचायतचे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पात प्रक्रीया केली जाते. संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाचे सांडपाण्यांवर सदर ठिकाणचे संस्थानचे सांडपाणी प्रक्रीया प्रकल्पात शुध्दीकरण करणेत येत आहे. तसेच साईआश्रम भक्तनिवास प्रकल्पात सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प उभारणेत आलेले आहे. भविष्यात सदर ठिकाणी प्रक्रीया होणारे पाणी इमारतीचे टॉयलेट फ्लशींग करीता वापरणेत येणार आहे. तसेच व्दारावती इमारती करीता सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प उभारणेत येणार आहे.

**ब)** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे पत्र जा.क्र.न.पं/साप्र/कावि-०१/२३०/२०१३, दि. १३/०२/२०१३ अन्वये त्यांचे मार्फत शिर्डी शहराचे सांडपाणी प्रक्रिया करणेसाठी उभारलेल्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प चालविणेसाठी खालील खर्चाची मागणी केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



".. उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शिर्डी नगरपंचायतीचे UIDSSMT योजने अंतर्गत भुयारी गटर योजनेचे व सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम पुर्ण केले असून सांडपाणी शुध्द करणेची प्रक्रिया सुरू केलेली आहे. त्यामुळे सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्रापासून दररोज सुमारे ४० ते ५० दशलक्ष लिटर शुध्द केलेले सांडपाणी नगरपंचायतीकडे शेतीसाठी व बगीचा करीता देणेसाठी उपलब्ध असून सदर सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प चालविणेसाठी नगरपंचायतीस दरमहा रु. २०.०० लक्ष इतका खर्च येत आहे.

शिर्डी नगरपंचायत ही 'क' वर्ग नगरपंचायत असून शहरांची लोकसंख्या सुमारे ३६,०००/- एवढी आहे. नगरपंचायतीचे स्वत :चे उत्पन्न रहीवाशी नागरीकांकडून वसूल घेणा-या घरपट्टी पाणीपट्टी व दुकानभाडे व विविध फी व्दारे जमा होत असून सदर उत्पन्न वार्षिक सरासरी २.५ कोटी एवढेच आहे.

सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्रात आपल्या संस्थेच्या मालकीच्या भक्त निवास (५०० रुम ), धर्मशाळा (२०० रुम), नवीन प्रसादालय, साई आश्रम भक्तनिवास (१५०० रुम) तसेच इतर इमारतीमधून निघणा-या संपुर्ण सांडपाण्याची विल्हेवाट व शुध्दीकरण करणेत येत आहे. साईबाबा संस्थान या आपल्या संस्थेचे अंदाजे ३ mld सांडपाणी नगरपंचायतीमार्फत दररोज शुध्दीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी दरमहा रु. १०.०० लक्ष

याप्रमाणे वार्षीक रु. १.२० कोटी एवढी रक्कम शिर्डी नगरपंचायत आपल्या संस्थेचा सांडपाणी शुध्द करणेसाठी खर्च करीत आहे.

याशिवाय उर्वरीत शहरातील सांडपाणी प्रक्रियेसाठी नगरपंचायतीस दरमहा रु. १०.०० लक्ष याप्रमाणे वार्षीक रु. १.२० कोटी इतका खर्च येत आहे. याप्रमाणे शिर्डी शहर आणि श्री साईबाबा संस्थान या दोन्ही संस्थांचे सांडपाणी शुध्दीकरणासाठी एकूण खर्च रु. २.४० कोटी येत आहे.

तरी वरीलप्रमाणे सांडपाणी प्रकल्पातून शुध्दीकरण केलेले सांडपाणी श्री साईबाबा संस्थान यांनी बगीचा व इतर उपयोगासाठी घेऊन त्याबदल्यात दरमहा १०.०० लक्ष इतकी रक्कम नगरपंचायतीस दिल्यास सदर प्रकल्प चालविणे नगरपंचायतीस शक्य होईल.

तरी सांडपांणी व्यवस्थापन प्रकल्प चालविणेसाठी येणारा मासीक खर्च रु. २०.०० लक्ष पैकी रु. १०.०० लक्ष दरमहा विशेष बाब म्हणून नगरपंचायतीस मिळावा ही विनंती. "

**क)** शिर्डी नगरपंचायतीस संस्थानचे विविध भक्तनिवास , रूग्णालये,कर्मचारी वसाहत यांचा विषेश आरोग्य रक्षण कर प्रत्येक वर्षास भरणेत येतो. सन.२०११-२०१२ करीता यापोटी रू.११,४००/-मात्रचा कर भरणेत आलेला आहे.शिर्डी नगरपंचायत यांनी सदरच्या करापोटी भरावयाच्या रकमेत वाढ केली असुन सन.२०१२-२०१३ करीता विशेष आरोग्य रक्षण करापोटी रू.१०,४४,२००/- मात्र रकमेची त्यांचे पत्र जा. क्र. न. पं/ आरोग्य / कावि-०६ / १५८ / २०१३, दि.२०/०२/२०१३ अन्वये मागणी केली आहे.

**ड)** संस्थान मार्फत शिर्डी नगरपंचायतीस प्रतीवर्षी त्यांचे नियमानुसार आरोग्य रक्षण कर तसेच घरपट्टीही भरण्यात येते. त्यामुळे त्यांना रु. १० लक्ष मात्रचा निधी प्रती महिना देणे संस्थानवर बंधनकारक नाही. तथापी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील कलम -२१ (२) (दोन) नुसार " स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्या मध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे " अशी तरतूद आहे. उपरोक्त शिर्डी नगरपंचायत यांचे मागणीनुसार त्यांना रु. १० लक्ष प्रती महिना खर्च देणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करावा लागेल. त्रीसदस्य समितीचे मान्यतेनंतर (मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग) यांची सदरचा निधी वर्ग करणेसाठी मान्यता घेणे आवश्यक राहील.

तरी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविणेसाठी प्रती महिना रु. १० लक्ष मात्रचा निधी देणे, त्याबदल्यात प्रकल्पात शुध्दीकरण केलेले सांडपाणी संस्थानचे गार्डन वापरासाठी घेणे तसेच नगरपंचायतीकडून विशेष आरोग्य रक्षण करात सुट घेणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३६२** **सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, नगराध्यक्षा व नगरसेवक यांना योग्यवेळी सभेसमोर समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **श्री साईनाथ रुग्णालयामधील प्रशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी श्री साईबाबा हॉस्पिटलप्रमाणे फर्निचर आणि काऊंटर तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाची सध्याची दैनंदिन ओ. पी. डी. रुग्णांची संख्या ८०० ते ९०० इतकी आहे. तसेच दाखल रुग्णांची संख्याही जवळपास २०० ते २५० इतकी असते. यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. तसेच रुग्णालयात नव्याने विविध प्रकल्प राबविणेत येत असून, रुग्णालयातील प्रशासकिय कामकाजातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यासाठी प्रशासकिय कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. परंतू सध्या असलेल्या उपलब्ध जागेत कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी पुरेशी जागा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नसल्याने कर्मचारी वाढविणे शक्य होत नाही. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पीटल कार्यालयातील फर्निचर प्रमाणे फर्निचर तयार केल्यास कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी, संगणक ठेवण्यासाठी आणि कार्यालयात रेकॉर्ड ठेवणेसाठी जी कपाटे ठेवणेत आली आहेत त्यामुळे बरीच जागा व्यापलेली आहे. सदर फर्निचर केल्यामुळे कार्यालयीन रेकॉर्ड ठवेणेची व्यवस्थाही होईल व कपाटांसाठी लागणारी जागा मोकळी होऊन सदर जागेत अतिरिक्त कर्मचारी बसण्याची व्यवस्था करता येईल. त्यासाठी उपलब्ध जागेची बांधकाम विभागामार्फत समक्ष पहाणी करुन व वैद्यकिय अधिक्षक यांचेशी चर्चा करुन योग्य त्या साईजमध्ये फर्निचर तयार करुन मिळणेबाबत वैद्यकिय अधिक्षक यांनी त्यांचेकडील जा. क्र. ३२९/२०१३ दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

याकामी इकडील विभागामार्फत दि.१८ मार्च २०१३ पहाणी करण्यात आली असून, श्री साईनाथ रुग्णालय इमारत क्रमांक ०२ येथील पहिल्या मजल्यावर प्रशासकिय कार्यालय आणि अनुदान कक्ष असे एकुण (१६'x२८'-६") दोन कक्ष आहेत. प्रशासकिय कार्यालयात सध्या सात कर्मचारी आहेत आणि अनुदान कक्षात चार कर्मचारी आहेत, त्याऐवजी आता प्रशासकिय कार्यालयात नऊ आणि अनुदान कक्षामध्ये पाच कर्मचारी बैठक व्यवस्था करणे प्रस्तावित आहे. याकामी इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले ढोबळ अंदाजपत्रकानुसार ४,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

विषयांकीत फर्निचर कामासाठी आर्किटेक्ट यांची नेमणूक करुन सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे तयार करुन घेणे तसेच आर्किटेक्ट यांना द्यावयाचे फी बाबत विचारविनिमय होऊन, उपरोक्त कार्यालयातील फर्निचर तयार करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१ शैक्षणिक संकुल परिसरातील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल परिसरातील पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल शाळेकडील विविध कामे करुन मिळणेबाबत प्राचार्या यांनी त्यांचेकडील दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यामधील अ. नं. ४ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. शाळेचे इमारतीचे पुढील बाजूने भिंती लगतची जागा रिकामी असून, त्यावर बगीचा विभागामार्फत छोटी झाडे, झुडपे लावणेत आलेली आहे. सदर जागा ही विद्यार्थांना मधल्या सुट्टीत भोजन करण्याकामी वापरात येवू शकते. तसेही के. जी. तील मुलांना सध्या स्टेजवर भोजनासाठी बसविण्यात येत असुन सदरची जागा कमी पडते. तरी भिंतीलगत असलेले झाडे, झुडपे काढून त्या ठिकाणी सिमेंटचे ब्लॉक बसवून विद्यार्थ्यांना बसणेकामी व्यवस्था करुन मिळावी."

वरिलप्रमाणेचे मागणीनुसार सदरहू भागाची मोजमापे घेणेत आली असून, सदर ठिकाणी एकुण ५२०.४५ चौरस मिटर पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०११-१२ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसार रुपये ४,८२,४७३/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रुपये ४,८२,४७३/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल परिसरामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,८२,४७३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२ साईआश्रम भाग ०१ व ०२ येथे पार्किंग मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने "साई आश्रम" या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्णत्वास आले आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत इमारतींचे बांधकाम देणगीदाखल करण्यात आले आहे व प्रकल्पातील परिसर विकासाची कामे व इतर आवश्यक कामे संस्थानमार्फत पूर्ण करण्यात आली आहेत.

साई आश्रम भाग-१ व २ येथे भक्तांचे गाड्यांकरीता शिस्तबध्द, अद्ययावत व सुरक्षित अशी पार्किंग मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता मे.मासट्रान्स, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, पुणे या कंपनीचे प्रतिनिधी यांनी समक्ष साईटवर पहाणी केली आहे. दोन्ही साईटचा अभ्यास करुन त्यांनी पार्किंग मनेजमेंट सिस्टीम सादर केली आहे. त्यामध्ये भाग-१ व २ येथे खालीलप्रमाणे युनिटस् समाविष्ट केलेले आहेत.

१. Entrance Control Terminal
२. Exit Control Terminal
३. Parking Barrier

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



४. Manual payment system
५. Car Park Management System
६. Manual Payment Booth

उपरोक्त सिस्टीमकरीता त्यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| Sr.No | Description | Total Amount |
|---|---|---|
| 01 | Sai Ashram - Package - I | 79,66,510/- |
| 02 | Sai Ashram - Package - II | 71,05,915/- |
| | **Total Amount Rs.** | **1,50,72,425/-** |

मे. मासट्रान्स, पुणे यांचे दरपत्रकानुसार उपरोक्तचे दरांवर VAT व CST वेगळ्याने गृहीत धरावा लागणार आहे. तसेच Civil व Electrical ची काही आवश्यक कामे स्वतंत्रपणे करावी लागणार आहेत. यासाठी वेगळा वाढीव खर्च येईल. त्यासाठी कामाचे स्पेसिफिकेशन्स व व्याप्ती ठरविणेकरीता तसेच निविदा प्रपत्रे तयार करणेसाठी प्रथम या क्षेत्रातील तज्ञ अशा सल्लागाराची नेमणूक करणे उचित होईल असे मत आहे. तरी याकामी या क्षेत्रातील सल्लागारांची माहिती घेऊन त्यांचेकडून तांत्रिक व वाणिज्यिक प्रस्ताव मागविणेसाठी मा.त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ व ०२ याबरोबरच संस्थानमधील इतर आवश्यक ठिकाणी पार्किंग मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वीत करणेसाठी सल्लागार म्हणुन आर्किटेक्ट अविनाश डहाणूकर, पुणे यांची नेमणूक करणेबाबत कार्यवाही करणेत यावी व यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३** **शिर्डी येथील नगर-मनमाड रस्त्याखालून भुयारी मार्ग तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२ जून २०११ चे सभेतील निर्णय क्र.४०८ अन्वये शिर्डी शहरातून जाणाऱ्या अहमदनगर- मनमाड राज्यमार्ग क्र. १० चे खालुन खालील ठिकाणी रस्ता ओलांडणेकरीता प्रशस्त भुयारी मार्ग (Underpass) संस्थान निधीतून उभारणेस / विकसीत करणेस तत्वत : मान्यता देणेत आली होती.

१. श्री साईप्रसादालयाकडे जाणाऱ्या रस्त्यासमोर (निमगांव- शिव रस्त्याचे चौफुली जवळ)
२. जुना पिंपळवाडी रस्त्या समोर
३. नविन पिंपळवाडी रस्त्या समोर ( श्री हरी कॉम्प्लेक्स समोर)
४. शिर्डी बसस्थानकाजवळ
५. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान जवळ

तसेच उपरोक्त ठिकाणी भुयारी मार्ग तयार करणेकरीता प्रकल्प सल्लागार म्हणुन मे. सी. व्ही. कांड कन्सल्टंट्स प्रा. लि. पुणे यांची नेमणुक करण्यात यावी, याकामी त्यांना २ % अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी देणेस उपरोक्त व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये मान्यता देणेत आली होती. त्यानुसार त्यांना उपरोक्त संदर्भिय क्र. २ अन्वये Appointmet Letter देणेत आले आहे.

त्यानुसार, प्रकल्प सल्लागार मे. सी.व्ही.कांड कन्सल्टंट्स प्रा.लि. पुणे. यांनी Topographical Survey करुन या कामाचे रु. १८.२४ कोटी मात्र रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर केले. याबाबत झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये सदरचे काम थेट सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करुन घेणे उचित राहिल, संस्थानमार्फत याकामी उचित व आवश्यक निधी / आर्थिक सहाय्य टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देता येईल, अशा आशयाचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र. ६७१ अन्वये मान्यता देण्यात आली. सदरहु निर्णय क्र. ६७१ अन्वये अहमदनगर - मनमाड रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेबाबत खालीलप्रमाणे ठरले आहे.

".. तसेच सध्या अहमदनगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गाचे शिर्डी हद्दीतील डांबरीकरण व रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लवकरच सुरु होणे अपेक्षित आहे. हे काम होत असतांना शिर्डी साकुरी शिव ते शिर्डी निमगांव शिव या अंतरातील रस्ता कॉंक्रीटकरण करणे आवश्यक झालेले आहे. या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम जो कोणी ठेकेदार घेईल त्यास या अंतरातील कॉंक्रीटकरण कामासाठी येणारा अतिरिक्त भार संस्थानमार्फत उचलण्यास मान्यता देण्यात आली. याकामी मा. नामदार श्री. छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंतीपत्र देणेत यावे व विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा, असे ठरले."

वरीलप्रमाणे निर्णयाचे अनुषंगाने तात्कालीन अध्यक्ष मा. श्री. जयंत ससाणे यांनी मा. नामदार श्री. छगनराव भूजबळ, मंत्री सार्वजनिक बांधकाम व पर्यटन यांना जा.क्र. २९९ / दि. १२/०९/२०११ चे पत्राव्दारे नगर-मनमाड रस्त्याचे शिर्डी शहरातील लांबीसाठी भुयारी मार्ग ( Underpass ) व कॉंक्रीटीकरणाचा समावेश करणेची विनंती केली होती. तसेच त्यासाठी जो अतिरिक्त खर्च येईल त्याचा आर्थिक भार श्री साईबाबा संस्थानतर्फे उचलणेची बाब संस्थान व्यवस्थापनाचे विचाराधिन असून

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्याबाबत भेट घेऊन चर्चा करणेसाठी तारीख व वेळ मिळणेबाबत विनंती केली होती. तथापी सन्मा. मंत्री महोदय यांचेशी याबाबत चर्चा झाली काय, याविषयी इकडील विभागास माहिती नाही.

मा. श्री. राजीव शुक्ला, राज्यमंत्री, संसदीय कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवि दिल्ली यांनी दि.१८/०२/२०१२ चे पत्रान्वये श्री. निर्मल देशमुख, आय.ए.एस, कलेक्टर, मुंबई सब अर्बन, जिल्हा, मुंबई यांना, शिर्डी येथील Underpass करीता रु.२.०० कोटी मंजूर केले असून पुढील कार्यवाही करणेबाबत कळविले होते. याबाबत, कार्यकारी अभियंता, जा.बँ. प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी दि.०१/०६/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, नियोजन शाखा, अ.नगर यांना शिर्डी येथील भुयारी मार्गाचे बांधकाम करणेचे अंदाजपत्रक (अंदाजीत किमंत रु. ३५९.७९ लक्ष) एकाच ठिकाणी भुयारी मार्गाचे बांधकाम करणेचे असल्याने सदर अंदाजपत्रकात कपात करणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नाही असे कळविले आहे.

मा. जिल्हाधिकारी सो., अ.नगर यांनी दि.२३/०८/२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे की, मा. श्री. राजीव शुक्ला यांनी शिफारस केलेल्या रकमेव्यतिरिक्त रु.१५९.७९ लक्ष इतकी उर्वरीत रक्कम साई संस्थान स्वनिधीतून खर्च करत असल्यास तसे लेखी हमीपत्र त्यांचे कार्यालयास सादर करावे, हमीपत्रानंतरच सदर कामाच्या एकूण अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येईल. केंद्र शासनाच्या खासदार स्थानिक विकास क्षेत्र कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक तत्वानुसार सदर कामावर साईसंस्थानकडील रु.१५९.७९ लक्ष रक्कम प्रत्यक्ष खर्च झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच खासदार निधीतून रु.२ कोटी वितरीत करण्यात येतील.

मा. डॉ. संजीव कुमार, जिल्हाधिकारी अहमदनगर तथा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी जा.नं. २६८६ / दि. १७/०९/२०१२ रोजीचे पत्राव्दारे वरीलप्रमाणे आवश्यक असलेला रु. १५९.७९ लक्ष मात्र इतका उर्वरित निधी मंजूर करणेबाबत सन्मा. नामदार श्री. राजीव शुक्ला यांना विनंती केलेली आहे. तथापी त्याबाबत अद्याप काही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

आता मा. श्री. राधाकृष्ण ए. विखे पाटील मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषीत दिनांक १८ मार्च, २०१३ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

" .. नगर-मनमाड रस्त्यावरुन जड वाहनांची जास्त ये-जा चालू असते त्यामुळे रस्ता ओलांडताना अनेकदा भावीकांना सामोरे जावे लागते. अनेक भावीकांना गंभीर दुखपती झालेल्या आहेत. तर अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. ग्रामस्थ व साईभक्तांची गैरसोय दुर व्हावी म्हणून बसस्थानक, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल चौकात भुयारी सब-वे बांधणे आवश्यक आहे. सब-वे बांधकामासाठी रुपये ४.५० कोटी खर्च अपेक्षित असून, मा. ना. श्री. राजीव शुक्ला, केंद्रीय संसदीय कार्य राज्य मंत्री यांनी रु. २ कोटी निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे समजते. उर्वरीत रु. २.५ कोटी श्री साई संस्थानने उपलब्ध करुन दिल्यास पादचारी भावीकांची व विशेषतः विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. करीता शिर्डी येथे बसस्थानक चौकात सब-वे बांधकामासाठी आवश्यक निधी संस्थानतर्फे उपलब्ध करुन देणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी हि विनंती."

यापूर्वी झालेले निर्णयानुसार वरिलप्रमाणे पाच ठिकाणी भुयारी मार्ग (सब-वे) विकसीत करणेकामी प्रकल्प सल्लागार मे. सी. व्हि. कांड कन्स्ल्टंट प्रा. लि., पुणे यांनी सादर केलेल्या प्राथमिक आराखड्यानुसार एकूण रु.१८.२४ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जागतिक बॅक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांनी फक्त एका ठिकाणी भुयारी मार्ग तयार करण्याचे अंदाजपत्रक बनविले होते. त्यानुसार एका ठिकाणचे भुयारी मार्गासाठी रु.३.६० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

एकूण पाचही ठिकाणी भुयारी मार्ग करावयाचे झाल्यास सल्लागार यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार एकूण रु.१८.२४ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी मा.श्री.राजीव शुक्ला, राज्यमंत्री, संसदीय कार्य, भारत सरकार यांनी उपलब्ध केलेला निधी रु.२ कोटी मात्र वजा जाता रु.१६.२४ कोटी इतका निधी संस्थानतर्फे उपलब्ध करावा लागेल. त्यासाठी प्रथम मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचीही परवानगी घ्यावी लागेल.

तरी शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्त्याखालून वरीलप्रमाणे एकूण पाच ठिकाणी भुयारी मार्ग करणेसाठी संस्थानतर्फे एकूण रु.१६.२४ कोटी मात्र इतका निधी अथवा मा. राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री कृषी व पणन यांनी कळविले नुसार उर्वरीत रु.२.५० कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबत मा.त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्त्याखालून प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकूण पाच ठिकाणी भुयारी मार्ग करणेसाठी येणाऱ्या एकूण रु.१८.२४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**तसेच, सदरहू प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४** **द्वारावती भक्तनिवास परिसरातील स्वयंसेवी प्रसाद भोजन कक्षाचे हॉलवरील टेरेसवर कापडी मंडपाची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. अध्यक्ष सो यांनी दिनांक ०७ मार्च, २०१३ रोजी व्दारावती भक्तनिवास स्वयंसेवी प्रसादभोज हॉलकडे घेतलेल्या राउंडचेवेळी साईभक्तांचे सोयीसाठी श्री साईनाथ रुग्णालय परिसरात असलेले प्रसादभोजन हॉलचे टेरेसवर मंडप उभारणी करुन भोजन व्यवस्था करणेबाबत निर्देश दिले असल्याचे अधिक्षक व्दारावती भक्तनिवास व श्री साईप्रसादालय यांनी कळविले आहे.

उपरोक्त निर्देशानुसार सदरहू ठिकाणी खालील तपशिलानुसार कापडी मंडपाची उभारणी करुन घेणेसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **परिमाण/ एकक** | **कालावधी** | **अंदाजे दर रु.** | **रक्कम ८५ दिवसाची** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | बांबू व गोल्ट्यामध्ये मंडपाची उभारणी करुन, आतिल बाजूने डबल अस्तरचे जाड कापड बांधणे.<br>साईज :<br>०१. ३०'x६०'= १८००<br>०२. ६०'x१००'= ६०००<br>**एकुण=७८००.००चौ. फु.** | ७८००.०० चौ. फुट | दि. ५/०४/२०१३ ते दि. १५/०६/२०१३ अखेर ६० दिवस | ०.४५ प्रति दिवस प्रति चौ. फुट | २,१०,६००.०० |
| | | | | **एकुण अपेक्षित खर्च रुपये..** | **२,१०,६००.००** |

तरी उपरोक्तप्रमाणे विषयांकित कामासाठी येणारे रु. २,१०,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी स्वयंसेवी प्रसाद भोजन कक्षाचे हॉलवरील टेरेस ऐवजी सदर कक्षाचे समोरील भागात फॅब्रिक शेड तयार करणेत यावे, असे ठरले.**
(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२५** **संस्थानचे मौजे शिर्डी येथील सौ.किरण राजेश भनसाळी व श्री.सोमेश दत्तात्रय वाबळे यांची जमीन स.नं.२०७/२ क्षेत्र ०० हेक्टर ८० आर जमिन खरेदी केली त्यांची उर्वरित रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मौजे शिर्डी येथील खाली नमुद केलेल्या खातेदारांची त्यांच्या समोर दर्शविलेली जमीन संस्थानने दिनांक २३ डिसेंबर २०१२ रोजी नोंदणी क्रमांक ६४९०/२०१२ अन्वये खरेदी केलेली आहे.

| अ. नं. | खातेदाराचे नांव | गावाचे नांव / सर्व्हे नंबर | ७/१२ च्या उताऱ्यानुसार खरेदी केलेले क्षेत्र | रु.३,५०,०००/- मात्र प्रति आर प्रमाणे जमिनीची खरेदी किंमत रुपये | खरेदीखतातील अटी शर्तीनुसार प्रत्यक्षात आदा करणेत आलेली ८० टक्के रक्कम रुपये | खरेदीखतातील अटी शर्तीनुसार संस्थानकडे राखून ठेवण्यात २० % आलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ०१ | सौ. किरण राजेश भनसाळी | शिर्डी २०७/२ | ०० हे ८० आर | २,८०,००,०००/ | १,३४,४०,०००/- | ३३,६०,०००/- |
| ०२ | श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे | | | | ०,८९,६०,०००/- | २२,४०,०००/- |
| | एकुण | | | २,८०,००,०००/ | २,२४,००,०००/- | ५६,००,०००/- |

त्यातील संस्थानने राखून ठेवलेली रक्कम रुपये- ५६,००,०००/- (अक्षरी रुपये छपन्न लाख) मात्र ही रक्कम खरेदी खतात कलम नं.१७ प्रमाणे पुर्तता केल्यानंतर द्यावयाची होती.

" तुम्हांस खरेदी दिलेल्या वरील मिळकतीची तुम्ही सरकारी मोजणी करुन व तुम्हाला खरेदी दिलेले ८० आर क्षेत्र सरकारी मोजणीनुरुप आम्ही निश्चित करुन देऊ. तुम्हांस सदर क्षेत्राच्या हद्दीच्या खुणा निश्चित करुन दिल्यानंतर व तुमचे ८० आर क्षेत्र निश्चित करुन दिल्यानंतर तुम्ही आम्हांला

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तुमचेकडे राहिलेली खरेदी खताचे भरण्याची २० टक्के रक्कम रुपये ५६,००,०००/- (अक्षरी रुपये छपन्न लाख ) मात्र आम्हांस द्यावयाची आहे."

संस्थानने दिनांक १२ मार्च २०१२ रोजी मा.उपअधिक्षक,भूमि अभिलेख,राहाता यांचेकडेस मोजणी करणेसाठी अर्ज देण्यात आलेला होता.

त्यानुसार मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांचे कार्यालयाचे भूकरमापक, पूर्वाश्रमीचे जमीनमालक, लगतचे खातेदार व संस्थान प्रतिनिधी यांचे उपस्थितीत दिनांक १४ मे, २०१२ व दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. भूमि अभिलेख विभागाने उपरोक्त जमिनीचा मोजणी नकाशा दिनांक २३ ऑक्टोबर, २०१२ रोजी इकडील कार्यालयास सादर केलेला आहे.

बांधकाम विभागाचे पाहणीनुसार , खरेदीखतात नमूद केलेप्रमाणे व ७/१२ वर असलेल्या नोंदीप्रमाणे तसेच मोजणी नकाशातील रेखांकनाच्या मोजमापानुसार संस्थानने खरेदी घेतलेल्या मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ चे क्षेत्र ०० हे ८० आर बरोबर भरत आहे. जमिनीचे क्षेत्रामध्ये ४ ठिकाणी सिमेंटचे खांब निशाणीसाठी रोवणेत आलेले आहेत.

**ब)** त्यामुळे उपरोक्त खातेदारांना (मुळ मालकांनी) त्यांची उर्वरित रक्कम आदा करणेबाबत मागणी केली त्याप्रमाणे त्यांना रक्कम अदाईची कार्यवाही (भूसंपादन) बांधकाम विभागाकडून चालू असतांना रक्कम अदाईसाठी मुख्य लेखाधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेची आवश्यकता वर्तविणेत आल्यामुळे त्यानंतर सदर कामी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर केलेले प्रस्तावावर दिनांक ८ नोव्हेंबर २०१२ रोजीच्या सभेत प्रस्तुत विषय मांडण्यात आला त्यावर निर्णय क्रमांक ८६६ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ क्षेत्र ८० आरचे पूर्वाश्रमीचे जमीनमालक / खातेदार सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे यांना त्यांचे जमिनीचे खरेदीपोटी संस्थानने राखून ठेवलेली २० टक्के रक्कम, खरेदीखतातील अटी - शर्तीची पूर्तता झाल्याने आदा करणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढे संस्थानचे वकीलामार्फत अर्ज सादर करावा व त्यांचे मान्यतेनंतर रक्कम अदा करण्यात यावी, असे ठरले. "

सदर निर्णयानुसार उपरोक्त ठरावानंतर मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रक्कम अदाईसाठी सिव्हील अर्ज तयार करुन घेवून दाखल करणेची कार्यवाही देखील चालू करण्यात आली होती.

परंतू मुळ मालकाची उर्वरित रक्कम अदाईसाठी मा.कोर्टाची परवानगीची आवश्यकता भासणार नाही. याबाबत मा.कोर्टाचे सिव्ही ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ दिनांक १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील Clause No.६ (b) प्रमाणे- shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No. २-trust ; असे निर्देश आहेत.

उपरोक्त जमीनीचा व्यवहार हा दिनांक १६/१०/२०१२ रोजीच्या तारखेपुर्वीचा आहे. त्याला सदरची बाब लागू होणार नाही असे नम्र मत आहे.

**क)** दरम्यान मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ७ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ११३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊ न, दिनांक ०८/११/२०१२ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक ८६२ अन्वये संस्थानमधील सर्व कारणांसाठीचे रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये- दहा लाख ) मात्र किंवा त्यापुढील खर्चाची देयके मा.व्यवस्थापन समिती सभेतचे पुर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच पारीत करणेत यावीत, असे ठरलेले आहे.

सदरहू निर्णयामुळे पुरवठाधारक/ठेकेदार यांनी पुरवठा आदेशातील काम पुर्ण करुनही सदर कामाबाबतची देयके आदा करणेस उशीर होतो व पुरवठाधारक/ठेकेदार संस्थानला बाकी असलेल्या रकमेबाबत येणारी रक्कम व्याजासह मिळावी, अशा नोटीसा पाठवितात.

पुरवठाधारक/ठेकेदार यांची देयके प्रलंबीत राहिल्यास व त्यांनी उर्वरीत रकमेची व्याजासह मागणी केल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होऊन, लेखापरिक्षणातील आक्षेपांना विनाकारण सामोरे जावे लागेल. तसेच भविष्यात पुरवठाधारक मालाचा पुरवठा करणार नाहीत. याबाबी विचारात घेऊन संस्थानचे बांधकाम, विद्युत व इतर कोणत्याही विभागांची पुरवठाधारक/ठेकेदार यांचेमार्फत पुर्ण झालेल्या किंवा चालू असलेल्या विविध कामांची व त्यानुषंगिक इतर बाबींची तसेच, आर्किटेक/ सल्लागार यांची देयके त्वरीत आदा करणेत यावीत, असे ठरले "

सदर निर्णयाचे अवलोकन केले असता यापुर्वी जे काम चालू आहे त्यांचे पुरवठाधारक/ठेकेदार यांची बीले देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने अनुमती दिलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मात्र निर्णयात स्पेसिफीक जमीन खरेदीचा व्यवहाराचा उल्लेख नाही, परंतु ठरावात विविध चालू असलेल्या कामाचा व त्या अनुषंगिक इतर बाबींचे देयके त्वरीत अदा करावीत असे अंतर्भुत करणेत आलेली आहे. खरेदी खतामध्ये नमुद केलेल्या क्षेत्राचा ताबा मिळालेला आहे. अशा सर्व परिस्थितीत जमीन मालकांना उर्वरित रक्कम देणेबाबत निर्णय होणे उचित राहिल.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.

सौ.किरण राजेश भनसाळी व श्री सोमेश दत्तात्रय वाबळे यांची जमीन मौजे शिर्डी येथील स.न. २०७/२ क्षेत्र ० हे. ८० आर संस्थानला प्राप्त झालेली आहे. सदर क्षेत्र संस्थानच्या ताब्यात आहे. खरेदी खतात राखून ठेवलेली सौ.किरण राजेश भनसाळी यांची रक्कम रुपये ३३,६०,०००/- (तेहतीस लाख साठ हजार मात्र ) तसेच श्री.सोमेश दत्तात्रय वाबळे यांची रक्कम रुपये २२,४०,०००/- (बावीस लाख चाळीस हजार मात्र ) आदा करणेस मंजूरी देणे.

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.किरण राजेश भनसाळी व श्री सोमेश दत्तात्रय वाबळे यांची मौजे शिर्डी येथील स.न. २०७/२ क्षेत्र ० हे. ८० आर जमीन दि.२३.१२.२०१२ रोजीचे खरेदी खताने संस्थानला प्राप्त झालेली असून सदर क्षेत्र संस्थानच्या ताब्यात आहे. यामुळे खरेदी खतात राखून ठेवलेली सौ.किरण राजेश भनसाळी यांची रुपये ३३,६०,०००/- मात्र तसेच श्री.सोमेश दत्तात्रय वाबळे यांची रुपये २२,४०,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२६** **शिर्डी येथील जुना प्रसादालय परिसर, साईउद्यान व लेंडीबागेजवळील परिसरात साईभक्तांची पादत्राणे व मोबाईल हॅण्डसेट ठेवण्यासाठी "उभारा व सशुल्क सेवा द्या" (Design- Build Operate- Transfer) तत्वावर व्यवस्था उभारणीसाठी करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम,२००४ मधील तरतूद :-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणेची तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

दिनांक १४/०७/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत उपरोक्त विषयाबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र.४९३ संमत करण्यात आलेला आहे.

"साईभक्तांचे सोयीसाठी संस्थान परिसरात विविध ठिकाणी पादत्राणेगृह व मोबाईल स्टॅण्ड (पदत्राणे व इलेक्ट्रॉनिक साहित्य जतनगृह) " उभारा व सशुल्क सेवा द्या" या तत्वावर सुरु करणेसाठी प्रथम जागा निश्चित करावी व विहीत पध्दतीने वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागवून चर्चा-वाटाघाटीव्दारे अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले."

**प्रस्तावना :-**

मा. व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयानुसार याकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेत आल्या असता विहित मूदतीत खालील ०२ संस्थांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. जय भद्रा प्रतिष्ठाण, केडगांव (देवी), अहमदनगर

२. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसा, शिर्डी

सदरहू कामाची निविदापूर्व बैठक जाहिरातीत नमूद केलेनुसार दि.१८/०३/२०१३ रोजी सकाळी ११ वाजता संस्थानचे शिर्डी येथिल सभागृहात आयोजीत करणेत आली होती. सदर बैठकीस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसा., शिर्डी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते व जय भद्रा प्रतिष्ठाणचे प्रतिनिधी उशीराने सभेकरीता आले होते. दोन्ही संस्थांनी निविदेसंदर्भातील आपले मुद्दे लेखी स्वरुपात सादर केले होते व सिलबंद निविदा सादर करणेसाठी निविदाधारकांनी मूदतवाढीची मागणी केली होती. त्यानुसार इकडील विभागाचे जा.नं.५८९७ दि.२५/०३/२०१३ रोजीचे पत्रान्वये निविदापूर्व बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण व सुधारणांचा तक्ता ठेकेदार यांना पाठविण्यात आला होता. तसेच सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि.३०/०३/२०१३ रोजी सायं. ०६:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती. विहीत मूदतीत फक्त श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को. ऑप सोसा., शिर्डी यांची एकच सिलबंद निविदा (आवक क्र.२००५७, दि.३०/०३/२०१३) प्राप्त झालेली आहे.

**प्रस्ताव :-**

वरीपैकी एक निविदाधारक मे. जय भद्रा प्रतिष्ठाण, अहमदनगर चे अध्यक्ष यांनी दि.३०/०३/२०१३ रोजी फॅक्सव्दारे पाठविलेल्या पत्रान्वये निविदा दाखल करणेस मूदतवाढ देणेची विनंती

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



केली आहे. मे. जय भद्रा प्रतिष्ठाण यांचे सदरहु पत्र सोबत अवलोकनार्थ जोडले आहे. सदरहू पत्रातील शेवटचा परिच्छेद खालिलप्रमाणे आहे.

" आम्ही व दुसऱ्या निविदाधारक संस्थेने उपस्थित केलेल्या शंके बाबत आम्हाला लेखी किंवा तोंडी काहिच कळविले नाही. त्यामुळे निविदाप्रक्रियेत आमची निविदा टाळण्याचा प्रत्यत्न होत आहे असे आम्हास वाटते.

तरी आपण निविदा दाखल करण्यास मूदतवाढ दयावी अन्यथा आम्हास न्यायालयाचा मार्ग अवलंबवावा लागेल व होणाऱ्या नुकसानीस संस्थानचे कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी."

निविदा बैठकीची तारीख व वेळ ही निविदा सूचनेतच प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार निविदाधारक मे. जय भद्रा प्रतिष्ठाण, अहमदनगर यांनी त्यावेळी उपस्थित राहणे आवश्यक होते. तथापी त्यानंतरही त्यांचेकडून आलेल्या प्रतिनिधीकडून त्यांना निविदेसंदर्भात असलेल्या शंका लेखी स्वरुपात घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर दि.२५/०३/२०१३ रोजीचे पत्रान्वये दोन्ही निविदाधारकांना त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण पाठविण्यात आले होते. त्यामुळे मे. जय भद्रा प्रतिष्ठाण, अहमदनगर यांनी वरीलप्रमाणे दि.३०/०३/२०१३ रोजी फॅक्सव्दारे पाठविलेल्या पत्रामध्ये नमूद केलेल्या आक्षेपांमध्ये तथ्य असल्याचे दिसून येत नाही.

श्री. प्रमोद ज्ञानदेव गोंदकर पा., अध्यक्ष (अहमदनगर जिल्हा) भारतीय मानवाधिकार असोसिएशन, शिर्डी यांनी दि.०२/०७/२०१३ रोजीचे पत्रान्वये जुनी लेंडी बाग, साई उद्यान, साईनाथ छाया इमारत व जुने प्रसादालय या ठिकाणी जागा व व्यवस्था उपलब्ध करुन दिल्यास ग्रामस्थ त्या ठिकाणी चपला व मोबाईल स्लॅण्डसाठी विना मोबदला सेवा देण्यास तयार असल्याचे कळविले आहे. श्री प्रमोद ज्ञानदेव गोंदकर यांचे सदरहु पत्र सोबत अवलोकनार्थ ठेवले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील पी आय एल नं.१८ सन २०११ मधिल सिव्हील ॲप्लिकेशन नं.४४७९ सन २०१३ मध्ये अर्जदार यांनी संस्थानने बीओटी तत्वावर निविदा मागविण्यापुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे कलम १७ (३) नुसार राज्यशासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते असे नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

तरी वरील बाबींचा विचार करता, मे. जय भद्रा प्रतिष्ठाण, अहमदनगर यांना जरी मूदतवाढ दिली तरीही एकूण दोनच निविदा प्राप्त होतिल. या महत्त्वाचे व्यवस्थेसाठी केवळ दोनच निविदांवर निर्णय घेणे उचित होणार नाही असे मत आहे. त्यासाठी सदरहू निविदा प्रक्रीया रद्द करुन श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि; शिर्डी यांचेकडून प्राप्त झालेली एकच सिलबंद निविदा त्यांना परत करता येईल. तरी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती. तसेच श्री. प्रमोद ज्ञानदेव गोंदकर पा. यांचे वर नमूद केलेल्या दि.०२/०४/२०१३ रोजीचे पत्रावर विचारविनीमय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील जुना प्रसादालय परिसर, साईउद्यान व लेंडीबागेजवळील परिसरात साईभक्तांची पादत्राणे व मोबाईल हॅण्डसेट ठेवण्यासाठी "उभारा व सशुल्क सेवा द्या" (Design- Build Operate- Transfer) या तत्वावर व्यवस्था उभारणीसाठी फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी. तसेच, श्री.प्रमोद गोंदकर व गावकरी यांना योग्यवेळी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता Electromechanical Operation Table with Remote खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Electromechanical Operation Table with Remote ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेले ०३ नग O.T Table हे वापरुन खराब झालेला असल्यामुळे त्यांनी दि.१५/०२/२०१२ रोजीचे मागणीपत्रान्वये ०४ नग Electromechanical Operation Table with Remote ची मागणी केलेली आहे. त्यापैकी ०२ टेबल हे तातडीने पाहजे असल्याने सदरचे खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे तर उर्वरित ०२ टेबल खरेदी करावयाचे आहे.

सदर ०२ नग Electromechanical Operation Table with Remote खरेदीकामी M/s. IVES Healthcare Pvt. Ltd., Ahmedabad यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. IVES Healthcare Pvt. Ltd., Ahmedabad यांनी दि.१६/०१/२०१३ चे पत्रान्वये सदर Electromechanical Operation Table with Remote चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| Sr. no. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Electromechanical Operation Table with Remote<br>Surgident Electromac 1- Electro Mechanical Operation Table<br>• Five section x-ray translucent top<br>• In-built kidney bridge<br>• Interchangeable head & leg section<br>• 304 grade stainless steel fully electro-polished<br>• Minimum height 30<br>• Maximum height 44<br>• Die pressed SS cover on base<br>• Very heavy base for total stability<br>• Electric floor locking mechanism<br>• Provides all surgical positions via corded remote<br>• Additional control on table top<br>• Fully electro polished stainless steel<br>• Base size: 50mm thick x 60 density<br>• Mattress Size : 50mm thick x 60 density<br>• Side railing 30mm x 10mm<br>• Approx . weight 250 kg | 2 | 2,45,000.00 | 4,90,000.00 |
| 2 | Laminectomy frame | 01 | 22,000.00 | 22,000.00 |
| 3 | Retroscopy attachement | 01 | 22,000.00 | 22,000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **5,34,000.00** |

उपरोक्त ०२ नग Electromechanical Operation Table with Remote खरेदीकामी अंदाजे रु.५,३४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा ०२ नग Electromechanical Operation Table with Remote विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.५,३४,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागामध्ये विविध शस्त्रक्रिया करणेकरिता आवश्यक असलेले ०२ नग Electromechanical Operation Table with Remote विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५,३४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **सौ.विद्या विजय कदम, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** सौ. विद्या विजय कदम या संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे परिसेविका म्हणुन कार्यरत आहेत. त्यांनी दि. १९.०७.२०१२ रोजीच्या अर्जान्वये एम. एस्सी. नर्सिंग प्रशिक्षणासाठी असाधारण रजेची मागणी केली होती. परंतु दि. २९.०९.२०१२ रोजीचे पत्राने त्यांना कळविणेत आले आहे की, तुम्हास यापूर्वी बी. एच. एम. एस. चे शिक्षणासाठी एकूण ५ वर्षे रजेवर सोडण्यात आलेले असल्याने रजेचे नियमा नुसार तुम्हास आता रजेवर सोडता येणार नाही. त्यानंतर त्यांनी पुनश्चः दि.०५.११.२०१२ रोजीचे अर्जान्वये अध्ययनासाठी असाधारण रजेची मागणी केली होती. त्यांना इकडील दि. ०४.१२.२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे कि, तुमचा दि. ०५.११.२०१२ रोजीचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर सौ. कदम यांनी दि. ०५.१०.२०१२ ते दि. ०५.११.२०१२ अखेर ३२ दिवस अर्जित रजा उपभोगलेनंतर दि. ०६.११.२०१२ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू त्या दि. ०६.११.२०१२ पासुन सतत, सलग, विना परवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्यांच्या अशा वागण्यामुळे रुग्णालयातील दैनंदिन कामकाजात अडचणी येतात. रुग्ण सेवेत अडथळे येतात. त्याबद्दल इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/८०८१/२०१३ दि. ०४.०१.२०१३ अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवून कळविणेत आले होते कि, सदरचे पत्र मिळताच सात दिवसांचे आत विना परवानगी गैरहजेरी बाबत लेखी खुलासा वैद्यकीय संचालक यांचे मार्फत सादर करुन कामावर हजर व्हावे. अन्यथा तुमचेवर कडक शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. तरी देखील सौ. कदम कामावर हजर झाल्या नाहीत.

त्यांनी दि. २२.०१.२०१३ रोजीच्या अर्जान्वये रजेबाबत फेरविचार करणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/८९७५/२०१३ दि. २२.०२.२०१३ अन्वये त्यांना रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे कळविणेत आले कि, तुम्ही एम. एस्सी. नर्सिंग अध्ययनासाठी नियमा प्रमाणे संस्थान व्यवस्थापनाची पूर्व परवानगी घेतलेली नाही. तुम्ही रजा मंजूर नसतांना गैरहजर आहात.

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ चे प्रकरण सात मधील नियम क्र. ८० (१), नियम क्र. ८० (२) (बी) (१), ८० (३) (ए), ८० (६) नुसार तुमची अध्ययन रजा मंजूर करता येत नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी तुम्ही सदरची नोटीस मिळताच सात दिवसांचे आंत कामावर हजर व्हावे अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

त्यानंतर सौ. कदम सदरचे पत्र मिळून देखील कामावर हजर झाल्या नाहीत. याबाबत त्यांनी दि. ११.०३.२०१३ रोजीचा खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, मी अर्जित रजेची मागणी केली होती. त्यानंतर श्री दत्तात्रय गायकवाड अधिपरिचारक यांना माझ्या पदाचा पदभार वैद्यकीय संचालक यांचेमार्फत देण्यात आलेला आहे. मी एमएस्सी नर्सिंगचा प्रवेश घेण्यापूर्वी पासूनच आपणास कळवित आलेले आहे. माझे ॲडमिशन दि. २८.०९.२०१२ रोजी म्हणजे आपले दुसरे पत्र (रजा मंजूर करता येणार नसल्याचे उल्लेख असलेले) मिळणे अगोदरच झालेले आहे. निर्णय घेण्यास अवधी कमी असल्याने ॲडमिशन घेणेस संस्थान व्यवस्थापनाचा निर्णय होईपर्यंत थांबू शकत नव्हते. अभ्यासक्रमाचे जवळ-जवळ एक वर्ष संपत आले आहे अजून एक वर्ष बाकी आहे. मी सन २०११ मध्ये पदवी परिक्षेत मिळवलेले सुवर्णपदक याचा विचार करता याही परिक्षेत मी चांगले गूण मिळविल. संस्थान सेवेत इतरही कामगार विनापरवानगी काहीही न कळविता गैरहजर आहेत. त्यांचे बाबत संस्थानने टोकाची भूमिका न घेता सौम्य धोरण स्विकारले आहे. बीएस्सी नर्सिंग व एमएस्सी नर्सिंग साठी रजा दिलेली आहे. माझ्या वाढलेल्या शैक्षणिक पात्रतेचा संस्थेला व रुग्णांना फायदा होणार आहे. मला संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे नसून अपरिहार्य व आवश्यक कारणाने मी तूर्त रुजू होवू शकत नाही. माझे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करु नये. तसेच दि. ०६.११.२०१२ पासुन वेतन व शैक्षणिक अनुदान देणेबाबत विचार करावा हि विनंती. एमएस्सी नर्सिंगचे शिक्षण झाल्यानंतर कामावर रुजू होण्याचा विचार आहे. यावरुन असे दिसते कि, सौ. कदम संस्थानने दिलेल्या पत्रांना जुमानत नाहीत. त्या सध्या कामावर हजर होऊ ईच्छित नाही.

येणेप्रमाणे सौ. विद्या कदम यांना चार वेळा रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे कळवून देखील त्या कामावर हजर झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत त्यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणे योग्य होईल.

तरी प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.विद्या विजय कदम, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल या विनापरवानगी सलग, सतत गैरहजर असल्याने त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे दिसून येते. त्यामुळे त्यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **मानद वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून नेमणूक होणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. मिलिंद एम नवलाखे, मुंबई (MS (ENT) FCPS, DORL) यांनी दिनांक ०४/०३/२०१३ रोजीच्या अर्जान्वये श्री साईनाथ रुग्णालयात मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून पुन्हा नेमणूक मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

डॉ. मिलिंद एम नवलाखे, मुंबई हे यापुर्वी श्री साईनाथ रुग्णालयात मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून सन २००८ पासून तात्पुरत्या नेमणूकीवर रु.१०००/- प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता प्रवास खर्चासहीत इतक्या मानधनावर काम पहात होते. त्यानंतरही त्यांना वेळोवेळी मुदत वाढ देणेत आलेली आहे.

त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४९ नुसार त्यांचे मानधनात रु.१,०००/- ऐवजी रु. १,५००/- प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता इतके मानधनात वाढ करुन, (प्रवास खर्चासहीत) त्यांचे मानद पध्दतीचे तात्पुरत्या नेमणूकीची मुदतवाढ दिनांक ०१/०२/२०११ ते दिनांक ३१/०१/२०१२ अखेर पर्यंत करणेत आली होती.

मध्यंतरीच्या कालावधीत ते Cochlear Implants and Endoscopic Salivary gland Surgery चे प्रशिक्षणासाठी परदेशात गेले होते. त्यांनी दिनांक ०४/०३/२०१३ रोजीचे अर्जान्वये संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात पुन्हा मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी.) म्हणून सेवा करणेची संधी द्यावी म्हणून इच्छा व्यक्त केली आहे.

डॉ. मिलिंद एम. नवलाखे, मुंबई यांना पुर्वीच्या अटी - शर्तीनुसार दोन महिन्यातुन एकदा रु.१,५००/- प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता मानधन प्रवास खर्चासहीत देऊन मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी) म्हणून तात्पुरती एक वर्षाकरिता नेमणूक देता येईल.

तरी डॉ. मिलिंद एम. नवलाखे, मुंबई यांना मानद वैद्यकीय अधिकारी (ई.एन.टी) म्हणून श्री साईनाथ रुग्णालयात तात्पुरत्या नेमणूकीवर घेणेसाठी चर्चा होऊन, निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३०** **श्री साईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागाकरीता Dialyazer Reprocessing Machine देणगी स्विकारणेबाबत व त्यासाठी लागणारे केमिकल्सचे दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागात एकूण ४ डायलेसीस मशिन आहे. सदर चार डायलेसीस मशिनवर दररोज सरासरी १६ डायलेसीस होतात. एका रुग्णाचे डायलेसीस करतांनी सध्या एक डायलेझर वापरण्यात येऊन तोच डायलेझर पुन्हा Sterile करुन त्याच रुग्णास कमीत कमी २ वेळेस वापरण्यात येतो. त्यामुळे रुग्णास प्रार्दुभाव होऊ शकतो.

M/s. Atlantic Bio Medical, Mumbai या कंपनीने RENACLEAN plus नावाचे मशिन बाजारात उपलब्ध असून सदर मशिनमध्ये डायलेझर हा Automatic धुतला जातो व त्यामुळे सदर डायलेझर धुणेकामी लागणारे सोल्यूशन ($H_2O_2$ व Hypochloride Solution) देखील कमी प्रमाणात लागते शिवाय मशिनवर धुतलेमुळे डायलेझर व्यवस्थित स्वच्छ होऊन रुग्णास प्रार्दूभाव होत नाही. त्यामुळे एक डायलेझर त्याच रुग्णास कमीत कमी ८ ते १० वेळा देखील वापरता येऊ शकेल. ज्यामुळे दैनंदिन डायलेझरची संख्या कमी होऊन आर्थिक बचत होईल, त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| **सध्याच्या कार्यपध्दतीने येणारा खर्च** | | **नवीन मशिनचे वापरामुळे येणारा खर्च** | |
|---|---|---|---|
| एक वर्षासाठी लागणारे डायलेझरची संख्या | ४५२ | मशिनमुळे एका वर्षासाठी लागणारे डायलेझरची संख्या | २२५ |
| एका डायलेझरची किंमत | रु.४९०.०० | एका डायलेझरची किंमत | रु.४९०.०० |
| एक वर्षाचा डायलेझरचा खर्च | रु.२२१४८०.०० | मशिनमुळे एक वर्षाचा डायलेझरचा खर्च | रु.११०२५०.० |
| | | मशिनमुळे एक वर्षात होणारी आर्थिक बचत | रु.१११२३०.० |

त्यामुळे डायलेसीस विभागाने दि.१६/०३/२०१२ रोजीचे मागणीपत्रकान्वये Atlantic या नामांकित कंपनीच्या १ नग २ Station Dialyzer Reprocessing Machine (Version ७.१२) ची मागणी केलेली आहे. सदर Dialyser Reprocessing Machine मशिन खरेदी केल्यावर पूर्णतः मशिनवर Sterilisation होणार आहे. त्यामुळे एका रुग्णाचा दुसऱ्या रुग्णास प्रार्दुभाव (Infection) होण्याची शक्यता ही खुपच कमी होणार आहे.

सध्या आपणाकडे $H_2O_2$ (Liq.Hydrogen Peroxide ४००ml) वापरुन मॅन्यूअली Sterilisation करण्यात येते परंतु यामध्ये प्रार्दुभाव (Infection) होण्याची शक्यता जास्त असू शकते. एका $H_2O_2$ ४००ml बॉटलमध्ये एक डायलेझर ४ वेळा वॉश होतो एका $H_2O_2$ ४००ml बॉटलची किंमत रु.१३.८० इतकी आहे. तर ४ वेळा डायलेझर वॉश केल्यामुळे प्रती वॉशींगसाठी रु.३.४५ इतका खर्च येतो. ४५२ डायलेझरकरिता सध्या एका वर्षासाठी ३६० बॉटल लागतात. त्यासाठी वार्षिक खर्च रक्कम रु.४९६८/- इतका येईल (४५२ x ४ = १८०८ x ३.४५ = ६२३७)

मशिनसाठी वापरावयाचे कंपनीने दिलेले सोल्यूशन Renaclean ५ Ltr. याची किंमत प्रती ५ लिटर कॅन रु.२३१०/- इतकी आहे व एका डायलेझर वॉशिंगसाठी २६ml सोल्यूशन लागते. त्यानुसार एक कॅन सोल्यूशनमध्ये १९२ वॉशिंग होतात. (५०००ml इ २६ml = १९२ वॉशिंग) त्यानूसार एका वॉशसाठी अंदाजे किंमत रु. १२.०३ प्रती डायलेझर खर्च येईल (रु.२३१० इ१९२ वॉशिंग = रु.१२.०३) तर एका वर्षाकरीता २२५ डायलेझर याप्रमाणे x एक डायलेझर ८ वेळा वॉशिंग=१८०० वेळा होईल. एका वर्षाचे वॉशिंगसाठी केमिकल्सचा खर्च अंदाजे रु.२१६५४/- येईल. (२२५ x ८ x १२.०३ = २१६५४) म्हणजेच वॉशिंगचा खर्च वाढणार आहे परंतु सदर मशिनवर डायलेझर वॉश केल्यामुळे रुग्णास प्रार्दुभाव (Infection) होण्याची शक्यता खुपच कमी होईल. त्यामुळे सदर मशिन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सदर मशिन एकूण २७ रुग्णालयात दिलेले आहे.

सुरुवातीस सदर मशिन खरेदी करण्याचा प्रस्ताव होता. परंतु M/s. Atlantic Bio Medical, Mumbai यांनी त्यांचे दि.२२/०५/२०१२ चे ई-मेल पत्रान्वये ते आता सदर मशिन देणगी म्हणून देण्यास तयार असून त्याची अंदाजे किंमत रु.३,५०,०००/- इतकी आहे. सदर मशिनद्वारे डायलेझर वॉशिंग केले जाते त्या मशिनसाठी त्याच कंपनीचे केमिकल्स लागतात व त्यांचे दर देखील ते पुढील तीन वर्षाकरीता निश्चित करावयास तयार आहे. परंतु सध्या त्यांचेकडुन तुर्तास एक वर्षाकरिता दर निश्चित करुन मशिनचा वापर अनुभव इत्यादी बाबींचा विचार करुन पुढील निर्णय घेण्यात येईल. सदर केमिकल्सचे त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | RENACLEAN Cold Sterilant (Packing in 5 Ltr Canister) | 1 | 2310.00 | 2310.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तेव्हा M/s. Atlantic Bio Medical, Mumbai यांना वरील केमिकल्सचे दरात अजून सूट मिळणेकामी मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीकरुन दर पुढील एक वर्षाकरीता निश्‍चित करुन घेता येतील.

तरी वरीलप्रमाणे मशिन देणगी म्हणून स्विकारण्यास व त्यासाठी लागणारे केमिकल्सचे दर चर्चा/ वाटाघाटीकरुन पुढील एक वर्षाकरीता निश्‍चित करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील डायलेसीस विभागाकरीता M/s. Atlantic Bio Medical, Mumbai ही कंपनी देणगी देत असलेल्या Dialyazer Reprocessing Machine साठी त्याच कंपनीचे केमिकल्स लागतात, याकरिता सदरहू मशिन देणगी घेण्याऐवजी इतर कोणत्याही कंपनीचे केमिकल्स चालतील अशा प्रकारची मशिन खरेदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१ रुग्णालयांचे जावक विभागाकरिता रिमोटली ऑपरेटींग फ्रँकींग मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये रुग्णालयांकडील टपाल, वैद्यकिय आर्थिक अनुदान चेक/डीडी , औषध पुरवठादाराचे आदेश, बीले वगैरे टपाल प्रशासन शाखेकडील टपाल विभागामार्फत पाठविणे ऐवजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दोन्ही रूग्णालयासाठी स्वतंत्र जावक विभाग तयार करण्यात आलेला असून सदर कामकाजासाठी इलेट्रॉनिक फ्रकिंग मशीन मॉडेल-निओपोस्ट ५४०० पुरविण्यात आलेले आहे. सदर फ्रकिंग मशीनची पोस्टाकडील परवाना मुदत दि ३१.१२.२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

**विषय नं.४३ पानमळा (सर्व्हे नंबर-१२५) गोडाऊन येथील परिसरात बसवावयाच्या ५० एच.पी.मोटारकरीता केबल टाकणे व अनुषंगिक कामातील वाढीव बीलाच्या रक्कमेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** पानमळा (सर्व्हे नंबर-१२५) गोडाऊन येथील परीसरात बसवावयाच्या ५० एच.पी.मोटारकरीता केबल टाकणे व अनुषंगिक कामे करुन घेणेकामी मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४-०७-२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्र.२३ निर्णय क्र.४६९ अन्वये मे.हिंदुस्थान इनरमॅक्स, नाशिक यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन मे.हिंदुस्थान इनरमॅक्स, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/ विद्युत /१९७६ /२०१२ दिनांक ०१-०८-२०१२ अन्वये रू. ३,७५,०००.०० इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

संस्थानचे साईनगर परिसरातील इले.सबस्टेशन मधून भांडार विभागाचे नविन गोडाऊन इमारतीपर्यंत ७० स्क्वे.एम.एम. आर्मड इले.केबल सुरक्षिततेच्या दष्टीने १५. से.मी. डायमीटरच्या आर.सी.सी. ह्युम पाईप मधून टाकली आहे. सदरचे पाईप जमिनीमध्ये ३ फुट खोदाई करुन टाकले आहेत परंतु साईनगर सबस्टेशन पासून गोडाऊन इमारतीपर्यंत अंतर ४०० मिटर लांब असल्यामुळे केबल पाईपमधून ओढण्यासाठी ठराविक अंतरावर सोईस्कर जागी चेंबर करावे लागतात त्या प्रत्येक चेंबरमध्ये कर्मचा-यांना आतमध्ये उतरुन वाकून ताकदीने केबल ओढावी लागते. त्यामुळे कर्मचा-यांस वाकून उभे राहणेसाठी साधारण ४' x ४' साईजचे चेंबरची आवश्यकता असते. ज्या मार्गाने पाईप टाकून त्यामधून केबल टाकली त्या मार्गात जमिनीची लेव्हल एकसारखी नसल्याने पाईप लेव्हलमध्ये ॲडजेस्ट करुन टाकणेसाठी व पावसाचे पाणी व माती चेंबरमध्ये पडून पाईप व चेंबर भविष्यात चोकअप होऊ नये म्हणून जमिन लेव्हलपेक्षा थोडे उंच चेंबर बांधावे लागले त्यामुळे चेंबरची खोली १ फुटाने वाढली. तसेच नविन गोडाऊनचे परिसरात गोडाऊनचे जवळून रिंगरोडचे काम चालू झाल्यामुळे त्याची खोदाई साधारण ४ फुट खोल झाली होती. त्यामुळे तेथे रोडचे खोदाईपेक्षा २ फुट खोल खोदाई करुन केबलसाठी पाईप टाकावे लागले. त्यामुळे रोडचे कडेने दोन्ही चेंबर कामाच्या सोईनुसार ॲडजेस्ट करुन बांधले, त्यामुळे त्यांची साईज वाढलेली आहे.

वरील प्रमाणे कामाच्या अडचणी आल्याने केबल चेंबरची साईज वाढवावी लागली व त्यामुळे कामाचे एकुण मंजुर रक्कम रू.३,७५,०००/- रकमेपेक्षा रक्कम रु. १८,९९४/- इतका वाढीव (चेंबरसाठी लागलेल्या वाढीव रक्कमेसह) खर्च झालेला आहे.

मे.हिंदुस्थान इनरमॅक्स, नाशिक यांनी पानमळा (सर्व्हे नंबर-१२५) गोडाऊन येथील परीसरात बसवावयाच्या ५० एच.पी.मोटारकरीता केबल टाकणे व अनुषंगिक कामे पूर्ण करणेची मुदत ०३ महिने होती परंतु वरीलप्रमाणे कामात अडचणी आल्यामुळे त्यांना काम पूर्ण करणेस ०३ महिनेचा विलंब झालेला असून त्यांनी दि.३१.०१.२०१३ रोजी काम पूर्ण केलेले आहे. त्यानंतर त्यांचे दि.२५.०२.२०१३ रोजी सदर कामाचे अंतिम बील सादर झाले असून एकुण मंजूर रक्कम रु. ३,७५,०००.०० /- पेक्षा रु.१८,९९४/- इतक्या रकमेचे (चेंबरची साईज वाढल्यामुळे ) वाढीव काम झालेले असून एकुण कामाची रक्कम रु. ३,९३,९९४/- इतकी वाढीव रक्कमेसह मे.हिंदुस्थान इनरमॅक्स, नाशिक यांना आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, पानमळा (सर्व्हे नंबर-१२५) गोडाऊन येथील परिसरात बसवावयाच्या ५० एच.पी.मोटारकरीता केबल टाकणे व अनुषंगिक कामातील वाढीव एकुण रु. ३,९३,९९४/- मात्र इतकी वाढीव रक्कम मे.हिंदुस्थान इनरमॅक्स, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४४ शिर्डी शहर वाहतुक पोलीस कक्षाने मागणी केलेल्या नगर मनमाड रोड व इतर रोडवरील वाहतूक नियंत्रित करणेकामी विविध ठिकाणी आवश्यक असलेले पार्किंग व इतर माहितीबाबत सुमारे २३० नग बोर्ड तसेच श्री साईबाबा मंदिर गेट नं.०१ समोरील व इतर ठिकाणी असलेल्या २०० नग बॅरिकेडसवर असलेल्या प्रत्येक गोल प्लेटवर रेडियम अथवा लाल रंगाने नो पार्किंग**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**झोन गोलाकार आकारात लिहीणेसाठी येणाऱ्या एकत्रित रु.१५,००,०००/- चे खर्चास शासन मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १२-१२-२०१२ चे सभेतील विषय क्र. ०२ निर्णय क्र. ११०५(०३) अन्वये नगर मनमाड रोड व इतर रोडवरील वाहतूक नियंत्रित करणेकामी विविध ठिकाणी आवश्यक असलेले पार्कींग व इतर माहितीबाबत सुमारे २३० नग बोर्ड हे पोलसह तसेच श्री साईबाबा मंदीर गेट नं. १ समोरील व इतर ठिकाणी असलेल्या २०० नग बॅरिकेडसवर असलेल्या प्रत्येक गोल प्लेटवर रेडियम अथवा लाल रंगाने नो पार्किंग झोन असे गोलाकार आकारात लिहीणे हे साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी व शिर्डी शहर वाहतुक नियंत्रण सुरळीत होणेसाठी पोलीसांच्या वाहतूक विभागाकरीता अत्यंत महत्वाचे असुन त्याकरीता संस्थानच्या निधीमधुन वरील साहित्य संस्थानच्या विद्युत विभागामार्फ़त कोटेशन बोलावून खरेदी करणेस व ते सिमेंट कॉक्रीटमध्ये रोवुन देणेस रक्कम रु. १५,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच ठराव कायम होण्याची वाट न पाहता कोटेशन बोलाविणेची प्रक्रिया चालु करुन तातडीने पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त ठरावाच्या मान्यतेनुसार पार्कीग व इतर माहितीबाबतचे सुमारे २३० नग बोर्ड तसेच श्री साईबाबा मंदीर गेट नं. १ समोरील व इतर ठिकाणी असलेल्या २०० नग बॅरिकेडसवर असलेल्या प्रत्येक गोल प्लेटवर रेडियम अथवा लाल रंगाने नो पार्किंग झोन असे गोलाकार आकारात लिहीणे इ. कामाचे टेंडर तयार केलेले असुन उपरोक्त बोर्ड बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर बोलवावे लागणार आहेत.

परंतू झालेल्या कामाची बीले आदा करतेवेळी अंतर्गत लेखापरीक्षक तसेच संस्थानचे इतर लेखापरीक्षक व लेखाशाखा यांचेकडून दरवेळी शासन मान्यतेविषयी विचारणा करण्यात येऊन प्रस्तावास शासन मान्यता घेण्याची व त्यानंतर बील सादर करण्याबाबत सांगण्यात येते.

तसेच नुकतेच जा. क्रमांक :सासंवि-२०११/५३८/ प्र.क्र.६९/पुर्नबांधणी -१२ / का-सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२ नुसार शासनाच्या विधी व न्याय खात्याकडून पत्र प्राप्त झाले असून यात विधी व न्याय विभागामार्फत खालीलप्रमाणे सूचना करण्यात आलेल्या आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रम, योजना, प्रकल्प, स्थावर व जगंम मालमत्ता खरेदी व विक्री व भाडेपट्टयाने देणे, विविध प्रकरणी आर्थिक सुट देणे इत्यादि बाबींमध्ये शासनाची पूर्वमान्यता न घेता परस्पर कार्यादेश देऊन संस्थान निधीतून रक्कमा अदा करण्यात आल्या असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. संस्थानच्या व्यवस्थापन समितीच्या मंत्रालय येथे दिनांक २७-०१-२०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन मा.मंत्री (विधी व न्याय) यांनी असे निर्देश दिले होते की, यापुढे संस्थानने कोणत्याही योजना राबविण्यापूर्वी आवश्यकतेनुसार शासनाची पूर्वमान्यता घ्यावी. शासन स्तरावरुन कार्योत्तर मंजुरी दिली जाणार नाही. तथापि तरीही वेळोवेळी संस्थानकडून अनेक उपक्रम परस्पर राबवून कार्योत्तर मंजुरी देण्याची विनंती केली जाते. यास्तव, संस्थानास पुढीलप्रमाणे प्रशासकीय निर्देश देण्यात येत आहेत :-

०१) श्री साईबाबा संस्थानमार्फत राबविण्यात येणा-या पायाभूत व धारेणात्मक प्रकल्पांस व त्यावरील खर्चास शासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय कामे सुरु करण्यात येऊ नये.

०२) शिर्डी येथे साईभक्तांची होणारी गर्दी विचारात घेऊन भविष्यात संस्थानकडून विविध प्रकल्प, योजना राबविण्यात येणार आहेत. सदर प्रकल्प, योजना राबविण्यास व्यवस्थापन समितीने मान्यता दिल्यानंतर अधिनियमातील तरतूदीनुसार प्रस्ताव सविस्तर तपशिलांसह शासनास सादर करण्यात येऊन रितसर मान्यता घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे शासनाची मान्यता घेतल्याशिवाय प्रकल्प, योजना सुरु करण्यात येऊ नये.

०३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियामामध्ये घालून दिलेल्या तरतूदीबाहेर व समितीस नसलेल्या अधिकारात परस्पर खर्च करुन त्यास शासनाची कार्योत्तर मंजुरी घेण्याचे प्रस्ताव सादर करण्यात येतात. भविष्यात शासनाची मान्यता न घेता खर्च करुन कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव सादर केल्यास त्यास शासनाची मान्यता देणे शक्य होणार नाही.

यामुळे उपरोक्त कामास व येणाऱ्या रु.१५,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी लागणार आहे व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर टेंडरची प्रक्रीया चालू करावी लागणार आहे.

प्रस्तावावर विचार होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४५ शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील १६ गुंठे जागेच्या अर्ध्या भागात तसेच इतर ठिकाणी मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व चरणी श्रद्धा सुमन अर्पण करण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगभरातून हजारो साईभक्त दररोज सतत शिरडीत ये जा करीत असतात. दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत आहे. कधी कधी हा आकडा लाखोच्या घरात जातो. त्यामुळे सध्या असलेल्या दर्शन लाईन हॉलमधील जागा कमी पडत आहे. अलिकडे बऱ्याच वेळा भक्तांची गर्दी वाढल्याने दर्शन लाईन मधील रांगा कमी पडल्या आहेत.

त्याकरीता भक्तांची गर्दी लक्षात घेता शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील प्रवेश द्वार क्र. १ पासून ते १६ गुंठे गेट व शांतिनिवासचा कोपरा इथपर्यंत पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करून बसविण्यात आल्याने दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता आले. हे रेलींग मुव्हेबल असून केव्हाही ते लावता येईल व काढून घेता येईल अशा प्रकारचे बनविण्यात आलेले आहे. जेणेकरुन रस्त्याच्या मूळ ढाच्याला कोणतेही छिद्र न पाडता तयार करण्यात आलेले आहे.

या रेलींगचा अनुभव चांगला असून आता खालील ठिकाणी अशा प्रकारचे रेलींग केले तर दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता येईल व प्रत्येक वेळेस गर्दीच्या वेळेस जे बांबू लावून तात्पुरते रेलींग तयार करतो त्याची गरज भासणार नाही.

(१).. १६ गुंठे जागेच्या अर्ध्या भागात ( उत्तर बाजूस ) या रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Area size- १२५ ft x ४८ ft.,
Total railing - १३ ft x १८० nos. , + Actual Gates on spot
Height of Railing - ४ Feet

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप ग्रेड -एसएस ३०४ साईज - २५ एमएम X १६ गेज जाडी | १०,००० फूट | ८०/- | ८,००,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम X ४० एमएम X १६ गेज जाडी | ९००० फूट | ३००/- | २७,००,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम X ८ एमएम | ९०० फूट | ४००/- | ३,६०,०००/- |
| ०४) | एसएस हार्डवेअर + नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | २५,०००/- |
| ०५) | इतर खर्च - ट्रान्स्पोर्टेशन वगैरे | लम्पसम | | ५०,०००/- |
| | | | एकुण | ३९,३५,०००/- |

०२) नगर मनमाड रोड ते १६ गुंठे(पिंपळवाडी रोड सेंटर डिव्हायडर ची उत्तर बाजू)(सिंगल लाईन फक्त)

Total railing – 13 ft x 96 nos. ( 48 walkers) + Actual Gates on spot

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप ग्रेड -एसएस ३०४ साईज - २५ एमएम X १६ गेज जाडी | ७,००० फूट | ८०/- | ७,००,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम X ४० एमएम X १६ गेज जाडी | ५२०० फूट | ३००/- | १५,६०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम X ८ एमएम | ३६० फूट | ४००/- | १,४४,०००/- |
| ०४) | एसएस हार्डवेअर + नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | २०,०००/- |
| ०५) | इतर खर्च - ट्रान्स्पोर्टेशन वगैरे | लम्पसम | | ३०,०००/- |
| | एकुण | | | २४,५४,०००/- |

०३) १६ गुंठे प्रवेशद्वार ( पिंपळवाडी रोड डिव्हायडर) क्रॉसींग ( डिझाईन खालीलप्रमाणे ) :-


Total length – 110 ft.,
Ht. of railing 7 feet

| Sr.no. | MATERIAL DETAILS | QTY. | RATE | COST |
|---|---|---|---|---|
| **01.** | STAINLESS STEEL 304 HEXAGON DECORETIVE POLE SIZE - 4" X 8 FT HT. | 14 NOS. | RS.30,000/- | 4,20,000/- |
| 02. | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE – DIA 50MM X 14 SWG. | 700 ft. | 400/- per ft | 2,80,000/- |
| 03. | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE - 25MM DIA. X 16 SWG. | 2000 ft. | 110/- per ft. | 2,20,000/- |
| 04. | STAINLESS STEEL 304 BOTTOM FLANGE SIZE DIA 200MM X 15MM | 28 NOS. | RS.2,000/- | 56,000/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05. | SS HARDWARE,+ NUTBOLTS+ HEAVY DUTRY BEARING HINGES FOR GATE | लम्पसम | RS.50000=00 | 50,000/- |
| 06. | OTHER CHARGES TRANSPORTATION, ETC | लम्पसम | RS.50000=00 | 50,000/- |
| | | | Total | Rs.10,76,000/- |



वरील काम स्टेनलेस स्टीलचे असल्याने बाहेरील वर्कशॉपधारकांकडून रेलींग तयार करुन बसवून घ्यावे लागेल.

वरील तीनही कामासाठी एकुण खर्च रु. ३९,३५,०००/- + रु. २४,५४,०००/- + रु.१०,७६,०००/- रु. ७४,६५,०००/- इतका अपेक्षित आहे.

प्रस्तावावर विचार विनिमय होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३८८ सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४६ श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू लिफ्ट व पॅसेंजर लिफ्टचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांना नविन श्री साई प्रसादालयात मालवाहतूकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट पुरविणे व बसविणेकामी एसएसएस/ विद्युत/ ९२३७/ २००७ दि:-१३-०६-२००७ अन्वये रुपये ३०,४१,०००.०० इतक्या कार्यादेश देण्यात आला होता.

मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांनी नविन श्री साई प्रसादालयामध्ये मालवाहतूकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट बसवून अशा दोन लिफ्ट चालू करून दिल्या होत्या. लिफ्ट चालू झाल्यानंतर मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांनी टेंडरमधील व कार्यादेशातील अटीनुसार प्रथम वर्षी फ्री सर्व्हिस दिली आहे.

मागील वर्षी श्री साई प्रसादालयामधील दोन्ही लिफ्टसाठी सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०४-२०१२ ते दिनांक ३१-०३-२०१३ या कालावधीसाठी रु. १,६०,१५६/- (सर्व टॅक्सेस समाविष्ट) इतक्या रकमेस देण्यात आले होते. त्याची मुदत दि. ३१-०३-२०१३ रोजी संपत आहे. या वर्षात एकदाही लिफ्ट बंद पडलेली नाही. तसेच स्पेअर्स व सर्व्हिसिंगसाठी सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेव्यतिरिक्त जादा रक्कम लागलेली नाही.

आता त्यांनी दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या आर्थिक वर्षाकरीता ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् ) मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी लागणाऱ्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

जर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) केलेले नसेल आणि मशिनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशिनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते. शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध होतील याची शाश्वती नसते.

या रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिक येऊन मशिनरीची साफसफाई करून क्लिनींग करून सेटींग करून देत असतो. जेणेकरून लिफ्ट सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे. सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) पिरिअडमध्ये मशिनरीचा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कोणताही मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या ( मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

| Unit Number | Maintenance Charges for the Period | | Basic Amt. (Rs.) | Tax Amt. (Rs.) | Total Amt. (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| | From | To | | | |
| M9667 | 01 Apr 13 | 31 Mar 14 | 91,462.00 | 11,304.70 | 1,02,766.70 |
| M9668 | 01 Apr 13 | 31 Mar 14 | 65,329.00 | 08,074.66 | 0,73,403.66 |
| | | Total : | 1,56,791.00 | 19,379.36 | 1,76,170.00 |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय नं.३८६ अन्वये (ठरावाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे.) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनरस्, वायुवीजन यंत्रणा, वगैरे ) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त ठराव विचारात घेऊन लिफ्टची उत्पादक कंपनी मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साईप्रसादालयाकडील दोन्ही लिफ्टचे यापुढे दरवर्षी किंवा ठराविक मुदतीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी व यावर्षी मालवाहू लिफ्टची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या कालावधीसाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु. १,०२,७६६.७० मात्र व पॅसेंजर लिफ्टची दि. ०१-०४-२०१३ ते दि.३१-०३-२०१४ या कालावधीसाठी रक्कम रु. ७३,४०३.६६ मिळून रक्कम रु.१,७६,१७०.३६ पुर्णांकित रक्कम रु.१,७६,१७०/- (अक्षरी रक्कम रू.एक लाख एकोणऐंशी हजार सातशे शेहात्तर मात्र) अॅडव्हान्स रक्कम मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना आदा करणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू व पॅसेंजर लिफ्टचे दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या कालावधीसाठी मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व याकामी येणारी एकत्रित रु.१,७६,१७०/- मात्र रक्कम सदर कंपनीस आगाऊ आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४७** **श्री साईनाथ हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ व ०२ चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे सोयीकरीता तळमाळयावरुन वरील माळयांवर ये-जा करणेकरीता मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून हायड्रॉलिक लिफ्ट बसविण्यातआलेल्या आहेत. त्या नेहमी सुस्थितीत चालू रहाव्या याकरीता त्यांचे नियमित सर्व्हिसिंग करावे लागते. मागील वर्षाचे मार्च अखेर मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते.

सदरील लिफ्ट सतत कार्यान्वित असतात. सततच्या वापरामुळे लिफ्टच्या यंत्रणेत प्रसंगी बिघाड निर्माण होऊ शकतो. अशा वेळेस सर्व्हिसिंग करुन खराब झालेले स्पेअर्स बदलून लिफ्ट लगेच चालू करुन द्यावी लागते. लिफ्ट दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर्स आपणाकडे उपलब्ध नसतात. शिवाय लिफ्ट दुरुस्तीचा तंत्रज्ञ कर्मचारी संस्थानकडे नसल्याने लिफ्ट दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होऊ नये म्हणून मागील वर्षी लिफ्ट क्र.०१ चे दिनांक ०१-०४-२०१२ ते दिनांक ३१-०३-२०१३ अखेर व लिफ्ट क्र.०२ चे दिनांक ०१-०५-२०१२ ते दिनांक ३०-०४-२०१३ अखेर लिफ्ट कंपनीचे उत्पादक मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते.

मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत संपलेली असल्याने त्यांनी लिफ्ट क्र.०१ चे दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ अखेर व लिफ्ट क्र.०२ चे दिनांक ०१-०५-२०१३ ते दिनांक ३०-०४-२०१४ अखेर ऑपरेशन-मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी (AMC) लागणा-या खर्चाचे कोटेशन पाठविले आहे.

| अ. क्र. | ठिकाण | लिफ्ट संख्या | दर (प्रत्येकी) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साईनाथ हॉस्पीटल-लिफ्ट क्र.०१ [ दि.०१-०४-२०१३ ते दि.३१-०३-२०१४] | ०१ नग. | रु. ८०,०००.०० | रु. ८०,०००.०० |
| | | | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | रु. ०९,८८८.०० |
| | | | एकुण रक्कम :- | रु. ८९,८८८.०० |
| ०२) | श्री साईनाथ हॉस्पीटल-लिफ्ट क्र.०२ [ दि.०१-०५-२०१३ ते दि.३०-०४-२०१४] | ०१ नग. | रु. ८०,०००.०० | रु. ८०,०००.०० |
| | | | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | रु. ०८,९८८.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | एकुण रक्कम :- | रु. ८९,८८८.०० |
| | लिफ्ट क्र.०१ + लिफ्ट क्र.०२ मिळून एकुण रक्कम :- | | | रु. १,७९,७७६.०० |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय क्र.३८६ अन्वये (सोबत-ठराव प्रत जोडली आहे) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे(यामध्ये उदा.प्रसादालयातील विविध मशिनरी,विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनरी, ए.सी.वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिक्स प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरींच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे असे ठरले.

तरी उपरोक्त ठराव विचारात घेऊन लिफ्टची उत्पादक कंपनी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे यापुढे दरवर्षी किंवा ठराविक मुदतीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी व यावर्षी लिफ्ट क्र.०१ ची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या कालावधीसाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु.८९,८८८/-मात्र व लिफ्ट क्र.०२ ची दिनांक ०१-०५-२०१३ ते दिनांक ३०-०४-२०१४ या कालावधीसाठी रक्कम रु. ८९,८८८/- मिळून रक्कम रु. १,७९,७७६/- (अक्षरी रक्कम रू. एक लाख एकोणऐंशी हजार सातशे शेहात्तर मात्र) इतकी अॅडव्हान्स रक्कम मे.पॉवलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना आदा करणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ चे दि.०१-०४-२०१३ ते दि. ३१-०३-२०१४ या कालावधीसाठी व लिफ्ट क्र.०२ चे दि. ०१-०५-२०१३ ते दि.३०-०४-२०१४ या कालावधीसाठी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व याकामी येणारी एकत्रित रु.१,७९,७७६/- मात्र रक्कम सदर कंपनीस आगाऊ देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४८** **जनरेटर करिता १२ व्होल्ट/ १८० ॲम्पीअर बॅटऱ्या खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) पाणीपुरवठा साठवण तलाव या वेगवेगळ्या ठिकाणी १०० केव्हीए ,२५० केव्हीए, ५०० ` व्हीए क्षमतेचे २१ जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत.तसेच श्री साईंचे रथ-पालखी, कनिष्ठ महाविद्यालय, शांतिनिकेतन याठिकाणी १० ते १५ केव्हीए क्षमतेचे तीन जनरेटसेट बसविण्यात आलेले आहेत. सदर जनरेटरला स्टार्ट करणेकरिता १२ व्होल्ट /१८० ॲम्पीअर च्या दोन नग बॅट-या (१०-१५ केव्हीए क्षमतेकरिता एक बॅटरी) याप्रमाणे प्रत्येक जनरेटर सेटला वापरण्यात आलेल्या आहेत.या बॅट-यांची १८ महिने वॉरंटी दिलेली असते.त्यानंतर त्यांची कार्यक्षमता कमी होवून खराब होतात. त्यामुळे जनरेटर सेट एखाद्या वेळेस स्टार्ट होत नाही. जनरेटरसेटच्या बरोबर कार्यरत असलेल्या बॅट-यांची मुदत संपलेली असल्याने जनरेटर सेट चालू होऊ शकणार नाही. दर वर्षी साधारणत : ७ ते ८ जनसेटच्या बॅट-या बदलाव्या लागतात. भांडार विभागाकडे सध्या बॅट-या शिल्लक नाहीत म्हणून जनरेटरसेट करिता खालीलप्रमाणे बॅट-या खरेदी कराव्या लागतील :-

| अ.क्र. | तपशील | कंपनी | टाईप | मागणी | प्रती नग दर ( अंदाजे ) | एकूण किंमत ( अंदाजे ) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | बॅटरी १२ व्होल्ट /१८० ॲम्पीअर (थीन प्लेट टेक्नॉलॉजी ) | SF-SONIC POWER BOX | PBX १८०० | १६ नग | रु. १८,०००/- | रु.२,८८,०००/- |
| | | | | | एकुण रक्कम रु.:- | रु.२,८८,०००/- |

उपरोक्तप्रमाणे जनरेटरसेट करीता लागणा-या बॅट-या कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,८८,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत विभागाकडिल जनरेटर करिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १६ नग १२ व्होल्ट/ १८० ॲम्पीअर बॅटऱ्या विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४९** **झेरॉक्स मशीन मॉडेल नं.५६४५ चा Fuser हा पार्ट संपल्याने नवीन Fuser खरेदी करणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** संस्थानचे कार्यालयीन कामासाठी झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशीन मॉडेल नं.५६४५ हे दि.२७.०३.२०१० रोजी देणगी घेतलेले आहे.

सदरच्या झेंरॉक्स मशीनला मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०१.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये, व्हॅटसह रु.५०,४००/- या किंमतीला एक Fuser Modul हा पार्ट खरेदी करण्यास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार दि.२३.०२.२०१२ रोजी नविन फ्युजर खरेदी केला होता. सदरच्या फ्युजरमध्ये (मागील रिडींग-४,८५,६४९ व आजची रिडींग ६,९०,४५५) आज अखेर २ लाख ४ हजार कॉपीज् झालेल्या आहेत.

आता मशीनला प्रिंट दिल्यावर चरिप्लेस फयुजर मॉडेलछ असा मेसेज येत आहे. त्यामुळे मशीन बंद आहे.

सदरच्या मशीनसाठी लागणारे पार्ट खरेदी विभागामार्फत वार्षिक खरेदी करणेसाठी कळविलेले आहे. परंतु वार्षिक खरेदीस अजुन बराच अवधी लागणार आहे.

तरी तातडीची गरज असल्याने मशीनसाठी यापुर्वी खरेदी केलेल्या दराने (व्हॅटसह रु.५०,४००/- रु.पन्नास हजार चारशे मात्र) एक फ्युजर खरेदी करण्यात आला आहे, त्यास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-१२)

---

**विषय नं.५० Multi Currency Desktop Banknote counter / Sorter Model - Seetech ST-३५० खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** दक्षिणा पेटीतील मोजणीकामी व संस्थानचे डोनेशन काऊंटरकरीता सध्या ७ लूज नोट काऊंटींग, ११ बंडल नोट काऊंटींग मशिन व २ कॉईन सॉर्टींग मशिन इत्यादी यंत्र सामुग्रीचा वापर केला जातो. या सर्व मशिन, मे.कोरस ( इंडिया ) लिमिटेड, पुणे या अधिकृत वितरकाव्दारे खरेदी करण्यात आल्या आहेत. तसेच या सर्व मशिनचे दुरुस्ती व देखभालीचे काम मे. कोरस ( इं ) लि. पुणे यांना देण्यात आलेले आहे. प्रत्येक आठवडयातून एक वेळेस त्यांचा प्रतिनिधी येऊन मशिनचे दुरुस्ती व देखभालीची सेवा पुरवित असतो.

मे. कोरस ( इं ) लि. यांनी उपरोक्त विषयांकीत मशिनचा काऊंटींग हॉलमध्ये डेमो दिलेला आहे. या मशिनला एकूण ४ पॉकेट असुन त्याव्दारे एकाच वेळेला मशिनच्या तीन पॉकेटमध्ये नोटांची सॉर्टींग व काऊंटींग होऊन उर्वरित एका पॉकेटमधून डुप्लीकेट नोट दर्शविण्यात येते. सदरचे मशिन सध्या काऊंटींग हॉलमध्ये वापरण्यात येत असुन या मशिनव्दारे सर्व प्रकारच्या नोटा वेगाने मोजण्यासाठी व सॉर्टींग करण्यासाठी त्याचा वापर होत आहे. याप्रकारचे एकूण २ मशिन काऊंटींग हॉलमध्ये असल्यास काऊंटींग वेगाने व अचुक होण्यास मदत होणार आहे. सदरच्या मशिन खरेदीसाठी मे. कोरस ( इं ) लि. पुणे यांचेकडून कोटेशन प्राप्त झालेले आहेत. एका मशिनकरीता संपूर्ण करासहीत रु.८ लाख इतकी रक्कम त्यांनी कोटेशन व्दारे कळविलेली आहे. त्यामुळे २ मशिन खरेदीसाठी एकूण रक्कम रु.१६ लाख इतका खर्च येणार आहे.

वरीलप्रमाणे Multy Currency Desktop Banknote counter/Sorter Model - Seetech ST-३५० बनावटीच्या २ मशिन खरेदीसाठी एकूण रक्कम रु.१६ लाख इतका खर्च येणार आहे. तरी या २ मशिन संस्थानमार्फत खरेदी करण्यास अथवा देणगीव्दारे घेण्यास मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५१ मे- २०१३ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे **मे, २०१३** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ३/५/२०१३ | २४,२३,६५,३५१/- |
| २) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ११/०५/२०१३ | २३,९२,००,१२०/- |
| ३) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १३/०५/२०१३ | १,८९,६५,००९/- |
| ४) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १४/०५/२०१३ | १३,२२,६३,८१३/- |
| ५) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १५/०५/२०१३ | २,५३,२१,७५६/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ६) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १६/०५/२०१३ | ३,२४,९५,७५०/- |
| ७) | बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २८/०५/२०१३ | १२,१३,८३,८८४.४८ |
| ८) | बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २९/०५/२०१३ | ४,४१,३९,५९४.३४ |
| ९) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मे २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | **९५,६१,३५,२७७.८२** |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम रु. ९५.६१ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.९५.६१ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.९५.६१ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५२** **इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडील जमा सोन्यामधून सोन्याची नाणी व नॅशनल रिफायनरी प्रा.लि., मुंबई यांचेकडील जमा चांदीमधून चांदीची नाणी बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थानचे दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी झालेल्या मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ५७४ नूसार इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची) नाणी व नॅशनल रिफायनरी प्रा. लि. मुंबई यांचेकडून चांदीची (२० ग्रॅम), नाणी बनवून ती श्री साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती दिनांक २७ मार्च, २०१२ अखेर पहात होती. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वितळविणे बाबतचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्रक्रमांक सासंवि-२००५/४०७/(६४)-का. सोळा दिनांक ३१ मे, २००७ अन्वये स्थायी मान्यता मिळालेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दिनांक ०१ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१० अखेर देणगी रुपाने जमा झालेले सोने व दिनांक ०१ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००८ अखेर देणगी रुपाने जमा झालेली चांदी, वस्तु अलंकार दिनांक १८ जूलै २०१२ च्या मा. त्रीसदस्यीय समितीच्या बैठकीतील निर्णय क्र. ५७४ प्रमाणे वितळविण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशिल | नेण्यात आलेल्या वस्तुंचे वजन (किलो, ग्रॅम, मि.ग्रॅम) | वितळुन मिळालेले शुध्द सोने/चांदीचे वजन (किलो, ग्रॅम, मि.ग्रॅम) |
|---|---|---|---|
| ०१ | सोने वस्तु | ३७,७५४,४९४ | ३२,४४२,५१४ |
| ०२ | चांदी वस्तू | ५१३,३७१,७१० | ३९२,४१९,०७० |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे माहे मार्च, २०१० अखेरचे सोने वस्तु अलंकार इंडिया गव्हमेंट मिंट, मुंबई व मार्च, २००८ अखेरची चांदी वस्तु अलंकार नॅशनल रिफायनरी प्रा. ली. मुंबई यांचेकडे वितळविण्यात आलेली आहे. उपरोक्त शुध्द सोने इंडिया गव्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे व शुध्द चांदी नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचेकडे जमा आहे. सध्या संस्थानकडे खालीप्रमाणे नाणी शिल्लक आहेत :

| सोने नाणी. | नग. |
|---|---|
| १) २.५ ग्रॅम | १०८३ |
| २) ५ ग्रॅम | १६४८ |
| ३) १० ग्रॅम | १६९४ |
| चांदी २० ग्रॅम | ३६२८ |

श्री साईभक्तांना सोने, चांदी यांची नाणी उपलब्ध करुन देण्यासाठी सोन्याचे नाणीसाठी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई व चांदीच्या नाण्यासाठी नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचेकडून नाणी बनविण्याचे मजूरीचे दरपत्रक मागविण्यात आले ते खालीलप्रमाणे :

(१) इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचे सोन्याच्या नाणीसाठी दरपत्रक दिनांक १५/०४/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे प्राप्त झालेले होते :

| तपशिल | दर |
|---|---|
| सोने नाणी-५ ग्रॅम | ३५७/- |
| सोने नाणी-१० ग्रॅम | ५२२/- |
| सोने पेंडेंड-२.५ ग्रॅम | ५३५/- |
| सिल्वर नाणी.२० ग्रॅम | १८३/- |
| सर्व्हीस टॅक्स | १२.३६% |

उपरोक्त दर जास्त वाटल्याने ते कमी करण्यासाठी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांना जा.नं.वशी-लेखा/५७४२/दिनांक १८ मार्च २०१३ नुसार विनंती पत्र देण्यात आले होते. संस्थानचे विनंती पत्रानुसार इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांनी संस्थानचे पत्रास मान देवून दि.१५ एप्रिल २०१३ चे त्यांचे कडील पत्रात खालील प्रमाणे सुधारीत दर कळविलेले आहेत. (सदर दराबाबदचा कालावधी ३० दिवसाकरीता राहील असे त्यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेले आहे.)

| तपशिल | नाणी संख्या | मजूरीचे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| सोने नाणी-५ ग्रॅम | १५०० | २२३/- | ३,३४,५००.०० |
| सोने नाणी-१० ग्रॅम | १७०० | ३२३/- | ५,४९,१००.०० |
| सोने पेंडेंड-२.५ ग्रॅम | ३२०० | ४२८/- | १३,६९,६००.०० |
| एकुण रक्कम | | | २२,५३,२००.०० |
| सर्व्हीस टॅक्स | | १२.३६% | २,७८,४९६.०० |
| | | एकुण : | २५,३१,६९६.०० |

(२) नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचे चांदीच्या नाणी बनविण्यासाठीचे दरपत्रक दिनांक २८/०१/२०१३ चे खालीलप्रमाणे आहे :

| तपशिल | नाणी संख्या | मजूरीचे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| चांदीचे नाणी (२० ग्रॅम) | १९६२१ | ८०/- | १५,६९,६८०/- + कर |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सोन्याचे नाणी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडून तर चांदीचे नाणी नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचेकडून तयार करुन घेण्यास व त्यासाठी वरीलप्रमाणे त्यांच्या दरपत्रकात दर्शविलेल्या एकूण खर्च व त्या अनुषंगीक येणाऱ्या इतर खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



---

**विषय नं.५३** **सन २०१३-१४ करीता गहू आटा खरेदीचे निवीदेमध्ये आर जे गोल्ड या ब्रॅण्डचा समावेश करणेबाबत.**

**प्रस्ताव-** विश्वभारती फुडस प्रायव्हेट लिमीटेड, नाशिकरोड यांचे महेश कलंत्री यांनी दि.२४.०१.२०१३ चे पत्राने, आम्ही गव्हाचे पीठ (चक्की आटा, मैदा वगैरे) चे उत्पादक व विक्रेते असून संस्थानच्या निविदेत RJ Gold या ब्रॅण्डचा समावेश करावा असा उल्लेख केलेला आहे. तसेच त्यांनी त्यांचे पत्रात, आमच्या आटयाचा सध्याचा दर रु.२०/- प्रती किलो असून आमची गव्हाची उत्पादने उच्च दर्जाची असून आमचे जळगांव, सिन्नर व धुळे येथे उत्पादन केंद्रे आहेत. आमचे पंजीकृत कार्यालय नाशिक येथे असून प्रतिदिन आमची एकत्रित उत्पादन क्षमता ९०० मेट्रीक टन इतकी आहे. आमच्या उत्पादनांच्या चाचणीसाठी आमची स्वतःची प्रयोगशाळा असून संपूर्ण पश्चिम व दक्षिण भारतात आमचा माल विकला जातो. आपणांस चाचणीसाठी नमुन्यादाखल माल हवा असल्यास आम्ही पाठवू शकू. भारती वालमार्ट, ब्रिटानीया, पार्ले, आदित्य बिर्ला सारखे ख्यातनाम विक्रेते आमचे नियमित ग्राहक असून आमच्या मार्कचा निविदेत समावेश करुन संधी देण्याची त्यांनी विनंती केलेली आहेत.

सध्या संस्थानच्या प्रसादालय विभागात सम्राट ब्रॅण्डचा आटा वापरणेत येत असून त्याचा दर हा रु.२०.५४ प्रती किलो असा आहे. खरेदी विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३९७१/२०१३ दि.०३.०१.२०१२ परिपत्रकान्वये मागणी केलेप्रमाणे सन २०१३-१४ करीता प्रसादालयासाठी आवश्यक असणारा १८००० क्विंटल गहू आटा (अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट, कॅप्टनकुक ब्रॅण्डचा) तसेच इतर किराणा माल खरेदीकामी खरेदी विभागास प्रस्ताव देणेत आलेला आहे.

विश्वभारती फुडस प्रायव्हेट लिमीटेड यांनी दि.०४/०२/२०१३ रोजी सायं.६.०० वाजता आर जे गोल्ड ब्रॅण्डचा ५० किलो आटा प्रसादालयात देणगी दिलेला आहे. त्यापैकी ४० किलो आटयाची चपाती व पुरी तयार करुन भक्तांचा अभिप्राय घेतलेला आहे. भक्तांचे अभिप्रायात नविन आटयापासून बनविलेली चपाती ही जुन्या आटयाच्या चपातीपेक्षा छान व रुचकर असल्याचे सांगितले आहे. याचप्रकारे विविध राज्यातील १५ भक्तांनी चपाती चांगली लागत असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. काही चपात्या दुसऱ्या दिवशी पाहिल्या असता त्या ताज्या दिसल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच दि.०५/०२/२०१३ रोजी उर्वरीत आटयाची चपाती करुन पाहिली असता ती चांगली व रुचकर लागत आहे.

तरी विश्वभारती फुडस प्रा.लिमीटेड यांचेकडील RJ Gold ब्रॅण्डचे गहु आटयाचा सन २०१३-२०१४ चे वार्षिक खरेदीचे निविदेत समावेश करणेबाबत प्रशासकीय मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानला आटा खरेदी करावयाचा नाही, ज्या वेळेस आटा खरेदी करावयाचा असेल, त्या वेळेस उपरोक्त प्रस्तावाचा विचार करणेत येईल, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.५४** **चपाती/ पुरीसाठी रेडीमेड आटा खरेदीकामी श्री संजय काळे यांचे पत्रातील मुद्दे व त्यावरील संस्थानचे अभिप्रायाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी त्यांचे दि.०७/१०/२०१२ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना क्रमांक साशा/कार्या७/संकीर्ण/२५१२/१२ दि.०८/११/२०१२ अन्वये तसेच आवक नं.१२६५३ दि.१६.११.२०१२ रोजी संस्थानला प्राप्त झालेल्या पत्रात चपाती/ पुरीसाठी रेडीमेड आटयाबाबत खालील मुद्दे उपस्थित केलेले होते. त्यानंतर महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभागाचे क्र.सासंवि-२०१२/सं.क्र.६०३/का.सोळा दि.२७.१२.२०१२ चे पत्राने संस्थानला स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणेस सांगणेत आलेले आहे.

उपरोक्त पत्रान्वये पाठविलेल्या संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाचा तपशिल व संस्थानच्या अभिप्रायाचा तपशिल खालीलप्रमाणे.

१) गहु दळणेसाठी दोन शिफ्टमध्ये गिरणीवर १४ कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

२) श्री साईबाबांच्या संग्राहलयात बाबांचे जाते अजून जपलेले आहे. त्याकाळात बाबा स्वतः किंवा भक्तांकरवी धान्य दळून घेत व नंतरच ते शिजवून भक्तांना देत. संस्थानने बाबांची परंपरा आजपर्यंत जपली होती. परंतू पोळयांसाठी, पुऱ्यांसाठी रेडीमेड आटा घेण्याचा निर्णय घेतल्याने श्री साईबाबांचं जातं आता थंड होणार. परंपरेचा खंड झाला. तसेच हे विश्वस्त मंडळ अधिनियमाच्या विरुध्द काम करीत आहे.

३) गव्हाची खरेदी करतांना साठवण, निवडणे, दळणे इ.साठी मनुष्य बळाचा, वेळेचा, तुटीचा इ.ताळेबंद मांडला. तसेच सदरच्या गव्हाचे ऐवजी अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट, कॅप्टनकुक वगैरे कंपन्याकडून व्यवस्थापनाला अप्रत्यक्ष मिळणाऱ्या कमिशनचा हिशोब मांडलेला नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



४) दरवर्षी श्री साईबाबा संस्थान कोपरगांव व राहाता बाजार समितीत गहु खरेदी करत होते. शेतकरी आपला गहू विकत नव्हता जो पर्यंत संस्थान खरेदी सुरु करत नाही तो पर्यंत शेतकऱ्याला संस्थानला गहु दिल्याचा आनंद प्राप्त होत असे. शेतकरी कमिशन देत नाही म्हणून खरेदीची पध्दत बदलली. पण आतातर गहुच वापरण्याचे बंद करुन संस्थानने भांडवलदारांचेच संस्थान झाल्याचे सिध्द केलं.

५) संस्थानला अनेक शेतकरी गव्हाचे दान देतात. पर्यायाने संस्थान ते स्विकारणार नाही, हा त्रिसदस्य समितीने घेतलेला निर्णय चुकीचा आहे. त्याचा पुर्नविचार व्हावा. आटा खरेदीमुळे पुन्हा एकदा गुणवत्तेचा, भेसळीचा प्रश्न उद्‌भवणार व संस्थानच्या अन्नाची गुणवत्ता ढासाळणार.

६) श्री साईबाबांची गहु दळण्याची परंपरा अखंडीत ठेवणे हे संस्थानचे कर्तव्य आहे. संस्थानने या निर्णयाचा पुर्नविचार दि.२१/१०/२०१२ पर्यंत न केल्यास मी दि.२१/१०/२०१२ रोजी व्दारकामाई समोरील प्रागंणात सकाळी ९ वाजेपासून ते ५ वाजेपर्यंत धरणे देणार आहे. त्या काळात मी प्रतिकात्मक जात्यावर गहु दळून आपणास बाबांची परंपरा खंडीत करण्याचा अधिकार नसल्याचा संदेश देणार आहे.

श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना अल्प दरात प्रसादभोजन सेवा व अल्पोपहार म्हणून सकाळी अन्नपाकीटे पुरविण्यात येतात. प्रसादभोजनामध्ये व अन्नपाकीटात चपाती/पुरी चा वापर करण्यात येतो. त्यासाठी दरवर्षी साधारणतः १३००० क्विंटल गहु खरेदी करणेत येतो. सदर गहु हा राहाता, कोपरगांव, कोल्हार येथील कृषी उत्पन्न समितीचे बाजारांमधून शेतकऱ्यांकडून लिलाव (मोंढयाहून) पध्दतीने खरेदी करण्यात येत होता. तथापि-

**(१)** मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभा १२/०६/२०१२ मधील निर्णय क्रं.३३५ नुसार संस्थानचे प्रसादालय विभागासाठी गहु खरेदी करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं. ४०५१/२०१२ मध्ये दि.०५/०५/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानूसार जुन,२०१२ ते सप्टेंबर,२०१२ या ०४ महिने कालावधीकरीता आवश्यक असणारा गहु खरेदीकामी ०२ स्थानिक व ०२ आघाडीचे राष्ट्रीय वर्तमानपत्रात जाहीरात देऊन टेंडर्स मागविण्यात यावेत व विहीत पध्दतीने आवश्यक असणारा गहु खरेदी करणेबाबतच्या निर्णयास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२ या चार महिन्यासाठी जाहीर निविदा मागवून मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक यांचेकडून ४३०० क्विंटल गहु रु.१७००/- प्रति क्विंटलप्रमाणे गहु खरेदी करण्यात आलेला होता.

**(२)** मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभा दि.१८/०७/२०१२ मध्ये यापूर्वी जाहिर निवीदा मागवून खरेदी करण्यात आलेल्या गव्हाची किंमत व सदर गहु खरेदी केल्यानंतर साठा करणे, वहातूक करणे, निवडणे व दळणेकामी लागणारे मनुष्यबळ, घट-तुट, गोडाऊन भाडे, फ्युमिगेशन, इलेक्ट्रीसिटी खर्च, मशिनरी घसारा या सर्व कामासाठी प्रती क्विंटल आटा तयार करणेस खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येतो.

मजुरी खर्च

| अ. नं. | दररोज आटा तयार करणेस येणारा मजुरी खर्च (३६ क्विंटल आटा) | कर्मचारी संख्या | मजूरी दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रीक्लिनर व डिस्टोनर मशिन ऑपरेटर (प्रती शिफ्टसाठी २ प्रमाणे) | ०४ | | |
| २ | गिरणी चालक (प्रती शिफ्टसाठी ३ प्रमाणे) | ०६ | | |
| ३ | मध्यवर्ती भांडार ते प्रसादालय वहातूक करणारे कर्मचारी (प्रती शिफ्टसाठी २ प्रमाणे) | ०४ | | |
| | एकुण कर्मचारी | १४ | रु.२६६.०० | रु.३७२४.०० |
| | १ क्विंटलसाठी मजूरीचा खर्च = रु.३७२४.०० / रु.२६६.०० | | | रु. १०३.०० |

१०० किलो गहू आटयासाठी येणारा खर्च-

| अ.नं. | तपशिल | एकुण रक्कम |
|---|---|---|
| १ | १ क्विंटल (१०० किलो) गहू किंमत | रु. १७००.०० |
| २ | १ क्विंटल गहू वाहतूक, निवडणे, दळणे मजूरी खर्च | रु. १०३.०० |
| ३ | १ क्विंटल गव्हामध्ये १ किलो घट-तुट खर्च | रु. १७.०० |
| ४ | १ क्विंटल गव्हासाठी मशिनरी घसारा/मेंटेनन्स १% (४ ते ६) | रु. १८.०० |
| ५ | १ क्विंटल गव्हासाठी गिरणी, डिस्टोनर, प्रीक्लिनर, आटा चाळणी, इलेक्ट्रिक खर्च | रु. २०७.०० |
| | १ क्विंटल गहू आटयासाठी येणारा खर्च | रु.२०४५.०० |

उपरोक्त खर्चाव्यतिरीक्त एकाच वेळी गहू खरेदी केल्याने त्यासाठी अंदाजे २ कोटी रक्कम गुंतवावी लागते. तसेच गहू साठविणे, किटकापासून सुरक्षित ठेवणे (फ्युमिगेशन), कोपरगांव गोडावून भाडे, विमा, कोपरगांव ते शिरडी वहातूकीचा खर्च येत असल्याने मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीने

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त सर्व कामाचा/खर्चाचा विचार करुन चपाती/पुरीकरीता अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट, कॅप्टनकुक वगैरे दर्जेदार कंपन्याचा ब्रँडेड आटा निविदा मागवून खरेदी करणेबाबतचा निर्णय झालेला असून त्यास निर्णय क्र.६१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती.

**(३)** मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभा दि.१२/११/२०१२ नूसार खरेदी विभागाने नोव्हेंबर-२०१२ ते मार्च-२०१३ या पाच महिन्यांकरीता ९००० क्विंटल रेडीमेड गहु आटयाची मागणी केलेली असून सभेत झालेल्या चर्चा/वाटाघाटीतील चर्चेअंती निर्णय क्र.८८२ अन्वये मे. हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांना सम्राट ब्रॅण्डचा गहू आटा जा.क्र.३७३० दि.१९.११.२०१२ अन्वये रु.२०१०/- प्रती क्विंटल दराने पुरवठा करणेबाबतचा आदेश देणेत आलेला होता.

**(४)** मे.हिरालाल चुनिलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचे दि.२२.११.२०१२ चे पत्राने खरेदी विभागाकडील पुरवठा आदेश आम्हाला प्राप्त झालेला आहे. तथापि पुरवठा आदेशातील सम्राट ब्रॅण्ड गहू आटा मिल मालक देण्यास तयार नसल्याने सम्राट ब्रॅण्डचा गहू आटा पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत असल्याने आम्ही सम्राट ब्रॅण्डचा गहू आटयाचा पुरवठा करु शकत नाही असे कळविल्याने मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.११.२०१२ निर्णय क्र.८८७ नुसार द्वितीय न्युनतम दरधारक मे.आर मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना रु.२०५२/-प्रती क्विंटल दराने पुरवठा आदेश देण्यात यावा व तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या स्वरुपात महाबीज अथवा जवळच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधून गहू खरेदी करणेत यावा असा निर्णय झालेला असल्याने खरेदी विभागाने ३०० क्विंटल गहू रु.२०७३/- ते रु.२०८४/-प्रती क्विंटल या दराने कृषी उत्पन्न समिती बाजारामधून लिलाव पद्धतीने खरेदी केलेला होता. तसेच मे.आर मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना जा.क्र.४०८६ दि.०८.१२.२०१२ अन्वये रु.२०५२/- प्रती क्विंटल या दराने पुरवठा आदेश देणेत आलेला असून मागणीप्रमाणे त्यांचेकडून गहू आटयाचा पुरवठा सुरु झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०७.२०१२ चे सभेत घेतलेल्या रेडीमेड आटा खरेदीच्या निर्णयामध्ये जुन २०१२ ते सप्टेंबर २०१२ चे रु.१७००/-प्रती क्विंटल ग्राहय धरण्यात आलेले होते. तथापि ३० नोव्हेंबर ते ७ डिसेंबर २०१२ या दरम्यान कृषि उत्पन समितीचे बाजारामधून लिलावाने खरेदी केलेल्या गव्हाची किंमत ही सरासरी अंदाजे रु.२०७८/- प्रती क्विंटल असून मजूरी, वहातूक, दळण, घट-तुट आदी बाबींवरील इतर खर्चाचा विचार करता हा दर रु.२,४२३/- प्रती क्विंटल (रु.२०७८/- +रु.३४५/-) असा येतो. त्यामुळे रेडीमेट आटा खरेदी दर रु.२०५२/- प्रती क्विंटलचा विचार करता रु.३७१/- प्रती क्विंटल जादा खर्च येत असल्याने रेडीमेट आटा परवडतो.

महाराष्ट्र शासन यांचे पत्रानुसार, श्री संजय भास्करराव काळे यांचे पत्रावर आवश्यक ती कार्यवाही करुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे शासनास अभिप्राय देता येईल असे वाटते.

१) सदर कर्मचा-यांना प्रसादालयाव्यतीरिक्त अनेक सेवा उपलब्ध आहेत व ते सेवेत असल्याने त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर कोणताही वाईट परिणाम होणार नाही.

२) मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं. ४०५१/२०१२ मध्ये दि.०५/०५/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानूसार १४ (ई) अन्वये खंडपीठाने निर्धारीत केलेली कमिटीस प्रसादालय किराणा माल खरेदीबाबत अंतिम निर्णय घेण्याची पुर्ण मुभा राहील असा हुकूम पारीत झालेला असल्याने मा.व्यवस्थापन समितीने किराणा मालाचे खरेदीबाबत निर्णय घेतलेला आहे. हे मंडळ कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे काम करीत असल्याने विश्वस्त मंडळ अधिनियमाचे विरुद्ध काम करीत नाही.

तसेच तयार आटयामुळे जाते बंद होणार आहे असे म्हटले आहे. येथे बाबांच्या जात्यावर सर्वांची श्रध्दा आहे. परंतू श्रींचे दर्शनास येणारे साईभक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने परिस्थितीनुरुप चांगल्या प्रतीचे आटयाच्या चपात्या देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे परंपरा खंडीत होत नाही.

३) प्रसादालय किराणा मालाची निविदा औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या हुकूम १४ (डी) नुसार दोन राष्ट्रीय व दोन स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविणेत येते. प्राप्त झालेल्या नमुन्यांच्या पुरवठाधारकांना चर्चेसाठी आमंत्रित करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात येत असल्याने यामध्ये अन्नपुर्णा, शक्तीभोग, सम्राट अथवा कॅप्टनकुक अशा कंपन्याकडून व्यवस्थापनाला कोणत्याही प्रकारे कमिशन मिळत नाही.

४) आटा हा गव्हापासून बनविलेला असतो म्हणजे गहु शेतकऱ्याचा असतो. व आटा खरेदीची पध्दतही पारदर्शी आहे. तसेच गहू खरेदी करुन आटा तयार करणेपर्यंत जो खर्च येतो त्यापेक्षा गव्हाचा तयार आटा खरेदी केल्यास गव्हापेक्षा आटा स्वस्त पडतो म्हणजे साईबाबांच्या पैशाची बचतच होते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



५) शेतकऱ्याचे गव्हाचे दान स्वीकारु नये, असा कोणताही त्रिसदस्यीय समितीने निर्णय घेतलेला नसून आजही साईभक्तांने दिलेली अन्नधान्याची देणगी स्वीकारीत आहोत. तथापि अन्न व औषध प्रशासनाचे अटी/ शर्तीचे अधिन राहूनच नामांकित असलेल्या कंपन्याकडून आटा खरेदी करीत असल्याने भेसळीचा प्रश्न उद्‌भवत नाही व संस्थानच्या अन्न प्रसादाची गुणवत्ताही राहते.

६) उपरोक्त मुद्दयाचा विचार करता, श्री साईबाबांची गहू दळण्याची परंपरा संस्थानने अखंडीत ठेवलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी संदर्भिय पत्रान्वये रेडीमेड आटा खरेदी करण्याचे निर्णयाबाबत उपस्थित केलेले मुद्दे व संस्थानने रेडीमेट आटा खरेदी करणेबाबत घेतलेल्या निर्णयाची सद्य परिस्थिती तसेच शासनाने मागणी केल्याप्रमाणे स्वयंस्पष्ट अभिप्रायावर मा.व्यवस्थापन (त्रिसदस्सीय) समिती सभेपुढे चर्चेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने आटा घेऊ नये, असा मा.मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिलेला असल्याने सदरहू पत्र फाईल करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.५५ सन २०१२ -१३ ऐवजी सन २०१३ - १४ वर्षाकरीता साईआश्रम भाग ०१ व ०२ इमारतीमधील खोल्या/ हॉलमध्ये ढेकुण, झुरळे इत्यादी करीता पेस्ट कंट्रोल व उंदिर, घुस इत्यादीचे प्रतिबंधासाठी रोडेंट कंट्रोल करण्याचे वार्षीक कॉन्ट्रॅक्टचे कार्यादेशास मंजुरीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रीसदस्य समिती दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.३६७ नुसार, सन २०१२ - १३ या वर्षाकरीता साईआश्रम- १ व साईआश्रम- २ करीता पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी निविदा सुचनाची जाहीरात दि.०२/०७/२०१२ रोजीचे दै.सामना या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तद्‌नंतर टेंडरबाबतची संपुर्ण प्रक्रिया (प्री.बीड मिटींग, समक्ष चर्चा वाटाघाटी) पुर्ण झाल्यावर, मा. त्रीसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.१००९ नुसार, सन २०१२-१३ करीता साईआश्रम -१ व साईआश्रम -२ विभागासाठी पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी तुलनात्मक तक्यातील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. पुणे शाखा- नाशिक , यांना कार्यादेश देण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४ /२०१२ व १२६९५ /२०१२ पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दि.२१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानुसार साईआश्रम भाग - १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची असल्यामुळे टेक्नीकल एक्सपर्ट यांची नेमणुक झाल्यानंतर पडताळणी करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरण दि.०१/०४/२०१२ ते दि .०८/१०/२०१२ या कालावधीत मा. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाबाबतचे होते. पेस्ट कंट्रोल कामाचे कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतचा समावेश सदर कालावधीत नव्हता. तद्‌नंतर मा. त्रीसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्रं. १००९ अन्वये मे. पेस्ट कंट्रोल कामाचे कॉन्ट्रॅक्ट मे.जी. टी. पेस्ट कंट्रोल, प्रा.लि. पुणे यांना कार्यादेश देणेबाबत निर्णय झालेला आहे.

दि.०१/०४/२०१२ ते दि .०८/१०/२०१२ या कालावधीचे प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ठ होते. त्यामुळे साईआश्रम - १ / २ चालु करण्यास परवानगी न मिळाल्याने मे.जी. टी. पेस्ट कंट्रोल, प्रा.लि. पुणे यांना सन २०१२-१३ चा कार्यादेश देण्यात आलेला नव्हता.

आता मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२०/०२ /२०१३ रोजी केलेल्या ऑर्डरनुसार परवानगी मिळालेली आहे.

उपरोक्त आदेश संस्थानला प्राप्त झालेनंतर साईआश्रम - १ सुरु करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने साईआश्रम - १ व साईआश्रम - २ विभागातील पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल इत्यादी कामे करण्यासाठी तुलनात्मक तक्यातील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन मा. व्यवस्थापन त्रीसदस्य समिती दि. ०८/१२/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं. १००९ अन्वये मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. पुणे शाखा- नाशिक यांना कार्यादेश देणेबाबतचा कालावधी / वर्ष सन २०१२-१३ हे संपुष्टात येत असुन, आता नव्याने सन २०१३- १४ करीता (दि.०१/४/२०१३ ते दि.३१/०३/२०१४) या १ वर्षाचे कालावधीसाठी साईआश्रम भाग - १ साठी जा.न. एसएसएसटी / वशी - साईआश्रम - १ / ५८७४ / २०१३ दि. २३/०३/२०१३ अन्वये एकूण वार्षिक रक्कम रुपये ३,७६,०४२/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

याकामी मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही-अधिक्षक, साईआश्रम भाग ०१ व ०२)

---

**विषय नं.५६** **साईआश्रम भाग ०१ च्या परिसरातील इमारती, पार्किंग संदर्भातील दिशादर्शक माहितीसह नावाचे रिप्लेक्टीव्ह सिटमधील बोर्ड तयार करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग १ कडील कामकाज दि. ०१/०४/२०१३ रोजी पासुन सुरु करण्यात येणार आहे. दि.११/०४/२०१३ रोजी (गुढीपाडवा) साईआश्रम भाग- १ चे उद्‌घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदय मा. श्री पृथ्वीराज चव्हाण साहेब यांचे शुभहस्ते होणार आहे. दि.२०/०३/२०१३ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी साईआश्रम भाग- १ कडील कामकाजाची पहाणी करतांना साईभक्तांना इमारतीबाबत व पार्किंगबाबत माहिती मिळावी ते गोधंळात पडु नये. त्यादृष्टीने परिसरातील इमारती, पार्किंग संदर्भातील दिशादर्शक माहितीसह नावाचे बोर्ड लावणेबाबत निर्देश दिले आहेत.

बोर्डचा तपशील खालीलप्रमाणे-

| बोर्डचा तपशील | वापरावयाचे मटेरियल | आवश्यक नग | अंदाजे सर्व करासह प्रति नग दर रुपये पैसे | अंदाजे एकुण सर्व करासह रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| **दिशादर्शक मसुद्याचा तपशील सोबत जोडल्या प्रमाणे** | १. ॲल्युमिनियम कंम्पोझिट पॅनेलवर रिप्लेक्टीव्ह सिटमध्ये<br>२. एक इंची लोखंडी स्केअर पाईप फ्रेमवर फिटींगकरुन<br>३. त्यावर बिल्डींग पार्किग इत्यादी संबंधी दिशादर्शक माहितीचे बोर्ड तयार करणे.<br>४. लोखंडी U चायनलवर नटबोल्ड फिटींग,<br>५. १४ फुट उंचीचे २ फुटावर होलपास असलेले लोखंडी चानलचा वापर<br>६.६.५ फुटामध्ये-अ) ५ फुट x १ फुट चा पहीला बोर्ड<br>ब) ५ फुट x २ फुट चा दुसरा बोर्ड<br>क) ५ फुट x २ फुट चा तिसरा बोर्ड<br>ड) ५ फुट x १.५ फुट चा चौथा बोर्ड<br>इ) प्रत्येक बोर्डमध्ये दोन इंचाचा गॅप<br>ई) लोखंडी मटेरियल कलर कोटींगसह | १२ | १६,६६७/- | २,००,००४/- |

उपरोक्त दिशादर्शक बोर्डास अंदाजे रु. २,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.सदरचे तयार होऊन येणारे बोर्ड बांधकाम विभागामार्फत परिसरामध्ये सिमेंट कॉंक्रीटमध्ये बसवुन घ्यावे लागेल.

सदरची बाब तातडीने करुन घ्यावयाची आहे. तरी सदरचा खर्च रु. २,००,०००/- चे खर्चास व परिसरातील पेंटरकडुन दरपत्रके मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस तसेच बांधकाम विभागाने बोर्डचा एक नमुना ड्राईंग तयार केले असुन त्यानुसार बोर्ड बनविणेकामी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ च्या परिसरातील इमारती, पार्किंग संदर्भातील दिशादर्शक माहितीसह नावाचे रिप्लेक्टीव्ह सिटमधील बोर्ड परिसरातील पेंटरकडुन दरपत्रके मागवून तयार करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, साईआश्रम भाग ०१ व ०२)

---

**विषय नं.५७** **व्दारावती भक्तनिवास यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग कामासंबंधी, देण्यात आलेल्या कंपनीला ३ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास विभागामध्ये ८० एसी. व २६४ नॉन एसी अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्याची साफ सफाई तसेच हाऊस किपींग व द्वारावती विभागाचा इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे, आऊट सोर्सिंग पद्वतीने करुन घेतले जातात.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन समिती सभा दि.१९/०२/२०१२ मधील निर्णय क्रं.२४३ व जा.नं. एसएसएस / वशी - द्वारावती/२५९ /१२ दि.१७/०४/२०१२ अन्वये मे.बी.व्ही.जी.इंडीया लि,पुणे यांना स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी, केमीकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यासह दरमहा सर्व करासह रु.७,२५,०००/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.या कामाची मुदत दि.३१/०३/२०१३ अखेर संपुष्टात येत आहे.

सन २०१३ - १४ या वर्षात द्वारावती भक्तनिवास विभागाचे दैनंदिनी आवश्यक हाऊसकिपींग कामासाठी मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०२/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.९३ अन्वये द्वारावती भक्तनिवास विभागातील दि.११/०२/२०१३ रोजीची निविदा सुचना जाहिरात प्रसिद्ध करणे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



बाबत मजूर टिपणी नुसार दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सन २०१३ - १४ या वर्षासाठी निविदा मागविण्यात आल्या. विभागातील दिनांक १५/०३/२०१३ चे मजूर टिपणी नुसार पात्र ०३ निविदाधारकांना मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणे बाबतचा विषय सभाकामकाज विभागाकडे देण्यात आलेला आहे.परंतु सदरच्या विषयावर निर्णय होणे बाकी आहे.

सबब सध्या मे.बी.व्ही.जी.इंडीया लि,पुणे हि कंपनी सन २०१२ - १३ साठी आऊट सोर्स पद्धतीने हाऊस किपींगचे काम करीत असल्याने या कंपनीला दिलेला कार्यादेश व करारनाम्यातील शर्ती व अटीस अधीन राहुन दि.०१/०४/२०१३ पासुन पुढील तीन महिण्यासाठी अगर सन २०१३ - १४ साठी मागविण्यात आलेले निविदाधारकांशी चर्चा वाटाघाटी करुन पुढील निर्णय होई पावेतो मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

तत्वता मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासचे यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींगसाठी दिलेल्या कामाची मुदत दि.३१.०३.२०१३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सदर कंपनीला दिलेल्या कार्यादेश व करारनाम्यातील शर्ती/ अटीस अधीन राहुन दि.०१/०४/२०१३ पासुन पुढे एक महिना मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**विषय नं.५८** **साई भक्तनिवासांकरिता नवीन बेडशीट, उशीकव्हर सह खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान,साईप्रसाद निवासस्थान विभाग,द्वारावती भक्तनिवास विभागाकडे असणा-या सर्व खोल्या साईभक्तांचे निवासाकरीता वापरात आहेत.सदर खोल्यांमध्ये असणा-या कॉट वर फायबर क्वायर फोम गादया असुन गादयांवर नामांकीत कंपनीचे बेडशीट वापरात आहेत. आपणाकडे साईभक्तांची नेहमीच गर्दी असते त्यामुळे साईभक्तांसाठी वापरात असणारे कपडे- चादर, गादीकव्हर, बेडशीट,उशीकव्हरसह चा वापर मोठया प्रमाणावर सतत होत असतो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजी झालेल्या बैठकीमधील विषय नं.२७ व निर्णय क्र.४१५ अन्वये चादरी,गादया व बेडशीटचा वापर कालावधी जास्तीजास्त तीन वर्षाचा धरण्यात यावा दर तीन वर्षांनी गादी,चादर,बेडशीट बदलण्यात यावे असा निर्णय संमत झोलेला आहे.सध्या तीन ही निवासस्थानांमध्ये खालीलप्रमाणे कपडे साईभक्तांचे वापरात आहेत.

१) साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग

| अ. नं | तपशिल | संगणक कोड | खरेदी व वापरात घेतलेली दिनांक | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट ६०x९० | CLT-६०८० | १४/०१/२०१२ | १२०० | १४९.०० | १,७८,८००/- |
| २ | बेडशीट ६०x९० | CLT-६०८१ | ०२/०९/२०११ | २४०० | १४९.०० | ३,५७,६००/- |
| ३ | बेडशीट ६०x९० | CLT-६०८२ | २५/०२/२०१२ | १८०० | १४९.०० | २,६८,२००/- |
| ४ | बेडशीट ६०x९० | CLT-६०८५ | २४/०६/२०१२ | ४०० | १४९.०० | ५९,६००/- |
| ५ | बेडशीट ६०x९० | CLT-६०८९ | १४/०७/२०१२ | २०० | १४९.०० | २९,८००/- |
| | | | **एकुण-** | ६००० | १४९.०० | ८,९४,०००/- |

त्याचप्रमाणे उशीकव्हर खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं | तपशिल | संगणक कोड | खरेदी व वापरात घेतलेली दिनांक | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०८३ | १७/०३/२०१२ | २८०० | ३९.९९ | १,११,९७२/- |
| २ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०८४ | २२/०६/२०१२ | १००० | ३९.९९ | ३९,९९०/- |
| ३ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०८६ | २८/०६/२०१२ | १००० | ३९.९९ | ३९,९९०/- |
| ४ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०८७ | ०७/०७/२०१२ | १००० | ३९.९९ | ३९,९९०/- |
| ५ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०८८ | १४/०७/२०१२ | १००० | ३९.९९ | ३९,९९०/- |
| ६ | उशीकव्हर १८x२४ | CLT-६०९० | ०७/०८/२०१२ | ८२० | ३९.९९ | ३२,७९२/- |
| | | | एकुण- | ७६२० | ३९.९९ | ३,०४,७२४/- |

१) साईप्रसाद निवासस्थान विभाग -

| अ.नं | तपशिल | संगणक कोड | वापरात घेतलेली दिनांक | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बॉम्बे डाईंग बेडशीट सफेद प्लेन | BES-३०८७ | ०१/०१/२०११ | ६० | -- | ३७,०५०/- |
| २ | बॉम्बे डाईंग बेडशीट सफेद प्लेन | BES-३०८७ | ०१/०१/२०११ | १०० | -- | ५७,९५०/- |
| ३ | बॉम्बे डाईंग बेडशीट | | | | | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निळा प्लेन | BES-३०८९ | ०१/१२/२०१२ | ६० | -- | ३९,६००/- |
| ४ | बॉम्बे डाईंग बेडशीट पिवळा प्लेन | BES-३०९० | ०१/१२/२०१२ | ५० | -- | ४७,५००/- |
| ५ | उशीकव्हर निळसर | --- | २०/०३/२००५ | १००० | -- | २१,४०५/- |
| ६ | उशीकव्हर गुलाबी | --- | ०५/०८/२००९ | ७८० | -- | २२,८१५/- |
| ७ | फोम उशी विविध रंगी | PIL -३११० | ०१/०१/२००४ | ३०० | -- | २२,३८९/- |
| ८ | फोम उशी विविध रंगी | PIL -३१११ | २०/०३/२००४ | २०० | -- | १४,९२६/- |

३) द्वारावती भक्तनिवासस्थान -

| अ. नं | तपशिल | संगणक कोड | वापरात घेतलेली दिनांक | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट प्लेन अंबोली ६०x९० मफतलाल | MIS- D०६० MIS- D०६३ MIS- D०६७ | १८/०७/२०१२ | ३००० | -- | ४,४१,०००/- |
| २ | उशीकव्हर १८x२७ प्लेन अंबोली मफतलाल | MIS- D०६५ MIS- D०६६ MIS- D०७२ | १८/०७/२०१२ | ३१५० | -- | १,१८,२०२/- |
| ३ | बेडशीट प्लेन ब्लु पिस्ता, ६०x९० मफतलाल | MIS- D०६८ MIS- D०६९ | १८/०७/२०१२ | ५६० | -- | ८२,३२०/- |
| ४ | बेडशीट प्लेन ब्लु पिस्ता,९०x१०० मफतलाल | MIS- D०५८ MIS- D०७० | १८/०७/२०१२ | ३०० | --- | ७३,५००/- |
| ५ | उशीकव्हर प्लेन ब्लु पिस्ता, १८x२७ मफतलाल | MIS- D०६६ MIS- D०७१ | १८/०७/२०१२ | १०४० | -- | ३९,६५४/- |

वापरात असल्याने सद्य:स्थिती उपरोक्त तीनही निवासस्थानांमधील नमुद बेडशीट व उशीकव्हर खरेदी नंतर तात्काळ साईभक्तांचे सेवेत रुजु करण्यात आले. साईभक्तांना स्वच्छ व धुतलेले बेडशीट उशीकव्हर पुरविले जातात त्यामुळे बेडशीट उशीकव्हर धुलाई नियमीत करावी लागते. वारंवार धुलाईमुळे व सततच्या वापराने बेडशीट उशीकव्हर लवकर निकामी होतात.शिल्लक साठा नसल्याने खालीलप्रमाणे नवीन बेडशीट, उशीकव्हर,फोमउशी खरेदीकरणे साईभक्तांचे हिताचे दृष्टीने व ऐनवेळी साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन आवश्यक आहे.

**अ) साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग-**

| अ. नं | तपशिल | साईज | आवश्यक नग | अंदाजे दर प्रति नगास | एकुण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॉटन रंगीत (एक रंगी,गडद रंग) बेडशीट उशीकव्हरसह नामांकित कंपनी जाड कापड असलेले. | बेडशीट ६०x९० उशीकव्हर १८x२४ | ६००० नग प्रत्येकी (बेडशीट उशीकव्हरसह) | ३६० प्रति नगास बेडशीट उशीकव्हरसह | २१,६०,०००/- |

**ब) साईप्रसाद निवासस्थान विभाग -**

| अ. नं | तपशिल | साईज | रंग | कंपनी | मागणी नग | अंदाजे प्रति नग कींमत | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईनिवास अतिथी गृह, बेडशीट, उशीकव्हरसह सिंगल कॉट | ६० x९० | ग्रीन प्लेन | बॉम्बे डाईंग कॉटन बेडशीट | १०० | ६००/- | ६०,०००/- |
| २ | साईनिवास अतिथी गृह, बेडशीट, उशीकव्हरसह डबल कॉट | ९०x१०० | बदामी प्लेन | बॉम्बे डाईंग कॉटन बेडशीट | १०० | ९००/- | ९०,०००/- |
| | | | | एकुण- | २०० | | १,५०,०००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**क) द्वारावती भक्तनिवासस्थान विभाग -**

| अ.नं | तपशिल | साईज | रंग | कंपनी | मागणी नग | अंदाजे प्रति नग कींमत | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट Non. A/C रुम सिंगल बेडसाठी | ६० x ९० | प्लेन अंबोली | बॉम्बे डाईंग कॉटन बेडशीट | २२०० | २००/- | ४,००,०००/ |
| २ | उशीकव्हर Non. A/C रुम साठी | १८ x २७ | प्लेन अंबोली | बॉम्बे डाईंग कॉटन उशीकव्हर | २२०० | ६०/- | १,३२,०००/ |
| ३ | बेडशीट A/C रुम सिंगल बेडसाठी | ६० x ९० | प्लेन ब्ल्यु | बॉम्बे डाईंग कॉटन बेडशीट | २५० | २००/- | ५०,०००/- |
| ४ | बेडशीट A/C रुम डबल बेड करीता | ९० x १०० | प्लेन ब्ल्यु | बॉम्बे डाईंग कॉटन बेडशीट | २५० | ३५०/- | ८७,५००/- |
| ५ | उशीकव्हर A/C रुम सिंगल बेड करीता | १८ x २७ | प्लेन ब्ल्यु | बॉम्बे डाईंग कॉटन उशीकव्हर | ७५० | ६०/- | ४५,०००/- |
| | | | | | | एकुण रुपये - | ७,५४,५००/- |

| अ.नं | विभागाचे नाव | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | २२,००,०००/- |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | १,५०,०००/- |
| ३ | द्वारावती भक्तनिवासस्थान | ७,५४,५००/- |
| | **एकुण रुपये -** | **३१,०४,५००/-** |

उपरोक्त प्रमाणे तीनही भक्तनिवासस्थानासाठी खालीलप्रमाणे नविन बेडशीट,उशीकव्हर व फोमउशी खरेदीकामी अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

पुर्णाकिंत रुपये ३१,००,०००/- (अक्षरी रुपये ऐकतीस लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.सदर खर्चाची तरतुद उपरोक्त प्रमाणे तीन निवासस्थान विभागाचे मंजुर अर्थ संकल्पीय रक्कमेतुन करता येईल.

बेडशीट उशीकव्हरसह,चादर,गादीकव्हरचा वापर जास्त असल्याने स्वच्छ बेडशीट उशीकव्हरसह, चादर, गादीकव्हर साईभक्तांना पुरविणे शक्य व्हावे यासाठी आपण बेडशीट उशीकव्हरसह, चादर, गादीकव्हर वेळोवेळी आपले लॉण्ड्रीविभागाकडुन धुवून घेत असतो त्यामुळे सदर कपडयांचा वापर कालावधी आपोआप सततच्या धुण्याने कमी होत जातो.

दि.०६/०८/२००५ रोजीचे समंत ठरावा अन्वये कपडयांचा वापर कालावधी तीन वर्षाचा निश्चित केलेला आहे.परंतु सदर कालावधी मोठा आहे.दि.०७/०२/२०१३ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी श्री माने सो.,प्रशासकिय अधिकारी श्री साबळे सो.वैद्यकिय अधिक्षक श्री डॉ.पठारे सो. व इतर विभाग प्रमुख यांनी केलेल्या श्री क्षेत्र गजानन महाराज संस्थान,शेगाव चा पाहणी दौ-यामध्ये तेथील निवासस्थानासाठी उपलब्ध असणारे बेडशीट,उशीकव्हर व गादीकव्हर हे एक वर्षामध्ये नविन खरेदी करुन वापरात घेतात त्याचप्रमाणे चादर व गादी हे तीन वर्ष वापरतात.

आपणाकडील बेडशीट,उशीकव्हर,गादीकव्हर हे प्रती एक ते दीड वर्षानी साईभक्तांचे सेवेतुन काढुन नविन बेडशीट,उशीकव्हर,गादीकव्हर खरेदी केले तर साईभक्तांना सर्वोत्तम सेवा प्रदान करुन साईभक्तांचे पुर्ण समाधान करता येईल व जुने बेडशीट,उशीकव्हर,गादीकव्हर साईभक्तांचे सेवेतुन काढल्यानंतर अन्य विभागास स्वच्छतेकामी देता येतील अथवा वार्षिक कराराने विहित पध्दतीने अभिलेख कक्ष मार्फत विकता येतील तरी उपरोक्तप्रमाणे निवास विभागासाठी नविन बेडशीट, उशीकव्हर, फोमउशी खरेदीकामी येणारे खर्चास तथा खरेदी विहित पध्दतीने संस्थानचे खरेदी विभागामार्फत करणेस व या पुढे नित्य भक्तोपयोगी कापडी वस्तु (बेडशीट,उशीकव्हर,गादीकव्हर.आदी) दर एक ते दीड वर्षांनी बदलुन नविन खरेदी करण्यास त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान भक्तनिवासस्थानांमधील बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर दीड वर्षांनी (१८ महिने) नंतर बदलणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, नवीन बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर खरेदी करते वेळी निविदेमध्ये पुरवठाधारकांकडून सध्याचे व दुस-या दीड वर्षानी आवश्यक असलेल्यांची संख्या निश्चित करुन, त्यासाठी त्यांचा निविदेमध्ये समावेश करण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात व त्यांचे**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**दोनही वेळचे दर व नमुने निश्चित करणेत यावे. यानुसार दीड वर्षानी त्या मंजुर दराने त्यांचेकडून दुसऱ्या टप्प्यातील बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर यांची खरेदी करुन घेण्यात यावी. पुर्वीचे बदललेले बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर यांचा लिलाव/ वार्षीक निश्चित केलेल्या दराने विक्री करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, उपरोक्त खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईभक्तनिवासस्थान /अधिक्षक, व्दारावती / अधिक्षक, साईआश्रम ०१ व ०२ / अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान )

---

**विषय नं.५९** **श्री साई दिनदर्शिका २०१३, ६ पेजेस (१९" x २९") इंग्रजीचा साठा जास्त प्रमाणात शिल्लक असल्याने सरकारी कार्यालये अथवा इतरत्र विनामुल्य वाटप करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा दिनदर्शिका २०१३, १२ पेजेस, (१९"x२९") इंग्रजी ५०,००० नगांची, प्रती नग रु.२१.७५/- दराने छपाई करुन पुरवठा करणेबाबत मे.टॅको व्हीजन प्रा.लि.,मुंबई यांना जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने / १९२६/२०१२ दि.३१.०७.२०१२. अन्वये कार्यादेश देणेत आला होता. त्यांनी कार्यादेशाप्रमाणे छपाईचा पुरवठा पूर्ण केला आहे. प्रकाशने विभागाचे सर्व बुकस्टॉलवर त्यांची नोव्हेंबरचे शेवटच्या आठवडयापासून रु.२५/- दराने विक्री सुरु आहे.

सदर दिनदर्शिकांचे खरेदीस भक्तांचा विशेष प्रतिसाद नसल्याने दि.२५.०३.२०१३ अखेर २५३०१ नगांचा साठा शिल्लक आहे. शिल्लक साठ्याचा विचार करता सर्व दिनदर्शिकांची विक्री होणे अपेक्षित नाही. सबब श्री रामनवमी उत्सवानंतर शिल्लक राहाणा-या दिनदर्शिका सरकारी कार्यालयांना विनामूल्य वाटता येतील अथवा देणगी काऊंटरवर वस्तुरुपाने अथवा रोख स्वरुपात रु.१०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या भक्तास सप्रेम भेट म्हणून विनामुल्य देता येतील. त्यामुळे भक्तांना आनंद वाटेल तसेच दिनदर्शिकांचा हिशोबही व्यवस्थीत होईल.

मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा दिनदर्शिका २०१३ थ्रीडी डेस्क, ७ शिटर आकार ९.७५" x ०७" इंग्रजीचा साठा जास्त प्रमाणात शिल्लक असल्याने किंमत कमी करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा दिनदर्शिका २०१३ थ्रीडी डेस्क ७ शिटर आकार ९.७५" X ०७" इंग्रजी २०,००० नगांची, प्रती नग रु.१६६/- दराने छपाई करुन पुरवठा करणेबाबत मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांना जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/४३३८/२०१२ दि.२२.१२.२०१२ चे पत्रान्वये कार्यादेश देणेत आलेला होता. सदर कॅलेंडर छपाईचा विषय न्याय प्रविष्ट असल्याने व दि.२१.१२.२०१२ रोजी मा.उच्च न्यायालयाची मान्यता आल्यानंतर छपाई कार्यादेश दि.२२.१२.२०१२ रोजी देण्यात आला असून, दि.२२.१२.१२ पासून प्रकाशने विभागाचे सर्व बुकस्टॉलवर त्याची विक्री सुरु आहे. छपाईचा मुळ कार्यादेश २०,००० नगांचा होता, तथापि विक्रीचा प्रतिसाद लक्षात घेता दि.१९.०१.२०१३ अखेर १७,१७९ नग दिनदर्शिका स्विकारल्या असून, उर्वरीत थ्रीडी डेस्क दिनदर्शिकांची छपाई करुन पाठवू नये असे दूरध्वनीवरुन दि.२१.०१.२०१३ रोजी मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांना कळविलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानंतर दि.२१.१२.२०१२ रोजी छपाई कार्यादेश देण्यात आला. त्यामुळे दिनदर्शिकांची दि.२२.१२.२०१२ पासून विक्री सुरु करण्यात आली. यापूर्वी सदर दिनदर्शिकांची विक्री नोव्हेंबर महिन्यात सुरु होत होती. त्यामुळे दिनदर्शिका खरेदीस काही भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. दि.२५.०३.२०१३ अखेर सदर दिनदर्शिकांचा ५९११ नगांचा साठा शिल्लक आहे. शिल्लक साठ्याचा विचार करता सर्व दिनदर्शिकांची सवलतीचे दरात विक्री होणे गरजेचे आहे.

सबब सदर दिनदर्शिकांची सद्याची विक्री किंमत १८०/- ऐवजी रु.३०/- ने कमी करुन रु.१५०/- ठेवता येईल अथवा सभेत चर्चेअंती ठरेल त्या दराने काऊंटरवर विक्री करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या शिल्लक असलेल्या इंग्रजी श्री साईबाबा दिनदर्शिका २०१३ थ्रीडी डेस्क, ७ शिटर (आकार ९.७५" x ०७") ची किंमत कमी करणेऐवजी रु.५०००/- व त्यापेक्षा जास्त रोख अथवा वस्तु रुपाने देणगी देणाऱ्या साईभक्तांना देणगी कार्यालयाकडून विनामुल्य वाटप करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६१** **नविन टायर्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायरचा एकुण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | MH-१७-V-९९८८ | टोयोटा इनोव्हा कार्यालयीन वाहन | ३०,२८४ | २०५-६५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन (B-३९०) | ०५ |
| ०२ | MH-१७-AG-२४२० | टाटा ४०७ शववाहीका | ४८,९१९ | ७-००-१६ | अपोलो (अमर डिलक्स) | ०७ |
| ०३ | MH-१७-AG-२४१८ | टाटा विंगर रुग्णवाहीका | ६४,३१५ | १८५-R१४ | अपोलो (क्रॉम्प्टन) | ०५ |
| ०४ | MH-१७-AG-२४१९ | टाटा विंगर रुग्णवाहीका | ५३,२०१ | १८५-R१४ | अपोलो (क्रॉम्प्टन) | ०५ |
| ०५ | MH-१७-T-६८०१ | टाटा४०७ | ४५,१०३ | ०८-२५-१६ | अपोलो (अमर डिलक्स) | ०२ |
| | | | | | **एकुण टायर्स** | **२४** |

वरील प्रमाणे पाच वाहनांकरीता २४ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी कामी सध्याचे मार्केटमधील दरानुसार रु.१,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त वाहनांकरीता नवीन टायर्स ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे पाच वाहनांकरीता नवीन २४ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या पाच वाहनांकरीता नवीन २४ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६२ नविन रुग्णवाहीका (मोबाईल व्हॅन) खरेदीकामी कोटेशन बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** वैद्यकीय संचालक श्री साईबाबा रुग्णालय यांनी दि.०४/०३/२०१३ रोजीचे टिपणीनुसार, च्श्री.साईबाबा संस्थानच्या रुग्णालयामार्फत फिरता दवाखाना हा उपक्रम कार्यान्वित केलेला आहे. सदर उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला आहे परिसरातील गरीब व गरजु रुग्ण वैद्यकीय सेवेपासुन वंचित राहु नये म्हणुन फिरता दवाखाना अखंडीतपणे सुरु करणेकामी नवीन रुग्णवाहीका (मोबाईल व्हॅन) वाहनाची आवश्यकता आहे. नवीन रुग्णवाहीका खरेदी कामी मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं.५५५, दि.०९/०२/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये, मान्यता मिळालेली आहे. तरी नवीन रुग्णवाहीका वाहन विभागामार्फत खरेदी करणेबाबत योग्यती कार्यवाही करणेत यावी, असे कळविले आहे.

रुग्णवाहीके सोबत असणारे वैद्यकीय पथक यांची बैठक व्यवस्था, रुग्ण तपासणी सर्व औषध सामुग्री साहीत्य ठेवणे करीता रॅक या सर्व बाबींचा विचारकरता टाटा कंपनीचे ७०९ या मॉडेलचे वाहनाची चेसीज खरेदी करुन आपणास आवश्यक त्याप्रमाणे बॉडी बांधणी करुन घेता येईल.

नवीन चेसी खरेदी करणे व त्यावर बॉडी बांधणी करुन घेणे या कामी अंदाजे रु.१४,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चौदा लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

तरी नवीन रुग्णवाहीका (मोबाईल व्हॅन) बनविणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून टाटा-७०९ या वाहनाची एक चेसीज खरेदी कामी तसेच सदर वाहनावर बॉडी बांधणीचे कामाकरीता बॉडीबिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणाऱ्या रु.१४,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चौदा लाख मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६३ संस्थान वाहनांसाठी तसेच विद्युत जनित्रांना लागणारे इंधन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) सध्या संस्थानकडे दैनंदिन कामकाजाकरीता खालील प्रमाणे वाहने वापरात आहेत.

| अ.नं. | वाहन प्रकार | संख्या |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयीन वाहने | १० |
| ०२ | रुग्णवाहीका वाहने | ०८ |
| ०३ | मालवाहतुक वाहने | १५ |
| ०४ | बसेस वाहने | १८ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०५ | टुव्हिलर | ०२ |
| | एकुण वाहने | ५३ |

उपरोक्त प्रमाणे संस्थानकडे सद्य परिस्थीतील असलेल्या वाहनांसाठी वार्षीक सर्व साधारणपणे १,००,००० लिटर डिझेल / पेट्रोलची आवश्यकता असते.

ब) तसेच, विद्युत विभागामार्फत (०१) मंदिर परीसर, (०२) साईबाबा भक्तनिवासस्थान, (०३) रुग्णालय + साईनगर (०४) नवीन धर्मशाळा, (०५) नवीन स्टाफ क्वार्टर (०६) श्री साई प्रसादालय, (०७) साई आश्रम भाग-०१ व (०८) साई आश्रम भाग-०२ या आठ वेगवेगळया ठिकाणी विद्युत पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विज कनेक्शन जोडून घेण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास भारनियमन काळात पर्यायी विजपुरवठया साठी वरील ठिकाणी विद्युत जनित्रांची सोय करण्यात आलेली आहे. या जनित्रांसाठी चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ९०,००० ते ९२,५०० लिटर इतके इंधन खर्च झालेले आहेत.

वाहनांकरीता खरेदी करण्यात येणारे इंधन ही बाब पुर्णपणे वाहनाचे वापराचे प्रमाणावर तसेच विद्युत जनित्रांला खरेदी करावे लागणारे इंधन ही बाब भारनियमनावर अवलंबुन असल्याने इंधन खरेदी करता होणारा खर्च कमी जास्त प्रमाणात लागतो.

सध्या संस्थान वाहनांसाठी व विद्युत जनित्रांसाठी लागणारे इंधन सावळीविहीर येथील ०६ कि.मी. अंतरावरील श्री साई सर्व्हिस सेंटर या पेट्रोलपंपावरुन मासीक क्रेडीटवर खरेदी करण्यात येत आहे. श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर यांचेकडून संस्थान वाहनांकरीता इंधन पुरवठाकरतांना मार्केटदरापेक्षा डिझेलसाठी प्रति लिटर २० पैसे ऐवढी सुट देण्यात येत आहे. मात्र विद्युत जनित्रांसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या इंधनात सुट देण्यात येत नाही.

दि.०५/०२/२०१३ रोजीचे पत्राने मॅनेजर, मा. आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर यांनी घ्संस्थानचे वाहनाकरीता तसेच जनसेटसाठी आमचे संस्थेचे साकुरी, (कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता) शेजारील मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि. कंपनीचा पेट्रोल पंपावरुन पेट्रोल, डिझेल व ऑईल खरेदी केल्यास आमची संस्था आपणास इंधन खरेदी दरात २५ पैसे प्रति लिटर सुट देण्यास तयार असुन एक महिन्याचे क्रेडीटवर इंधन पुरवठा करणेस तयार आहे, असे कळविलेले आहे.

तसेच, दि.०७/०२/२०१३ रोजीचे पत्राने, प्रोप्रायटर, साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांनी आम्ही शिर्डी (साकुरी शीव) येथे श्री साईसिध्दी पेट्रोलीयम या नावाने हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन लि.चे पेट्रोल व ल्युबआईलचे अधिकृत वितरक आहोत. आपले संस्थानचे मालकीचे वाहनांना तसेच विद्युत जनियत्रांना लागनारे इंधन पुरवठा करणे कामी आम्ही इच्छुक असुन आमचा पेट्रोल पंप शिर्डी परीसरात आहे.

आम्ही आपणास इंधन पुरवठा केल्यास इंधनाचे चालु दरात ३० पैसे प्रती लिटर प्रमाणे सवलत देण्यास तयार आहोत तसेच आपल्या होणाऱ्या बिलाची रक्कम जास्तीत जास्त ३० दिवस पर्यंत विलंबाने स्विकारण्यास तयार आहोत. तरी आम्हास इंधन पुरवठा करणेबाबत आपले पत्र मिळावे ही विनंती, असे कळविलेले आहे.

मा. आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर यांचा कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता शेजारील पेट्रोल पंप तसेच श्री साईसिध्दी पेट्रोलीयम, शिर्डी हे दोन्ही पेट्रोल पंप सावळीविहीर येथील श्री साई सर्व्हिस सेंटर पेट्रोल पंपपेक्षा जवळचे अंतरावर आहेत. त्यामुळे तेथून संस्थानसाठी इंधन खरेदी करणे हितावहच ठरेल.

उपरोक्त परिस्थीती विचारता घेता संस्थानकडील वाहनांकरीता व विद्युत जनित्रांकरीता कोणत्या पेट्रोलपंपावरुन इंधन खरेदी करावे, या बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी या पेट्रोल पंप धारकाकडून संस्थानने इंधन खरेदी केल्यास मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी हे संस्थानला प्रती लिटर ३० पैसे प्रमाणे सवलत देण्यास व एक महिन्यापर्यंत क्रेडीटवर इंधनाचा पुरवठा करण्यास तयार आहेत, सदरचा पंप संस्थानचे वाहन विभागापासुन कमी अंतरावर असल्याने तसेच मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांनी प्रती लिटर ३० पैसे प्रमाणे संस्थानला सवलत दिल्याने त्यांचेकडून यापुढे संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन घेणेस मान्यता देणेत आली. मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि.,साकुरी व मे. श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर हे देखील संस्थानला प्रती लिटर ३० पैसे आणि एक महिन्यापर्यंत क्रेडीट देणेस तयार असतील तर याही पंपावरुन संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन आवश्यकतेनुसार खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच, सदर निर्णयावर कार्यवाही चालु होईपर्यंत इतर पंपधारकांकडून संस्थानचे विविध विभागांकरीता खरेदी करण्यात आलेल्या इंधनाची बीले पुर्वीप्रमाणेच आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख/ भक्तनिवासस्थान विभागप्रमुख/मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.६४** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २०१३-१४ चे सत्रासाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २०१३ चे सत्रापासून सुरू होणारे प्रशैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २०१३ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. त्रिसदस्य समितीकडून होणे आवश्यक आहे.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक-१९/०२/२०१२ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ७६ निर्णय क्रमांक २४६ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला.

१९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या खालील गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. याशिवाय क्वचीत प्रसंगी अर्जदारांचे बहुतांश शिक्षण १५ कि.मी.मधील गांवात झालेले असते, पैकी १० वी,१२ वी किंवा एखाद-दुसरे वर्ष परिसराबाहेर शिक्षण झालेले असेल त्यांचा अर्ज १५ कि.मी. साठीच्या जागांवर घेण्याचा प्रकरणपरत्वे निर्णय प्राचार्य यांनी घ्यावयाचा आहे.

शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | १९ | काकडी | ३७ | अस्तगांव | ५५ | देर्डे-चांदवड |
| २ | साकुरी | २० | डांगेवाडी | ३८ | कालेवाडी | ५६ | चांदगव्हाण |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ३९ | संवत्सर | ५७ | डाउच बु |
| ४ | पिंपळस | २२ | सोयेगांव | ४० | कोकमठाण | ५८ | हिंगणी |
| ५ | को-हाळे | २३ | वेस | ४१ | लक्ष्मणवाडी | ५९ | मुर्शतपुर |
| ६ | नांदुर्खी बु | २४ | जवळके | ४२ | कान्हेगांव | ६० | कोपरगांव |
| ७ | नांदुखी खु | २५ | बहादराबाद | ४३ | वारी | ६१ | धारणगांव |
| ८ | डो-हाळे | २६ | शहापुर | ४४ | देवगांव | ६२ | जेउर पाटोदा |
| ९ | कनकुरी | २७ | पोहेगांव खु | ४५ | पुणतांबा | ६३ | जेउर कुंभारी |
| १० | निमगांव -को-हाळे | २८ | पोहेगांव बु | ४६ | रामपुरवाडी | ६४ | शिंगणापूर |
| ११ | निघोज | २९ | चांदेकसारे | ४७ | वाकडी | ६५ | रामपूर |
| १२ | सावळीविहीर खु | ३० | घारी | ४८ | मनेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १३ | सावळीविहीर बु | ३१ | डाउच खु | ४९ | रांजणगांव -देशमुख | ६७ | आडगांव |
| १४ | सोनेवाडी | ३२ | रास्तापुर | ५० | अंजनापूर | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| १५ | पिंपळवाडी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५१ | बहादरपुर | ६९ | धनगरवाडी |
| १६ | रूई | ३४ | एकरूखे | ५२ | मढी बु | ७० | शिंगवे |
| १७ | केलवड | ३५ | गणेशनगर | ५३ | मढी खु | ७१ | सडे |
| १८ | खडकेवाके | ३६ | रांजणगांव | ५४ | देर्डे-को-हाळे | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठी जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते खालीलप्रमाणे-

अ -मागासवर्गीयासाठी राखीव जागा (तक्ता क्र. २)

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१) (जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |
| | एकूण- | ५० % |

**ब. इतर आरक्षण :-**

१) अपंग उमेदवार ३ %.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



२) महिला उमेदवार व्यवसाय निहाय ३० % .
३) तांत्रिक विषयासह शालांत परीक्षा (४५% अधिक गुणांसह) उत्तीर्ण उमेदवारांना व्यवसाय निहाय २५%.
४) संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % .५)सर्टिफाईड (बोल्स्टर) स्कुलमधील व्यक्ती १% .

**क) प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा अट शासनानी काढून टाकली आहे.**

दि.१ ऑगस्ट २०१३ पासून सुरु होणा-या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी तसेच व्यवसायनिहाय आकारले जाणारे प्रती प्रशिक्षणार्थी वार्षिक प्रशिक्षण शुल्क खालीलप्रमाणे -

(तक्ता क्र. ३)

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क | प्रवेश क्षमता नियमित | सुपर न्युमररी अतिरिक्त) जागा ३० % | एकूण | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | टूल ॲण्ड डायमेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर) | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | रु. १२,०००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. १२,०००/- | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. १२,०००/- | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| ४ | फिटर * | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ + १६* | ०५ +०५* | २१+२१* | १७ + १७* | ४ + ४* |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्षे | रु. ०८,४००/- | २४ | ०७ | ३१ | २५ | ६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्षे | रु. ०८,४००/- | ३२ | १० | ४२ | ३३ | ९ |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १० वी उत्तीर्ण | ०१ वर्षे | रु. ०८,४००/- | ४० | १२ | ५२ | ४२ | १० |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | रु. ०६,०००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| | | | | | २३२ + १६* | ७२+ ५* | ३०४+ २१* | २४५+ १७* | ५९+ ४* |

प्रशिक्षणाची सुविधा वाया जावू नये. यासाठी रकाना क्र.५ मधिल शुल्काशिवाय संपुर्ण प्रशिक्षण कालावधीसाठी प्रती प्रशिक्षणार्थी रु.५०००/- अनामत रक्कम प्रवेशाच्या वेळी घेतली जाते. प्रशिक्षणार्थ्याने मध्येच प्रशिक्षण सोडल्यास व / किंवा विनापरवानगी गैरहजेरी/गैरवर्तन/अन्य कोणत्याही कारणाने त्याचे नाव कमी केल्यास सदर अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

वरील पैकी अ.नं. १ ते १२ च्या सर्व व्यवसायांना व तुकडयांना केंद्र शासनाची कायमची मान्यता (संलग्नता) पुर्वीच मिळालेली आहे. तथापी क्र.४ वरील फिटर* व्यवसायाची अतिरीक्त ३ री तुकडी मागील वर्षी सुरु करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन साहित्य खरेदी प्रक्रीया सुरू होती. तथापी त्याबाबतचा शासन निर्णय वेळीच न झाल्याने ती प्रक्रीया मा.त्रिसदस्य समितीची सभा दि.१४/७/१२ विषय नं.३५ मधिल निर्णय क्र.४८१ नूसार स्थगित केली होती. आता शासन निर्णय झाल्याने केंद्र शासनाच्या डी.जी.ई ॲण्ड टी. विभागाची संलग्नता मिळविणेसाठी त्याची साहित्य खरेदी व शासन संलग्नता मिळविणेची कार्यवाही सुरु करता येईल.वेळेत मान्यता आली तरचं त्या तुकडीमध्ये प्रवेश देता येतील. अन्यथा मान्यता मिळाल्यानंतर पुढील सत्रात (ऑगस्ट २०१४ पासूनचे सत्रात) प्रवेश देता येईल

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मागील वर्षी शासनानी मान्यता दिल्यामुळे ३०% प्रमाणे प्रत्येक ट्रेडमध्ये जादा (सुपरन्युमररी ) जागा भरल्या आहेत.या पुढेही जादा जागांना शासनाकडून मान्यता मिळेल त्या भरता येतील. तथापी शासनाची मान्यता मिळेलच असे नाही. तसा बदल झाल्यास संबधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. शासनांनी मान्यता दिलेल्या सुपरन्युमररी जागेवर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्यात येतात. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तिकेत दिली जाते. त्या जागांना गुणानुक्रम व परीसर आरक्षण यांचे बंधन पाळता येत नसल्याने तसे बंधन असणार नाही. ही माहीतीही माहिती पूस्तकेत नमुद केली जाते.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकृतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. त्रिसदस्य समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास शक्यतो माहिती पुस्तिकेत ते बदल नमूद करण्यात येतात.

नियमित अभ्यासक्रमांबरोबरच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. (MKCL) यांचा MS-CIT हा अभ्यासक्रम चालतो. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किल (MES) या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. याशिवाय नाशिक येथिल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) यांचेकडील अभ्यासक्रमांचे अभ्यासकेंद्र म्हणून आपल्या संस्थेला मान्यता आहे. आवश्यकतेनूसार त्यांचेकडील सुधारित ऑनलाईन संगणक व इतर अभ्यासक्रम चालविता येतील. या उपक्रमांची माहितीही माहिती पुस्तिकेत देण्यात येते. संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करण्यात येतात. तसेच सुधारित शुल्काबाबत जे निर्णय होतील त्याचीही माहिती त्यामध्ये नमुद करण्यात येते. प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदलही माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी वरीलप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २०१३ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश देणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.६५ साईआश्रम भाग ०१ येथे चहा कॅन्टीन सुरु करणेकामी साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २०/३/२०१३ रोजी साईआश्रम भाग-१ येथे मा. कार्यकारी अधिकारी सो.यांनी मिटींग आयेजित केली होती. सदर मिटींग मध्ये साईआश्रम भाग-१ मधील खोल्या दि.११/०४/२०१३ पासून भक्तांना वास्तव्यास देण्याचे निश्चीत केले आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १७ (१) मधील कलमानुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतुद केलेली असल्याने साईआश्रम भाग-१ मध्ये वास्तव्यास उतरणा-या साईभक्तांसाठी चहा, कॉफी, दुध इ. सुविधा पुरविणे गरजेचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागेल.

साईआश्रम भाग-१ कॅंटीन करीता खरेदी करावयाचे साहित्य खालील प्रमाणे-

**अ) टि -जार**

| अ.नं | साहित्याचा तपशिल | मागणी | प्रति नग किंमत रुपये | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | स्टेनलेस स्टील टी-जार २५ लिटर्स क्षमता | ५० नग | २१६०/- | १,०८,०००/- |
| २ | स्टेनलेस स्टील टी-जार २० लिटर्स क्षमता | २१ नग | २०५२/- | ४३,०९२/- |
| ३ | स्टेनलेस स्टील टी-जार १५ लिटर्स क्षमता | १५ नग | १७६४/- | २६,४६०/- |
| ४ | स्टेनलेस स्टील टी-जार १० लिटर्स क्षमता | ६ नग | १४७६/- | ८,८५६/- |
| ५ | स्टेनलेस स्टील टी-जार ५ लिटर्स क्षमता | ६ नग | १२६०/- | ७,५६०/- |
| | | | **एकूण** | **१,९३,९६८/-** |

**ब) ॲल्युमिनियम स्टील वस्तू**

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | प्रति नग किंमत रुपये | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ॲल्युमिनियम पातेले १५० लि. क्षमता असलेले,ॲल्यु. झाकणीसह (एका पातेल्याचे वजा अंदाजे ३० किग्रॅ.) | ५ नग (अंदाजे वजन १५० किलो) | २२५/- प्रति किलो | ३३,७५०/- |
| २ | ॲल्युमिनीयम पातेले दांडीचे २ लि.क्षमता | ८ नग | ४५० /- | ३,६००/- |
| ३ | दुधाचे माप १ लिटर | ५ नग | ४००/- | २,०००/- |
| | | | **एकुण** | **३९,३५०/-** |

**क ) फर्निचर व लोखडी रॅक**

| **अ.नं.** | **साहित्याचा तपशिल** | **मागणी** | **अंदाजे किमत प्रति नग रुपये** | **अंदाजे किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | लोखंडी खुर्ची (तिकिट विक्री करीता) १.५X१.५X३ फुट | १५ नग | २,५००/- | ३७,५००/- |
| २ | चहा वाहतुक लोखंडी गाडी (लोट गाडी)(३X२ साइज) ८ इंच कास्टर व्हिल (पुढील बाजूचे फिरणारे २ व्हिल सह) | ०६ नग | ७,०००/- | ४२,०००/- |
| ३ | गोदरेज कॅश बॉक्स (साईज १ x १.५०) | १६ नग | १०,०००/- | १,६०,०००/- |
| ४ | लिंक कुलूपा ६ लिवर | ३० नग | २५०/- | ७,५००/- |
| | | एकूण | | **२,४७,०००/-** |

**ड) फायबर व रबरी वस्तु**

| **अ.न** | **साहित्याचा तपशिल** | **नग** | **अंदाजे किमत प्रति नग रुपये** | **अंदाजे किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | निलकमल फायबर बादल्या ०३ लि. | ७० नग | २४/- | १,६८०/- |
| २ | निलकमल फायबर कचरा कुंडया | २० नग | १,५००/- | ३०,०००/- |
| ३ | २०० फुटी रबरी पाईप कोटीग असलेले | २०० फुट | ८/- रु प्रती फुट | १,६००/- |
| ४ | वायफर साफ सफाईसाठी | २५ नग | १२०/- | ३,०००/- |
| | | **एकूण** | | **३६,२८०/-** |

**इ) गॅस शेगडी**

| **अ.न** | **साहित्याचा तपशिल** | **नग** | **अंदाजे किमत प्रति नग रुपये** | **अंदाजे किंमत** |
|---|---|---|---|---|
| १. | गॅस शेगडी (जम्बो टॉर्च बॉरसह) | ०२ | १४,०००/- | २८,०००/- |
| २. | बॉर (जम्बो टॉर्च ) | ०४ | १,५००/- | ६,०००/- |
| | | **एकूण** | | **३४,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे साईआश्रम भाग ०१ कॅन्टीनसाठी साहित्य खरेदी कामी येणारा खर्च खालील प्रमाणे-

| **अ.नं** | **साहित्याचा तपशिल** | **अंदाजे एकुण रक्कम** |
|---|---|---|
| अ | टि- जार | १,९३,९६८/- |
| ब | ॲल्युमिनियम व स्टिल वस्तु | ३९,३५०/- |
| क | फर्निचर व लोखडी रॅक | २,४७,०००/- |
| ड | फायबर व रबर वस्तू | ३६२८०/- |
| इ | गॅस शेगडी | ३४,०००/- |
| | **एकुण** | **५,४९,०३८/-** |

साईआश्रम भाग ०१ येथे चहा कॅटीन चालू करणे करीता उपरोक्त प्रमाणे साहित्य खरेदी करणे कामी अंदाजे रक्कम रु.५,५०,५९८/-(अक्षरी रुपये- पाच लाख पन्नास हजार अठ्ठयान्नव मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी साईआश्रम भाग- ०१ याठिकाणी कॅटीन चालू करण्याकामी अ ते इ वस्तू खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने खरेदी करणेचे प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, कॅन्टीन विभाग )

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.६६** **सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांचे उदी चाळणेची मजूरी रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा हयात असतांना दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना प्रसाद म्हणून व कोणत्याही आजारात/ अडचणीचे काळात उपाय म्हणून उदी देत असत. साईभक्तांना उदी उपलब्ध करुन देण्यासाठी साईबाबांनी स्वतःचे हस्ते श्रीद्वारकामाई मंदिरात धुनी निर्माण केलेली आहे. श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर साईभक्तांना श्रींचा प्रसाद म्हणून उदी देण्याची पद्धत चालू आहे.

श्रीद्वारकामाई मंदिरातील धुनीमध्ये तयार होणारी उदी ही बारीक-बारीक खडे/ कोळसा मिश्रीत असते. भक्तांना स्वच्छ केलेली खडे/कोळसा विरहीत उदी उपलब्ध व्हावी म्हणून पुर्वीपासून उदी चाळण्याचे काम करुन घेण्यात येत आहे. सन-१९९४ पूर्वी सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांच्या सासूबाई उदी चाळण्याचे काम करीत असत. सन-१९९४ पासून सदर उदी चाळण्याचे काम सौ. मिराबाई विठ्ठल भालेराव, रा.शिर्डी या करीत आहेत. वाढत्या महागाईनुसार उदी चाळणेचे दरात सामान्य प्रशासन विभागाचे मंजूरीने वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे. सदर मंजूर दराने सौ.मिराबाई वि.भालेराव यांचेकडून उदी चाळण्याचे काम मंदिर विभागामार्फत करुन घेण्यात आलेले असून मार्च-२०१२ पर्यंत मजूरीची रक्कम लेखाशाखेकडुन रोखीने/चेकने आदा करण्यात आलेली आहे.

सौ.मिराबाई वि.भालेराव या मार्च-२०१२ नंतरही उदी चाळण्याचे काम करीतच आहेत. मात्र मजूरी रक्कम आदा करण्याचा आदेश दि.२४/०१/२०१३ रोजी पारीत झाल्याने मजूरी रक्कम आदा करण्याचे राहून गेलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून जा.क्र.एसएसएस/वशी०१/४२९२/२०१३, दि.२४.०१.२०१३चा आदेश पारीत झालेला आहे. त्यामध्ये १एप्रिल,२०१२ ते ३१मार्च,२०१४ अखेर प्रति गोणी रु. ११०/- प्रमाणे दर मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार माहे-एप्रिल२०१२ ते माहे-डिसेंबर-२०१२ अखेरचे उदी चाळणेचे मजूरी बील रक्कम रुपये ७५,९००/- मान्यता घेऊन रक्कम आदा करणेसाठी लेखाशाखेत सादर करण्यात आले होते. मात्र पुर्व लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी सदर सौ.भालेराव यांची मजूरी रक्कम रु.२५,०००/- पेक्षा जास्त असल्याने सदर रक्कम आदा करणेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे गरजेचे आहे, असे सांगितले.

तरी एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ व त्यापुढील कालावधीसाठी सौ.मिराबाई वि.भालेराव यांची उदी चाळणेची मजूरी प्रति गोणी दर रु.११०/- प्रमाणे आज अखेर झालेली व त्या पुढील होणारी रक्कम आदा करणेसाठी मंजूरी मिळणेस विनंती आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग )

---

**विषय नं.६७** **घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी शहरातील साफसफाईबाबत.**

**प्रस्ताव-** दि. ०५/०३/२०१३ रोजीचे पत्रात शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे, " श्री साईबाबांच्या पद्स्पर्शाने पावन झालेले शिर्डी शहर जगप्रसिध्द झाले आहे. त्यामुळे शिर्डीला दररोज सुमारे १ लक्ष भाविक साईदर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाच्या वार्षिक सण व उत्सवाच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड वाढत असते. साईदर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर शिर्डी शहरात सार्वजनिक ठिकाणी व मंदिराचे सभोवतीच्या परिसरांमधे फिरत असतात त्यामुळे शिर्डीतील नागरिकांसाठी उभारणी केलेल्या पायाभूत सुविधावर अतिरिक्त ताण निर्माण होतो व नागरिकांच्या नाराजीस तोंड द्यावे लागत आहे.

शिर्डी नगर पंचायत ही 'क' वर्ग नगरपंचायत असून शहरांची लोकसंख्या सुमारे ३६,००० एवढी आहे. नगरपंचायतीचे स्वतःचे उत्पन्न रहीवाशी नागरीकांकडून वसूल घेणाऱ्या घरपट्टी, पाणीपट्टी व दुकानभाडे व विविध फी व्दारे जमा होत असून सदर उत्पन्न वार्षिक सरासरी २.५ कोटी एवढेच आहे.

त्यासाठी शिर्डी नगरपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी विल्हेवाट पार पाडणे ही शिर्डी नगर पंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या दोन्हीच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे आहे. तरी शिर्डी नगरपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत खालीलप्रमाणे कामे पार पाडणेसाठी नगरपंचायतीस आर्थिक सहकार्य मिळावे हि विनंती.

शिर्डी नगरपंचायत यांनी,

**अ)** कामाचे स्वरुप व व्याप्ती (दैनंदिन) यात अ. क्र. १ ते १५ मधे कामाचे स्वरुप दर्शविले असून त्यात प्रामुख्याने घराघरातून घंटागाडीव्दारे ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे, गोळा करुन डेपोपर्यंत वाहून नेणे तसेच गावठाणात ज्या ठिकाणी घंटा गाडी जाणार नाही तेथे हातगाडीव्दारे कचरा गोळा करुन वाहून नेणे. सर्व रस्त्यावरील घनकचरा,माती साफसफाई करून डेपोपर्यंत वाहून नेणे. शिर्डी शहरातील सर्व रस्त्ये व वाडया वस्त्यांवर घंटा गाडीव्दारे सिटी गार्बेज प्रणाली राबविणे, सार्वजनिक स्वच्छता गृहाची जंतुनाशक फवारणी करणे, वेळप्रसंगी बेवारस प्रेत,मृत जनावरे उचलणे व विल्हेवाट लावणे, लक्ष्मीनगर नाला साफसफाई करणे, दैनंदिन औषध फवारणी करणे, पावडर टाकणे, केबल व्दारे स्वच्छता संबंधी जनजागृती करणे, गरजनुसार पोस्टर्स, बॅनर लावून आरोग्य विषयक ज्ञानासाठी प्रसार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करणे. शालेय स्पर्धा,पथनाटय, विविध स्पर्धाव्दारे जनजागृती करणे, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविणे,अपतकालीन परिस्थीती उद्‌भवल्यास सहाय्य करणे, नगरपंचायतीने वेळोवेळी दिलेले निर्देशाप्रमाणे कामे करणे. असे दर्शविले असून,

अ.नं. १६ मध्ये खालील प्रमुख ठिकाणचा घनकचरा व नियमानुसार साफसफाईची कामे करावी लागेल. असे नमुद केले आहे.

१. दररोज दोन वेळा सफाई करावयाचे रस्ता व जागा
२. दररोज एक वेळा सफाई करावयाचे रस्ता व जागा
३. आठवड्यातून तिन वेळा सफाई करावयाचे रस्ता व जागा
४. आठवड्यातून एक वेळा सफाई करावयाचे रस्ता व जागा
५. पंधरा दिवसातून एक वेळा सफाई करावयाचे रस्ता व जागा
६. आवश्यकतेनूसार/गरजेनूसार सफाई करणे (१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, रमजान ईद, श्री साईबाबाचे उत्सव)
७. शौचालये/मुतारी दिवसातून दोन वेळा साफसफाई करणे.
८. मृत जनावरे/बेवारस मृतदेह, मृत कुत्रे उचलणे.
९. सार्वजनिक रस्त्यावरील वेस्ट साहित्य उचलणे.
१०. नाला सफाई करणे.
११. संपूर्ण शहरात औषध फवारणी करणे.
१२. संपुर्ण शहरात फॉगींग मशीनव्दारे धुराची फवारणी करणे.
१३. नगरपंचायत आदेशान्वये कुत्रे व मोकाट जनावरे पकडणे.
१४.घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा वाहतूक करणे.
१५. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सार्वजनिक गटारी साफसफाई करणे (अंदाजे लांबी ६२ कि.मी.)

यात घनकचराव्यवस्थापन अंतर्गत वरील कामे करणेसाठी एकुण १७ वाहने व १२० कर्मचारी लागतील. तरी शिर्डी शहराची सार्वजनिक साफसफाई कामे पारपाडणेसाठी संस्थानने निवीदा प्रक्रिया पार पार पाडणेत यावी, दरपत्रक मंजुर करणेत यावे आणि मंजुर ठेकेदारास साफसफाईचे काम देण्यात यावे. सदरच्या ठेकेदाराकडून साफसफाईचे काम नियमितपणे पार पाडणे, पर्यवेक्षण करणे, कामाचे मोजमाप घेणे व बिल तयार करण्याचे काम पार पाडणेस शिर्डी नगरपंचायात तयार आहे. त्यानंतर मंजूर केलेले बिल आपले कार्यालयामार्फत अदा करण्यात यावे.ही विनंती." अशा प्रकारची मागणी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी केलेली आहे.

याकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने संस्थानमार्फत दिनांक १ एप्रिल २००६ पासून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व मनोजकुमार पथ या ठिकाणांची साफसफाई करणेसाठी दररोज दोन शिफ्टमध्ये ४० कर्मचारी देण्यात येत आहेत. त्यांचा वेतनावरील मासिक खर्च अंदाजे रुपये ३,३१,१०५/- आहे. त्यासाठी वार्षिक खर्च रु. ३९,७३,२६०/- (अक्षरी रुपये एकोणचाळीस लाख त्र्याहत्तर हजार दोनशे साठ) मात्र संस्थानकडून आदा केले जातात.

संदर्भित पत्रात नमुद केलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायत यांनी यापुर्वीही शिर्डी शहर संपुर्ण साफसफाई बाबत मागणी केलेली आहे त्यावर खालील प्रमाणे व्यवस्थापन समितीचे निर्णय झालेले आहेत.

**अ)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०८.२०११ आयत्या वेळेचा विषय नं. १२ निर्णय क्र. ६७ (०८) झालेला निर्णय- या सभेत शिर्डी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. अलका बाळू शेजवळ, उप नगराध्यक्ष श्री. विजय तुळशीराम कोते तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री. रविंद्र गावित यांनी सभेपुढे समक्ष सांगितले की, संस्थान मार्फत शिर्डी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर (नाके) अनुदान देण्यात येते. त्याऐवजी सदरचे अनुदान नगरपंचायतीस न देता शिर्डी शहरातील स्वच्छता संस्थान मार्फत करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील मुख्य गावठाणातील संपूर्ण स्वच्छता करणे, कचरा उचलणे, डेपोपर्यंत वाहतूक करणे या पध्दतीने स्वच्छतेबाबतची अनुषंगिक सर्व कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी ठेकेदार नेमणेत यावा त्यासाठी निविदा तयार करणे, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्याचे काम शिर्डी नगरपंचायतीने करावे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या निविदा संस्थान व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून, निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा. निवड करण्यात आलेल्या ठेकेदारास कार्यादेश शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी द्यावा. या कामावर शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी पुर्णपणे पर्यवेक्षण व नियंत्रण करावे. मात्र शिर्डी मुख्य गावठाणाव्यतिरिक्त वाड्या व वस्त्यांवरील स्वच्छतेची कामे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी करावीत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



सदरची कार्यवाही सुरु होईल त्या तारखेपासून संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दिला जाणारा विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर (नाके) हे अनुदान बंद करण्यात यावे असे ठरले.

असे ठरले असताना शिर्डी नगर पंचायत यांनी दि. १४/०११/२०११ रोजीचे पत्राने शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी बी.व्ही. जी. इ. लि. या कंपनीची दि.४/१०/२०११ रोजी प्रतीमाह रु. १६,७७,११८/- (अक्षरी रुपये सोळा लाख सत्त्याहत्तर हजार एकशे आठरा मात्र) इतक्या रकमेची निवीदा मंजुर केली व वर्क ऑर्डर देणेकामी संस्थानकडे अनुदान मंजुरीबाबत मागणी केली.

त्यास अनुसरुन इकडील दि.१७/१/२०१२ रोजीचे टिपणीने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे पुढे ठेवणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी ठेवणेत आला होता. त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी यांनी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी शहर संपुर्ण साफसफाई साठी फेरकोटेशन मागविणे बाबत समक्ष सांगितले आहे.

**ब)** शिर्डी ग्रामस्थांनी दि.१९/०७/२०१२ रोजीचे पत्रान्वये "शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेसाठी श्री साईबाबा संस्थान यांचेकडुन कर्मचारी मिळणेस व शिर्डी शहरामधील विविध रस्ते, मोकळ्या जागा व मंदिरासभोवतीच्या परीसराची साफसफाई करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीला दररोज किमान १५० सफाई कामगारांची गरज आहे. आज रोजी शिर्डी नगरपंचायतीमार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडुन दररोज फक्त ७० सफाई कर्मचारी नेमण्यात येत आहे. त्यासाठी दरमहा रुपये ८.१५ लक्ष इतका खर्च येत आहे. नगरपंचायतीस इतका खर्च परवडत नाही. तसेच दैनंदिन सफाईचे काम सुध्दा समाधानकारकपणे पार पडत नाही. तरी श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीला सफाई कामांसाठी दररोज १५० सफाई कर्मचारी दोन शिफ्टमध्ये मिळणेस विनंती आहे." अशा प्रकारची मागणी मा.उपनगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक व शिर्डी ग्रामस्थ यांनी केली होती.

त्यासअनुसरुन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०८.२०१२ विषय नं. १२ निर्णय क्र. ६९७ सदरहु विषय स्थगित ठेवणेत यावा असे ठरले.

**क)** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि. ०६/०२/२०१३ चे पत्राने दरमहा रु. २५ लाख अनुदानाची मागणी केलेली आहे.सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीपुढे ठेवणेत आलेला आहे.

नगरपंचायतीचे दि. ०५/०३/२०१३ चे विनंती पत्रानुसार उपरोक्त कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना कंत्राटी कुशल २३+अकुशल ९७ = १२० कर्मचाऱ्यांचे वेतनावर खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

९७ कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| अ.क्र. | तपशील | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २१५=९६ |
| २ | प्रॉ.फंड १३.६१% | २९=३९ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.७५% | ०=२१ |
| | एकुण | २४५=५६ |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १०.३०% | २५=२९ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | २७०=८५ |
| ६ | प्रति दिन ९७ कर्मचारी रु. | २६२७२=४५ |
| ७ | प्रति दिन ९७ कर्मचारी ३६५ दिवसांकरीता | ९५८९४४४=२५ |
| ८ | +१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | ९५८९४४=४२ |
| | एकुण रुपये - | १०५४८३८८=६७ |
| | २३ कंत्राटी कुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः- | |
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २४६=७३ |
| २ | प्रॉ.फंड १३.६१% | ३३=५७ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.७५% | १=८५ |
| | एकुण | २८२=१५ |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १०.३०% | २९=०६ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | ३११=२१ |
| ६ | प्रति दिन २३ कर्मचारी रु. | ७१५७=८३ |
| ७ | प्रति दिन २३ कर्मचारी ३६५ दिवसांकरीता | २६१२६०७=९५ |
| ८ | +१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | २६१२६०=७९ |
| | एकुण रुपये - | २८७३८६८=७४ |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना उपरोक्त कामी ९७ अकुशल व २३ कुशल असे एकूण १२० कंत्राटी कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या कर्मचा-यांचे वेतना पोटी एक

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रुपये १०५४८३८८.६७ + २८७३८६८.७४ = १,३४,२२,२५७/- (अक्षरी रुपये एक कोटी चौतिस लाख बावीस हजार दोनशे सत्तावन्न ) मात्र पर्यंत खर्च येईल.

तरी शिर्डी शहराची सार्वजनिक साफसफाई कामे पारपाडणेसाठी संस्थानने निवीदा प्रक्रिया पार पाडणेत यावी, दरपत्रक मंजुर करणेत यावे आणि मंजुर ठेकेदारास साफसफाईचे काम देण्यात यावे. सदरच्या ठेकेदाराकडून साफसफाईचे काम नियमितपणे पार पाडणे, पर्यवेक्षण करणे, कामाचे मोजमाप घेणे व बिल तयार करण्याचे काम पार पाडणेस शिर्डी नगरपंचायात तयार आहे. त्यानंतर मंजूर केलेले बिल आपले कार्यालयामार्फत अदा करण्यात यावे.ही विनंती." अशा प्रकारची मागणी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी केलेली आहे.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४१०** **सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांना योग्यवेळी सभेसमोर समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.६८** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर (नाके) अनुदान मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **१)** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी संस्थानकडे यापुर्वी वेळोवेळी विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर(नाके) पोटी वार्षिक रु. दोन कोटी इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. तसेच माहे एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर ( नाके) रु.५०,००,०००/- मात्रची रक्कम मिळणेस दि.१३/०२/२०१३ रोजीचे पत्राने विनंती केली आहे.

शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना त्यांनी साईभक्तांकडून कराची आकारणी करु नये यासाठी संस्थानकडून स्वच्छता कर/विशेष आरोग्य कर अदा केला जातो. अदा केलेले विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर (नाके ) ची माहिती सोबतचे तक्त्यात सादर केली आहे.

**२)** महाराष्ट्र शासना कडील पत्र क्रमांक बैठक क्रंमाक -२०१०/(प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ०७/०४/२०१० या पत्राने व त्यासोबतचे मिटींग वृत्तांतानुसार तत्कालीन मा.मंत्री (विधी व न्याय) यांचे अध्यक्षतेखाली संस्थानचे विविध प्रश्नांबाबत विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी संपन्न झाली असून सभेतील विषय नं.१३ अन्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना स्वच्छता व आरोग्य पथकर ( नाकेबाबत ) प्रतिवर्षी अनुदान रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख ) ऐवजी प्रतिवर्षी रुपये- ५०,००,०००/- ( अक्षरी रुपये- पन्नास लाख ) अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे. रक्कम अदाई करणेबाबत अशा प्रकारे शासन मान्यता मिळालेली आहे. (महाराष्ट्र शासनाने दि.०७/०४/२०१० रोजीचे पत्रासोबत दि.२७/०१/२०१० रोजीचे बैठकीतील इतिवृत्ता मधील विषय क्र. १३ वरील निर्णय / आदेश माहितीसाठी पाठवलेला आहे. व सोबत अवलोकनार्थ सादर आहे. मात्र प्रकरणी रक्कम अदाईबाबत शासनाने स्वतंत्र आदेश काढलेला नाही, असे दिसुन येते. )

**३)** दि.२४/०९/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. ०१ व निर्णय क्र. ६७४ झाला आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सन २०११-२०१२ अखेर रु.५०,००,०००/- मात्र विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर(नाके) पोटी अदा करण्यात आलेले आहेत. माहे आक्टोबर २०११ ते माहे मार्च २०१२ अखेरची पोहोच पावती शिर्डी न.पं.शिर्डी कडून प्राप्त आहे.

दि.२७/०१/२०१० चे शासन निर्णया पूर्वी व शासन निर्णयानंतर व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना वेळोवेळी माहे नोव्हेंबर २००५ ते माहे मार्च २०१२ अखेर रु.३,०२,५६,६६२/- (अक्षरी रु.तीन कोटी दोन लाख छपन्न हजार सहाशे बासष्ट मात्र ) ची रक्कम नगरपंचायतीला अदा केली आहे. ( तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जा. क्र.एसएसएस/वशी-विधी/५१००/२०१२, दि.११/१/२०१२ चे पत्राने सन २०११-२०१२ चे माहे मार्च २०१२ अखेर रु.५०,००,०००/- (अक्षरी रु.पन्नास लाख मात्र) अदा करणेत येत असलेबाबत कळविले आहे.)

**४)** आता दि.२३/०१/२०१३ रोजी महाराष्ट्र शासन यांचे क्र.सासंवि-२०११/५३८/प्र.क्र.६९/पुर्नबांधणी-१२/का.सोळा चे पत्र प्राप्त झाले असून त्यात (०१) मध्ये श्री साईबाबा संस्थानमार्फत राबविण्यात येणा-या पायाभूत व धोरणात्मक प्रकल्पांस व त्यावरील खर्चास शासनाची पूर्व मान्यता घेतल्याशिवाय कामे सुरु करण्यात येऊ नये. असे म्हटले आहे. तसेच भविष्यात शासनाची मान्यता न घेता खर्च करुन कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव सादर केल्यास त्यास शासनाची मान्यता देणे शक्य होणार नाही, असे कळविले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्राने शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी माहे १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ अखेर विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर ( नाके) रु.५०,००,०००/- मात्रची रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना माहे एप्रिल २०१२ ते माहे मार्च २०१३ अखेर विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर ( नाके) रु.५०,००,०००/- मात्रची रक्कम अदा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करणेसाठी तसेच सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठवून शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील मान्यता घेऊन सदरची रक्कम अदा करणेसाठीचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४११ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६९ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना वापरास दिलेल्या नवीन भक्तनिवास इमारतीतील गाळा क्र.१८ चे मासिक परवाना फी बाबत.**

**प्रस्ताव-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी यांनी दि.१६/०२/२०१३ पत्राने विनंती केली आहे की, साई दर्शनास आलेल्या लाखो शेतकऱ्यांना शेतीच्या दृष्टीने आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या उद्देशाने संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान इमारत (५०० रुम) येथे सन २००१ मध्ये कृषि माहिती केंद्र सुरु करण्यात आले होते. प्रस्तुत गाळ्यास सन २००१ ते सन २००६ पर्यंत फक्त १००/- या प्रमाणे मासिक परवाना फी आकारण्यात आले होते. त्यानंतर मा.व्यवस्थापन मंडळाने वारंवार भाडेवाढ केली आहे. सन २०१२ पर्यंत मासिक परवाना फी रु. ८११/- प्रमाणे आकारण्यात आली आहे. परंतू या केंद्राची मुदत दि. ०५/०४/२०१२ रोजी संपुष्टात आल्यानंतर पुढील मुदतीसाठी ( दि. ०६/०४/२०१२ ते दि. ०५/०३/२०१३ ) या ११ माहिन्यासाठी १०% भाडेवाढ करुन रु. ८९२/- अपेक्षित होती. परंतू दि. १४/०७/२०१२ रोजीचे व्यवस्थापन समितीने मासिक भाडे रु. ६,६५५/- व डिपॉझीट रक्कम रु. १,००,०००/- आकारुन मुदतवाढ दिलेली आहे.

सदर गाळा शेतकऱ्यांच्या सेवार्थ व सामाजीक जाणीवेने असल्याने भाडे आकारणी ही व्यवसायीक पध्दतीने आकारण्यात आलेली नव्हती. परंतू सदर मोठ्या प्रमाणात भाडेवाढ, एक लाख डिपॉझीट व भक्तनिवासमध्ये गाळा शेवटी असल्याने शेतकऱ्यांचा भेटी देण्याचे कमी प्रमाण याबाबींचा विचार करुन विद्यापिठास नाईलाजास्तव मा.कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी यांच्या परवानगीने दि. १६/०१/२०१३ रोजीचे पत्राने गाळा संस्थानकडे जमा करुन कृषि माहिती केंद्र सावळीविहीर येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. वरिल सर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन सदर केंद्र शेतकऱ्यांच्या सेवार्थ असलेच्या सामाजीक जाणीवेने तसेच कृषि विद्यापिठ हे सरकारी संस्था असल्याने विशेष सवलत म्हणून सदर भाडेवाढ ही मागील वर्षीच्या १०% भाडेवाढ करुन आकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी यांनी दि. २२/०१/२०१३ चे पत्राने गाळ्याची चावी संस्थान जमा केलेबाबत कळविलेले आहे. तसेच नविन भक्तनिवासस्थान विभागाने दि. १३/०३/२०१३ रोजी गाळा संस्थानचे ताब्यात असलेबाबत सांगीतले आहे.

प्रकरणी जा.क्र. एसएसएस वशी विधी /४९३३/२०१३ दि. २८/०१/२०१३ रोजीचे पत्राने मा.संचालक विस्तार शिक्षण महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी यांना माहे एप्रिल २०१२ ते जानेवारी २०१३ ( गाळ्याची चावी संस्थान जमा केलेल्या तारखे पर्यंत ) अखेर गाळ्याची मासिक परवाना फी रक्कम रु.६३,३३०/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार संस्थानचे लेखाशाखा विभागात जमा करणेबाबत कळविले होते. त्यावर महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी यांनी दि.१६/०२/२०१३ चे पत्राने विशेष सवलत म्हणून दि. ०६/०४/२०१२ ते दि. २२/०१/२०१३ अखेरची मासिक परवाना फी मागील वर्षीच्या सन २०११ -२०१२ च्या रु. ८११/- च्या १०% भाडेवाढ करुन म्हणजे रु. ८९२/- प्रमाणे मासिक परवाना फी आकारण्यात यावी अशी विनंती केली आहे. त्याप्रमाणे त्यांना सवलत दिलेस कार्यादेशाप्रमाणे त्यांचेकडील बाकी रक्कम रु.६३,३३०/- ऐवजी रक्कम रु. ८,४८९/- रुपये संस्थानला प्राप्त होतील.

तरी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांचेकडून नविन भक्तनिवास इमारतीतील गाळा नं. १८ ची मासिक परवाना फी रु. ६,६५५/- आकारावी किंवा रु. ८९२/- प्रमाणे याबाबतचे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.४१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना वापरास दिलेला नवीन भक्तनिवास इमारतीतील गाळा क्र.१८ त्यांनी खाली करुन दिलेला आहे व त्यांचेकडून संस्थानला काही वेळा सेवा घ्याव्या लागतात याचा विचार करुन महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना विशेष सवलत म्हणून दि. ०६/०४/२०१२ ते दि. २२/०१/२०१३ अखेरची मासिक परवाना फी मागील वर्षीच्या सन २०११ -२०१२ च्या रु. ८११/- च्या १०% भाडेवाढ करुन म्हणजे रु. ८९२/- मात्र प्रमाणे मासिक परवाना फी आकारणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.७० साई आश्रम नं.०१ व ०२ इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांचे आगमन- निर्गमन वेळेकरीता फिंगर प्रिंट अटेंडन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशिन खरेदी व इन्स्टॉलेशन करणेस मान्यता मिळणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** संस्थान कर्मचाऱ्यांचे कामावर आगमन/निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी फिंगर प्रिंन्ट अटेंडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स खरेदी करणे व इंन्स्टॉलेशन करणेकामी नामांकीत कंपन्यांकडून एकूण २८ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. निविदा सादर केलेल्या २८ पैकी ०५ अंतिम दर देवू केलेल्या निविदा धारकांशी चर्चा होऊन, मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांचे फिंगर प्रिंन्ट अटेंडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स ही अद्ययावत असून, त्यामध्ये फ्लॉपी लोड करणेची सुविधा व इतर अनेक सुविधा असलेमुळे बायोमेट्रीक डिव्हाइस क्षमता, सॉफ्टवेअर इत्यादीबाबी विचारात घेता, त्यांचे दर थोडया प्रमाणात जास्त असले तरी ते स्वीकारण्यात येऊन, त्यांना संस्थानसाठी आवश्यक व मागणी केल्याप्रमाणे ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेंडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स, संगणक, केबलींग, इंन्स्टॉलेशन चार्जेस इत्यादि संपूर्ण खर्चासह पुरविणेकामी रूपये ९,५१,०००/- मात्रचा पुरवठा आदेश देणेत यावा असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.२२३ अन्वये संमत झाला होता.

त्यास अनुसरून मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना संस्थान कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणे कामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५८५४/२००६ दि.०२-०५-२००६ अन्वये पुरवठा आदेश देणेत आला होता. त्याप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांनी माहे मे-जुन-२००६ मध्ये संस्थान कर्मचा-यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् ०१) प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), ०२) चौकशी व निवासस्थान कार्यालय, ०३) श्री साईबाबा हॉस्पीटल, ०४) श्री साईनाथ हॉस्पीटल, ०५) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, ०६) आय.टी.आय., ०७) मुंबई कार्यालय या ठिकाणी इन्स्टॉल करुन दिलेली आहेत.

त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०७-२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (२५) यास अनुसरून मंदिर व संरक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी ०१ व नविन प्रसादालयातील कर्मचाऱ्यांसाठी ०१ असे आवश्यक असलेल्या एकूण ०२ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि. ,मुंबई यांचेकडून खरेदी करून, बसविणेत आलेले आहेत. त्याकामी एकूण रूपये २,५८,०००/-(अक्षरी रूपये दोन लाख अठ्ठावन्न हजार) मात्र खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच दक्षिणा पेटी मोजणी हॉलकरीता-०१ बायोमेट्रीक फिंगर प्रिन्ट अटेंन्डट मशिन माहे एप्रिल-२०१० मध्ये खरेदी करून बसविणेत आलेले आहे. त्याकामी रूपये १,३०,५००/- इतक खर्च आलेला आहे. अशाप्रकारे एकूण-१० ठिकाणी बसविणेत आलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्सद्वारे संस्थान कर्मचाऱ्यांच्या आगमन-निर्गमन वेळेची नोंद केली जात आहे.

आता संस्थानचे साई आश्रम-०१ व साई आश्रम-०२ अशा ०२ इमारती लवकरच कार्यान्वीत होणार आहेत. त्यासाठी साई आश्रम-०१ व ०२ इमारतीमध्ये डयुटीवर येणाऱ्या कर्मचाऱ्यांची येण्याची व जाण्याची वेळ नोंद होणेसाठी ०२ स्वतंत्र फिंगर प्रिंन्ट अटेन्डन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन बसविणेची आवश्यकता आहे. तरी ०२ फिंगर प्रिन्ट अटेन्डन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन, संगणक,

केबलींग, सॉफ्टवेअर इत्यादि संपूर्ण खर्चासह बसवुन देणेसाठी यापूर्वी पुरविणेत आलेल्या १० इलेक्ट्रॉनिक फिंगर प्रिंन्ट अटेन्डट मशिनच्या किंमतीप्रमाणेच मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडे विचारणा करणेत आली, त्यांनी यापूर्वी पुरविणेत आलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेंडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीनचे किंमतीत म्हणजे एकूण रक्कम रूपये २, ५३, ७०९/- (Total Project Cost) मध्ये संस्थानचे साई आश्रम ०१ व साई आश्रम ०२ करीता आवश्यक असलेले प्रत्येकी ०१ प्रमाणे एकुण-०२ नग फिंगर प्रिंन्ट अटेन्डन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन पुरविणे व इंन्स्टॉलेशन करून देण्याचे मान्य केले आहे व तसे कोटेशन मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी दि.२२-०३-२०१३ रोजीचे पत्रान्वये संस्थानला सादर केलेले आहे.

तरी मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांचेकडुन साई आश्रम-०१ व ०२ मध्ये कर्मचाऱ्यांचे आगमन निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी आवश्यक असलेले दोन नग (बायोमेट्रीक) फिंगर प्रिन्ट अटेन्डन्स सिस्टीम बायोमेट्रीक मशिन्स व मशिन, संगणक, केबलींग सॉफ्टवेअर इंन्स्टॉलेशन चार्जेस इत्यादि संपूर्ण खर्चासह रूपये २, ५३, ७०९/- (अक्षरी रूपये दोन लाख त्रेपन्न हजार सातशे नऊ) मात्र या (Total Project Cost मध्ये) खरेदी करून इन्स्टॉलेशन करून घेणेस, तसेच त्याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रूपये २,५३,७०९/- (अक्षरी रूपये दोन लाख त्रेपन्न हजार सातशे नऊ) मात्रचे खर्चास मान्यता असावी

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती...

**निर्णय क्र.४१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम नं.०१ व ०२ इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांचेकडून दोन नग फिंगर प्रिंट**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**अटेंडन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशिन खरेदी व इन्स्टॉलेशन करणेस तसेच याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२,५३,७०९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक १८.०२.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४१४** **दिनांक १८.०२.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्युनिअर के.जी. उर्वरित प्रवेश प्रक्रियाबाबत.**

**प्रस्ताव-** शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्युनिअर केजी साठी विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया- अतंर्गत दि. ११/०२/२०१३ ते दि. २०/०२/२०१३ अखेर खालीलप्रमाणे प्रवेश अर्ज वाटपाबाबत प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

| अ.न. | तपशिल | प्रवेश अर्ज वाटप एकूण संख्या | प्रवेश अर्ज जमा एकूण संख्या | प्रवेश अर्ज येणे बाकी एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कायम कर्मचारी | ७३ | ७१ | ०२ |
| २ | कंत्राटी कर्मचारी | ९० | ८६ | ०४ |
| ३ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील | ८० | ७७ | ०३ |
| | एकूण | **२४३** | **२३४** | **०९** |

| तपशिल | कायम कर्मचारी | कंत्राटी कर्मचारी | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील | जमा फार्म एकूण |
|---|---|---|---|---|
| एकुण जमा प्रवेश अर्ज | ७१ | ८६ | ७७ | २३४ |
| एकूण दिलेले प्रवेश | ७० | ५० | ०० | १२० |
| एकूण प्रवेश देणे बाकी | ०१ | ३६ | ७७ | ११४ |

१) उपरोक्त संदर्भीय दि.०७.०२.२०१३ रोजीचे सभेत ज्यु. के.जी. प्रवेश प्रक्रियेबाबत फक्त १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देवून ३ तुकडया करण्यात याव्यात असा विषय नं. ३८ ने प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास निर्णय क्र. ९८ अन्वये मान्यता मिळालेली आहे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

२) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये वर्ग खोल्या अपुऱ्या पडत असल्याने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून शालेय कामकाज सकाळ व दुपार असे दोन सत्रात करण्यात यावे असा विषय नं. ४० ने प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास निर्णय क्रमांक १०० अन्वये मान्यता मिळालेली आहे व त्याप्रमाणे शालेय कामकाज दोन सत्रात करण्यात येत आहे.

परंतू ज्यु. के.जी प्रवेशासाठी आणखी ११४ पालकांनी प्रवेश मिळणेबाबत मागणी केलेली असून प्रवेशाबाबतचे अर्ज इकडील कार्यालयाकडे जमा केलेले आहेत. शालेय कामकाज दोन सत्रात सुरु होत असल्याने वर्ग खोल्यांचे नियोजन करुन उर्वरीत ११४ विद्यार्थ्यांना ज्यू. के.जी वर्गासाठी प्रवेश देता येईल व एका तुकडीत ४० विद्यार्थी प्रमाणे आणखी एकूण ३ तुकडया तयार करता येतील.

यापुर्वी सन २००९-१० पासून प्रत्येक वर्षी ज्यु. के.जी. वर्गाचे ६ तुकडया करण्यात आलेल्या होत्या परंतू यावर्षापासून वर्ग खोल्या कमी पडत असल्याने ३ तुकडयांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र शाळा सकाळ व दुपार दोन सत्रात भरविण्यात येत असल्याने तूर्तास वर्गखोल्यांची अडचण भासणार नाही. तरी आणखी ३ वर्ग तुकडी वाढविणेस व उर्वरीत ११४ विद्यार्थ्यांना प्रवेश देणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तथापि ज्युनियर व सिनियर केजी वर्ग सकाळचे एका सत्रात भरविण्यात येत असल्याने एकूण १२ वर्ग होत आहेत व १२ वर्गासाठी १२ शिक्षक आवश्यक आहेत. आजमितीस आपणाकडे २ कायम व ५ कंत्राटी शिक्षक असे एकूण ७ शिक्षक असून आणखी ०५ कंत्राटी शिक्षकांची नेमणूक करावी लागेल असे नम्र मत आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्यु. के.जीच्या प्रत्येकी ४० विद्यार्थी प्रमाणे आणखी ३ तुकडया वाढविणेस व ११४ विद्यार्थीना प्रवेश देणेस मान्यता मिळावी. तसेच केजी वर्गासाठी आणखी आवश्यक लागणारे ०५ कंत्राटी शिक्षक नेमणेस मान्यता मिळणेकामी विचारार्थ सादर,

**निर्णय क्र.४१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**तसेच, याकामी ३ शिक्षक, ३ बस चालक व ०६ मदतनीस ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावे व ठराव कायम होणेची वाट न बघता सदर निर्णयावर तातडीने कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीअम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थानचे आयकर पत्र विवरण भरणेकामी तज्ञ कर कल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी करविषयक कामकाजासाठी कर सल्लागार म्हणुन गणपुले केळकर ॲन्ड असोसिएटस, मुंबई. यांची सेवा घेण्यात येत होती. दि.१३.०२.२०११ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.०५ निर्णय क्र.७८ नुसार पुर्वीप्रमाणे यापुढेही योग्य त्या मानधनावर गणपुले केळकर ॲन्ड असोसिएटस, मुंबई. यांची सेवा घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

गणपुले केळकर असोसिएटस मुंबई हे सन २००४-२००५ ते सन २०११-१२ यांनी सलग ०७ वर्ष आयकर विवरण पत्र तयार करणे आयकर कायद्यातील तरतूदी नुसार मागील वर्षातील अखर्चीत उत्पन्न कशा प्रकारे खर्च करण्यात आले ते दर्शविणे व इतर तरतुदींचा अभ्यास करून त्यानुसार विवरण पत्र तयार करुन संस्थानचे वार्षिक आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

श्री. राहुल केळकर यांचा दि. ०३.०४.२०१३ रोजीचा इ-मेल नुसार श्री राहुल केळकर यांनी संस्थानला पाठविलेल्या इ-मेल मध्ये सुचित केले आहे. की गणपुले केळकर असोसिएटस चे सनदी लेखापाल श्री एस.एस.गणपुले हे प्रकृति अस्वस्थ्यामुळे यापुढे सेवा देवु शकत नसल्यामुळे त्यांनी आपला व्यवसाय बंद केलेला आहे. तसेच गणपुले केळकर असोसिएटस हि फर्म विसर्जित करुन त्यांचेकडील सर्व कामे त्यांचे सहकारी श्री. राहुल केळकर यांचेकडे हस्तंतरीत केलेले आहेत.

सबब गणपुले केळकर असोसिएटस हि फर्म विसर्जित झालेली असल्यामुळे गणपुले केळकर ॲन्ड असोसिएटस, मुंबई. यांचे ऐवजी श्री.राहुल केळकर ॲन्ड असोसिएटसचे सनदी लेखापाल श्री. राहुल केळकर मुंबई. यांची योग्य त्या फी / मानधनावर पुर्वीप्रमाणे सेवा घेणेबाबत मान्यता मिळणेसाठी मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **देणगी आलेल्या गव्हाच्या भुस्याबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०१.०४.२०१३ रोजी मे.बॉम्बीनो ॲग्रो.इंड.लि., गुडगांव हरियाना यांनी गहु भुसा (४५ गोणी x ४९ किलो) एकुण २२०५ किलो भांडारमध्ये ट्रान्सपोर्टद्वारे देणगी दाखल दिलेला आहे. सदर देणगी मालाची भांडार विभाग आवक रजि.पान नंबर १/४० वर नोंद घेतलेली आहे.

सदर देणगी स्वरुपात जमा असलेल्या गहु भुस्सा विक्री करणेबाबत भांडार विभागामार्फत दि.०५.०४.२०१३ रोजी टिपणी सादर केली असता, त्यावर " देणगी गव्हाचा भूसा विक्री न करता मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेमार्फत चालु असलेल्या छावण्यांमध्ये दयावा " असे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार दि.२२.०४.२०१३ रोजी श्री.देवगुणे साहेब, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेशी देणगी गव्हाच्या भुश्याबाबत दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता, त्यांनी " सदर भुशाची वाहतुक लांब असल्यामुळे आम्हाला ते परवडणार नाही " असे सांगितले.

तथापि श्री साईशाम गोशाळा, शिर्डी यांनी गोशाळेसाठी गव्हाचा चुरा मिळणेबाबत दि.१६.०४.२०१३ रोजीचे पत्राने विनंती केलेली आहे. सदर पत्रांमध्ये " गव्हाचा चुरा भेट स्वरुपात मिळावा अगर आपणास शक्य नसेल तर त्याचा योग्य मोबदला देणेस आम्ही तयार आहोत " असे कळविले आहे.

देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या गव्हाच्या भुश्यामुळे भांडार विभागात उंदीर व घुशी यांचा उपद्रव होऊ शकतो व त्यामुळे भांडार विभागात जमा असलेल्या इतर किराणा मालाचे नुकसान होऊ शकते.

तरी भांडार विभागात देणगी स्वरुपात प्राप्त झालेला व सध्या पडून असलेला २२०५ किलो गव्हाचा भुसा श्री साईशाम गोशाळा, शिर्डी यांना देणगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भांडार विभागामध्ये देणगी स्वरुपात प्राप्त झालेला २२०५ किलो गव्हाचा भुसा श्री साईशाम गोशाळा, शिर्डी यांना देणगी देणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.०५** **जादा वैद्यकिय बीलाच्या परताव्याबाबत.**

**प्रस्ताव-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु.१०,०००/- चे पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे. सदर बीलांची संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये तपासणी करुन त्यानूसार छाणणी केल्यानंतर देय होणाऱ्या बीलांची तपशीलवार माहिती खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेले आहे.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नाव | सेवा घेतलेल्या / रेफर केलेल्या रुग्णालयांचे नाव | रेफर केले होते / नाही | नियमावली तील हॉस्पिटल आहे / नाही | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परिशिष्ट अ | | संस्थान नियमावलीतील हॉस्पिटल | | | | | | | | |
| १ | सोमण प्रणाली पी<br>विभाग - साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा - परिचारीका | स्वत: | Lt C6/7 PIVI | डॉ. मोदगी | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ११८८२.०० | ११४५३.०० | |
| २ | गुंजाळ संतोष शिवाजी<br>विभाग - प्रसादालय<br>हुद्दा - जोडारी | आई | Basal growth harmone | डॉ मोदगी | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | १५०००.०० | १५०००.०० | |
| ३ | तांबे मुकुंद भाऊसाहेब<br>विभाग - साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - ई.सी.जी टेक्निशियन | वडील | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ९७३.०० | ९७३.०० | |
| ४ | मखाना रंजना प्रकाश<br>विभाग - साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा - आया | पती | AV Fistula Lt wrist | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ९५०.०० | ९५०.०० | |
| ५ | डॉ. बागडीया शितल ओमप्रकाश<br>विभाग - साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा - आर.एम.ओ | वडील | मधुमेह | डॉ शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ३४७२.०० | ३४७२.०० | |
| ६ | जाधव ज्योतीलाल भिका<br>विभाग - साईआश्रम<br>हुद्दा - स्टोअर कीपर | स्वत: | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ८७०.०० | ८७०.०० | |
| ७ | कुलकर्णी माधुरी मोहन<br>विभाग - साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - आया | पती | मधुमेह | डॉ पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | नाही | आहे | १२६१.०० | १२६१.०० | |
| ८ | बंदावने सुभाष मल्हारी<br>विभाग - ध्वनीक्षेपन<br>हुद्दा - सि.पर्यवेक्षक | मुलगा | Prostatic gland | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ३१८७.०० | ३१८७.०० | |
| ९ | डॉ. कांबळे दादासाहेब लुमा<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - त्वचा रोग तज्ञ | पत्नी | मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ७०९४८.०० | १४४६९.०० | |
| १० | नवले रविंद्र बाळासाहेब<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - एच.आर. मॅनेजर | स्वत: | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | २६७.०० | २६७.०० | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नाव | सेवा घेतलेल्या / रेफर केलेल्या रुग्णालयांचे नाव | रेफर केले होते / नाही | नियमावली तील हॉस्पिटल आहे / नाही | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | चौधरी श्रावण माधव<br>विभाग - अभिलेख कक्ष<br>हुद्दा - प्र.अधिक्षक | स्वत:<br>पत्नी | मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | १३३९१.०० | ११५६५.०० | |
| १२ | नरोडे संगिता प्रकाश<br>विभाग - साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | स्वत:<br>पती<br>सासरे | मधुमेह | डॉ. शर्मा / डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | १६७२.०० | १६७२.०० | |
| १३ | लुटे चंद्रकांत धोंडीराम<br>वि भाग - रक्तपेढी<br>हुद्दा - तंत्रज्ञ | वडील<br>आई | मधुमेह व मेंदुविकार | डॉ. मुंदडा / डॉ. टिंगरे / डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा रुग्णालय | नाही | आहे | ४४२३.०० | ४४२३.०० | |
| १४ | यादव रावसाहेब नानासाहेब<br>विभाग- पाणी पुरवठा<br>हुद्दा - मदतनीस | वडील | Chronic kidney disease | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल व आनंद ऋषीजी हॉस्पिटल, अ.नगर | आहे | आहे | ३४५३७.०० | ३४५१३.०० | |
| १५ | बकरे सतीष गंगाधर<br>विभाग - बांधकाम<br>हुद्दा - वरिष्ठ लिपीक | पत्नी | Polyarthritis | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही. | आहे | ५२५८.०० | ५२५८.०० | |
| १६ | धनवटे विजय दामोदर<br>विभाग - आरोग्य<br>हुद्दा - स्वच्छता कर्मचारी | आई | L Ca breast with THD with DM | डॉ. गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | नाही | आहे | ११३४.०० | ११३४.०० | |
| १७ | कराडे वैशाली मिलींद<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - सि. इन्चार्ज | स्वत: | R Thalamic SOL for ST Bx | डॉ. मोदगी | रुबी हॉल क्लीनिक, पुणे | आहे | आहे | २६१५९.०० | २६१५९.०० | |
| १८ | लंके साहेबराव पांडुरंग<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - वित्त व्यवस्थापक | आई | Lung Cancer | डॉ. मेहेरोत्रा | रुबी हॉल क्लीनिक, पुणे | आहे | आहे | ७८४१७.०० | ७७६३७.०० | |
| | | | | | | | एकूण रक्कम रु. | २७३८०१.०० | २१४२६३.०० | |
| **परिशिष्ट ब** | | **संस्थानचे मान्य यादीत नसलेले हॉस्पिटल** | | | | | | | | |
| १. | डॉ. शर्मा गगन सुरिंदर<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - फिजीशियन | वडील | Diabetic Foot Surgery | डॉ. दिनेश जैन | Dayanand Medical College & Hospital Ludhiana. | नाही | नाही | २९६१६.०० | २२७४९.०० | |
| २. | तांबे सुनिल सखाराम<br>विभाग - आय.टी.आय<br>हुद्दा - निदेशक | वडील | Transient ischaemic attack with right sided hemiposesis | डॉ. कुद्रीमोती | कुद्रीमोती हॉस्पिटल, महाड | नाही | नाही | ८७६०.०० | ५७९२.०० | |
| ३. | डॉ. मोदगी राहुल प्रकाश<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - न्युरो सर्जन | स्वत: | L.L. Varicose veins | डॉ. गोरे | जॉय हॉस्पिटल, मुंबई | आहे | नाही | ३८१३७.०० | २८८३२.०० | |
| ४ | लंके साहेबराव पांडुरंग<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल | आई | Lung Cancer | डॉ. मेहेरोत्रा | सुविचार हॉस्पिटल, नाशिक | आहे | नाही | १३७७४.०० | ११०१९.०० | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नाव | सेवा घेतलेल्या / रेफर केलेल्या रुग्णालयांचे नाव | रेफर केले होते / नाही | नियमावली तील हॉस्पिटल आहे / नाही | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हुद्दा - वित्त व्यवस्थापक | | | | | | | | | |
| | | | | | | | एकूण रक्कम रु. | ९०२८७.०० | ६८३९२.०० | |
| | | | | | | | एकुण रक्कम अ + ब = रु. | ३६४०८८.०० | २८२६५५.०० | |

तरी उपरोक्तप्रमाणे परिशिष्ट अ व ब मधील बीलांबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या परिशिष्ट अ व ब प्रमाणे संस्थान कायम कर्मचाऱ्यांची देय असलेली रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०६ डॉ. मयुर विलास म्हात्रे, न्यूरो सर्जन यांचा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन या पदावर नेमणूक करणेबाबतचा दि. ०३/०४/२०१३ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ. मयुर विलास म्हात्रे यांनी दि. ०३/०४/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

I, Dr. Mayur Vilas Mhatre have completed Neurosurgery in June २०११ from MUHS Nashik, After completion of my degree I have worked in LTMMC, Bombay hospital and International Neurosciences Institute etc and presently in LTMMC Sion.

Sir, I have submitted my application for the post fo Neurosurgeon on २८th November २०१२ in Saibaba Hospital through proper channel.

Sir to notify you, one of my senior Dr. Rahul Modgi presently working as Neurosurgeon in the institute has resigned from the post probably in next week. Rajiv Gandhi Yojna is also available in hospital which would be beneficial for the patients. The patient load in increasing, I am eager to work sincerely for better patient care and management. Help me to apply my knowledge for my patients.

Sir, kindly permit me to work and forward my application.छ

डॉ. मयुर म्हात्रे यांची माहिती खालील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण नाव व पत्ता | : | डॉ. मयुर विलास म्हात्रे.<br>३ रा मजला, प्रियंका प्लाझा, सेक्टर-४,<br>संपदा, नवी मुंबई-४०० ७०५. |
| जन्मतारीख व वय | : | दि. ३०/०७/१९८१., वय-३१ वर्षे- ०८ महिने |
| शैक्षणिक पात्रता | : | एमबीबीएस- २००३.<br>एम.एस. (जनरल सर्जरी)-२००८<br>एम.सीएच. न्यूरोसर्जरी -२०११ |

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधात न्यूरो सर्जनची दोन पदे मंजूर असून सदर पदाची शैक्षणिक पात्रता १) Age not more than ४५ years; २) MCH / DNB from any Government recognized University, ३) Experience minimum २ years in similar capacity. अशी असून वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ६६०० मंजूर आहेत.

न्यूरो सर्जनचे पूर्वी रिक्त असलेले पद भरणेकामी दि.२६/०९/२०१२ रोजीचे पुण्यनगरी-पूणे, दि. २७/०९/२०१२ रोजीचे नवाकाळ-मुंबई, दि. २८/०९/२०१२ रोजीचे देशोन्नती-नागपूर या वर्तमान पत्रात व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार न्यूरोसर्जन या पदासाठी एकही अर्ज मुदतीत प्राप्त झालेला नसून मुदतीनंतर डॉ. मयुर विलास म्हात्रे यांचा अर्ज प्राप्त झालेला आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५८३ नुसार वैद्यकिय अधिक्षक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक व इतर वैद्यकिय अधिकारी यांची पदे भरणेकामी दि. २६/०९/२०१२ रोजीचे जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या पात्र अर्जदार उमेदवारांच्या मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार मुलाखती घेऊन निवड करणेच्या मंजूरीसाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये सादर करण्यात आलेला आहे.

न्यूरो सर्जनचे पदांवर डॉ. काशिनाथ नरसोबा टिंगरे व डॉ. राहुल प्रकाश मोदगी यांच्या नेमणूका करण्यात आल्या होत्या. डॉ. टिंगरे हे दि. ३१/०५/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त झालेले असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७२ नुसार त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे दि. ०१/०६/२०१२ पासून सहा महिने कालावधीसाठी रु. २४,०००/- मासिक मानधनावर न्यूरो सर्जन या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक देऊन त्यांना ओ पी डी व ऑपरेशन चार्जेस वर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह देण्यात येत आहे. त्यांची सदरची मुदत दि. ३०/११/२०१२ अखेर संपुष्टात आल्याने त्यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४४ नुसार पूर्वीच्याच अटी-शर्तीवर पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली असून सदर मुदत दि. ०८/०६/२०१३ अखेर पासून संपुष्टात येत आहे. तसेच डॉ. राहुल प्रकाश मोदगी यांचाही राजीनामा दि. १४/०४/२०१३ अखेरपासून मंजूर करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत असलेले रुग्ण येतात. श्री साईबाबा हॉस्पीटल हे नगर-मनमाड हायवेवर असून या हायवेवर अपघात होत असतात. अपघात झालेले बरेच रुग्ण श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दाखल होतात. अशा वेळी या रुग्णांवर उपचार करणेकामी ट्रॉमा युनिटमध्ये न्यूरो सर्जन या पदाचे वैद्यकिय अधिकाऱ्याची आवश्यकता असते.

डॉ. सुजय आर. विखे पाटील यांचा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन म्हणून मोफत व्हिजीट देणेस परवानगी मिळणेबाबतचा दि. २२/११/२०१२ रोजीचा विनंती अर्ज मा. त्रिसदस्सीय समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर अर्जावर चर्चा होऊन निर्णय क्र. २३ अन्वये डॉ सुजय आर. विखे पाटील यांना त्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे योग्य वेळी सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे. सदरचे निर्णयाबाबत डॉ. विखे यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

डॉ. मयुर विलास म्हात्रे यांनी उपरोक्त विषयांकित अर्जान्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन या पदावर काम करणेस संधी मिळावी, अशी विनंती केली आहे. डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची दि. ०५/०४/२०१३ रोजी प्र. वैद्यकिय संचालक यांनी मुलाखत घेतली असून त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. २४,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक व ओ पी डी, ऑपरेशन चार्जेस वर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह देणेबाबत चर्चा झाली असून ते डॉ. म्हात्रे यांनी मान्य केले आहे. डॉ. म्हात्रे यांनी नेमणूक झालेनंतर संस्थान निवासस्थान मिळणेबाबत विनंती केली आहे.

डॉ. मयुर म्हात्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. २४,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक व ओ पी डी, ऑपरेशन चार्जेस वर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह व निवासस्थान देता येईल, असे प्र. वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी, प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे उपरोक्त शिफारसीनुसार डॉ. मयुर विलास म्हात्रे यांचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन या पदावर काम करणेस संधी मिळणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. मयुर विलास म्हात्रे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. २४,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक देणेत यावी. तसेच ओ पी डी, ऑपरेशन चार्जेस वर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह व निवासस्थान देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचलाक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T ओ.पी.डी करिता Light Source with Head Light & Cable खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T ओ.पी.डी विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी Light Source with Head Light & Cable ची आवश्यकता आहे कारण सध्या त्यांच्याकडे असलेले Light Source with Head Light & Cable हा सन २००६ मध्ये रक्कम रु. ६६७९७/- इतक्या रुपयात खरेदी करण्यात आलेला होता. सदर Light Source with Head Light & Cable हा आता वापरुन खराब झालेला असल्यामुळे त्यांनी दि.१७/०५/२०१२ रोजीचे मागणीपत्रान्वये ०२ नग Light Source with Head Light & Cable ची मागणी केलेली आहे.

सदर Light Source with Head Light & Cable खरेदीकामी M/s. Kalelker Surgicals Pvt Ltd., Mumbai यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी इकडील पत्र क्र.४२२६ दि.२६/११/२०१२ रोजी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Kalelker Surgicals Pvt Ltd., Mumbai

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यांनी त्यांचे पत्र क्र. KSPL/MM/PI/३३६/१२-१३ दि.२८/११/२०१२ चे पत्रान्वये सदर Light Source with Head Light & Cable चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | LED Fiber optic, Headlight | 2 | 7115.00 | 14230.00 |
| 2. | Fiber Optic Cable for above Head Light Compatible with 250 watt Light Source | 2 | 8800.00 | 17600.00 |
| 3. | Light Source with 250 watt with halogen lamps | 2 | 19150.00 | 38300.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | 70130.00 |

उपरोक्त ०२ नग Light Source with Head Light & Cable खरेदीकामी अंदाजे रु.७०१३०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा ०२ नग Light Source with Head Light & Cable विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.७०१३०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T ओ.पी.डी. विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी आवश्यक असलेले ०२ नग Light Source with Head Light & Cable विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.७०१३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचलाक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **श्री साईचरित्र - तेलगू जादा पाने छपाई कामाची रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम १७ (ठ) मध्ये च्श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील, अशी तरतूद आहे.

या तरतूदीनुसार श्री साईचरित्र- तेलगू पुस्तकाची छपाई करुन माफक दरात विक्री केली जाते. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.१२.२०१२ निर्णय क्र.१०१० नुसार मागील वर्षीचे छपाई दराने जे प्रेसधारक प्रस्तावित छपाई करुन देण्यास तयार असतील त्यांचेकडून छपाई करुन घ्यावी असा निर्णय झाला आहे. त्यानुसार मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि.,सोलापूर यांना मागिल मंजूर दर रु.३७.३७ पैसे, प्रती नग याप्रमाणे ४५००० नग श्री साईचरित्र तेलगू पुस्तके छपाईचा कार्यादेश दिलेला आहे. मागील छपाईचे वेळी वृद्धभक्तांना पुस्तक वाचन सुलभ व्हावे म्हणून छपाईचा फॉन्ट वाढविणेबाबत व त्यामुळे कार्यादेशात उल्लेखीत ३७६ पृष्ठांऐवजी २६ जादा पाने जादा छपाई झाली त्यांची वाढीव पानांचा प्रती पुस्तक रु.२.१५ प्रमाणे १,००,००० प्रतींचा जादा खर्च रु.२,१५,०००/- मात्र त्यांना आदा करणेस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.८२८ ने मान्यता होती. आताही मागील मंजूर दरानेच छपाई करुन घेतली आहे.

सबब त्यांनी दि.०५.०४.२०१३ चे पत्राने मागणी केलेनुसार ४५००० नगांची रु.२.१५ पैसे दराने वाढीव पानांचा छपाई खर्चाची रक्कम रु.९६,७५०/- मात्र आदा करावी लागेल.

मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि.,सोलापूर यांना रु.९६,७५०/- आदा करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तेलगू भाषेतील श्री साईचरित्र पुस्तकाची जादा पाने छपाईकामी होणारी रु.९६,७५०/- मात्र रक्कम मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि., सोलापूर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **संस्थान निर्मित ऑडीओ सीडीची पुनरनिर्मिती कामाचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे.सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती/ अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो/ छपाई करणे, संस्थान प्रकाशित सी.डी. निर्मिती करणे व विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं. १७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पद्धत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावे व त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत. असे ठरले आहे.संस्थान निर्मित खालील ऑडीओ सीडीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.०९.०४.२०१३ चे पत्रातील दराने प्रस्तावित परिमाणाचे पुनर्निर्मिती खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साईज, व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी-. एमपीथ्री | ६०४३ | ५ | १५,००० नग | १८.२७ | २७४०५०.०० | ३०.०० |
| ०२ | श्री साई चरित्र, तेलगु एमपी थ्री (दोन सीडीचा संच) | २८६३ | ४ | १०,००० संच | ५७.४५ | ५७४५००.०० | ८०.०० |
| | | | | | एकूण रु. | ८,४८,५५०.०० | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ऑडीओ सीडी यांची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.८,४८,५५०/- (अक्षरी रुपये - आठ लाख, अठ्ठेचाळीस हजार, पाचशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. कंपनीचे शर्ती अटीनुसार कंपनीस अग्रीम रक्कम द्यावी लागते.

सबब M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावित काम करुन घेणेस त्याकामी येणारे ८,४८,५५०/- मात्रचे खर्चास तसेच M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांना रुपये ८,४८,५५०/- मात्र अग्रीम देणेस मंजुरीसाठी सादर.

**निर्णय क्र.४२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान निर्मित ऑडीओ सीडीची पुनरनिर्मिती करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.८,४८,५५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू रक्कम M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांना आगाऊ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **द्वारकामाई धुनीकरीता जादा गोवरी खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींची पवित्र उदी तयार करणेसाठी गोवरी खरेदीकामी दि.०६/०४/२०१२ रोजीच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेमधील निर्णय क्र.२७७ अन्वये श्री.विजय पितांबर देवरे मालेगाव (कॅम्प) जि.नाशिक यांचा राणशेणी गोवरी रुपये ०६.०० पैसे प्रति किलो व थापील गोवरी रुपये ०६.०० पैसे प्रति किलो निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले आहे. त्यानुसार जा.क्र.एसएसएस/ मंदिर/ १११०/२०१२ दि.१२.०६.२०१२ अन्वये श्री विजय पितांतबर देवरे, श्रीसाईबाबा गोवरी विक्री केंद्र, मालेगाव यांना माहे-एप्रिल,२०१२ ते मार्च २०१३ अखेर मंजूर दर रुपये ०६.०० प्रति किलोस याप्रमाणे राणशेणी गोवरी १,००,००० किलो व प्लास्टिक कागदावर थापलेली व वाळविलेली गोवरी मंजूर दर रुपये ०६.०० प्रति किलोस याप्रमाणे २५,००० किलो पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कार्यादेशाप्रमाणे श्री.विजय पितांबर देवरे यांनी गोवरी पुरवठा केलेला आहे. सदरचा पुरवठा माहे जानेवारी २०१३ पर्यंत पूर्ण झालेला आहे.

सन २०१३-१४ करीता गोवरी खरेदी करणेकामी कोटेशन्सवर निर्णय होणेबाबत विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेकरीता पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार नवीन वर्षाची कार्यवाही होणे बाकी आहे. गोवरी खरेदीकामी सन २०१२-१३ या अर्थिक वर्षाकरीता अंदाजपत्रकात रक्क्कम रुपये १०,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली होती. त्यापैकी माहे फेब्रुवारी अखेर रक्कम रुपये ७,५०,०६०/- खर्च झालेली असून रक्कम रुपये २,४९,९४०/- शिल्लक आहेत.

गोवरी पुरवठयाचा कालावधी साधारणतः माहे डिसेंबर ते मे असा आहे. उर्वरित कालावधीत पाऊस पडत असल्याने गोवरी पुरवठादार गोवरीचा पुरवठा करण्यास असमर्थ असतात. आता माहे मार्च ते मे महिन्यापर्यंत गोवरी पुरवठादाराकडून गोवरीचा पुरवठा होऊ शकतो. मात्र सन २०१३-१४ ची गोवरी खरेदीची प्रक्रिया पूर्ण होणेसाठी वेळ लागणार आहे. सबब सन २०१२-१३ या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात रक्कम रुपये २,४९,९४०/- शिल्लक असल्याने सदर रकमेतून सुमारे ४१,०००किलो गोवरी पूर्वीच्या दरात खरेदी होऊ शकते.

सध्याचे गोवरी पुरवठादार श्री.विजय पितांबर देवरे यांनी दि.२६.०१.२०१३ रोजीचे अर्जाद्वारे नवीन टेंडर निघेपर्यंत मागील वर्षीच्या मंजूर दराप्रमाणेच (रुपये ०६.०० पैसे प्रति किलोस) याप्रमाणे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



गोवरी पुरवठा करणेस तयार असलेबाबतचा अर्ज दिलेला आहे. (१ लाख २५ हजार किलो पेक्षा जास्त गोवरी खरेदीकामी दिनांक २८.०२.२०१३ रोजीच्या प्रस्तावाने मान्यता घेण्यात आलेली असून गोवरी खरेदी चालू केलेली आहे.

तरी नवीन टेंडरबाबत निर्णय होईपर्यंत श्री.विजय पितांबर देवरे, श्रीसाईबाबा गोवरी विक्री केंद्र, मालेगांव यांचेकडून मागील वर्षीच्या मंजूर दराप्रमाणे मंजूर बजेट रकमेतील उर्वरित रक्कमेपैकी ४१,००० किलो गोवरी पैकी खरेदी केलेल्या ३०,९८५ किलो गोवरीची रक्कम रु.१,८५,९१०/-चे बील आदा करणेस मान्यता असावी. व तसेच ४१,००० किलो गोवरीपैकी उर्वरीत १०,०१५ किलो गोवरीचे खरेदीस व त्याकामी लागणाऱ्या खर्च रक्कम रु.६०,०९०/- चे खरेदीचे बील आदा करण्याचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ आणि नियम २०११ नुसार अन्नपदार्थाची क्वालीटी कंट्रोल व पृथ्यकरणासाठी श्री साईप्रसादालय येथे प्रयोगशाळा उभारणीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.१०.२०१२ मधील निर्णय क्र.८३० नुसार संस्थानचे श्री साई प्रसादालयामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा उभारणी करणेकामी इतर ठिकाणच्या प्रयोगशाळांची समक्ष पहाणी करणेत यावी. याकामी कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा सल्ला घेण्यात यावा व संस्थानने फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्डस अॅक्ट २००६, रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११ ची अंमलबजावणी, मार्गदर्शन, कर्मचारी प्रशिक्षण परवाना घेणे व नुतनीकरण करणे इत्यादीकामी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेले ॲड.श्री पी.बी.सोबले, पुणे यांचे मार्गदर्शनाने या अगोदर झालेल्या निर्णयाप्रमाणे अद्ययावत प्रयोगशाळेची उभारणी करणेत यावी, याकामी BSc with Chemistry पात्रताधारक दोन तांत्रिक कर्मचारी संस्थान कर्मचाऱ्यांमधून विभागांतर्गत बदलीने पुरविणेत यावे असे ठरलेले आहे. त्यानुसार एक कर्मचारी भांडार विभागास व दोन कर्मचारी प्रसादालयात विभागास देणेत आलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे मा.अधिष्ठाता, राहुरी महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट दिली असता, विद्यापीठाकडे अन्न व औषध प्रशासन, भेसळ प्रतिबंधक प्रयोगशाळा नसल्याने माहिती देण्यास असमर्थता दर्शविलेली होती. त्यानंतर सीएफटीआरआय, मुंबई यांना ई-मेल पाठवून प्रयोगशाळेबाबत माहिती घेणेसाठी विचारणा केली असता, त्यांनी १ मार्च २०१३ रोजी मुंबई येथे कार्यालयात समक्ष येऊन चर्चा करावी असे कळविले. त्यानुसार प्रसादालयातील २ व भांडार मधील १ अशा एकुण ३ कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील सीएफटीआरआय येथे समक्ष भेट देऊन श्री प्रकाश बडगुजर, शास्त्रज्ञ यांचेशी चर्चा करुन त्यांना भांडार व प्रसादालय येथील किराणा मालाची माहिती दिली तसेच संस्थानचे प्रयोगशाळेकरीता आवश्यक असणारी जागा, साहित्य, केमिकल्स तसेच प्रसादलाडू आदीबाबत माहीती विचारली असता, आम्ही बेंगलोर कार्यालयास माहिती देऊन आपल्या कार्यालयास प्रयोगशाळेबाबत सविस्तर कळविणेत येईल असे सांगितले.

**(अ)** त्यानुसार दि.०२.०४.२०१३ रोजी सी एफ टी आर आय, बेंगलोर यांचा ई-मेल प्राप्त झालेला असून त्यामध्ये किराणा मालाचे फिजीकल, केमिकल व मायक्रोबॉयलॉजी ॲनालिसीस बाबत क्वॉलिटी कंट्रोल प्रयोगशाळेचा प्रोजेक्ट देण्यात येईल. तसेच प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारी जागा, ले-आऊट, गुणवत्तेचे वर्गीकरण व पद्धती, प्रयोगशाळेसाठी लागणारे साहित्य, त्याची किंमत व पुरवठा करणारे पुरवठाधारकाचे पत्ते, केमिकल्सची यादी, आवश्यक असलेले ॲनालिस्ट व त्यांची पात्रता तसेच ४ ते ६ व्यक्तींना दोन आठवडयाचे मालासंबंधी तपासणीचे प्रशिक्षण देणार आहेत. या सर्व प्रोजेक्टसाठी अंदाजे रु.११,००,०००/- अधिक १२.३६% सर्व्हीस टॅक्स असा एकुण रु.१२,३५,९६०/- खर्च सांगितलेला आहे. सदरील रकमेचा आगाऊ डिमांड ड्राफ्ट दिलेनंतर ते ५ महिन्यात उपरोक्त बाबी करणार आहेत.

**(ब)** याबाबत संस्थानने फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्डस अॅक्ट २००६, रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११ ची अंमलबजावणी, मार्गदर्शन, कर्मचारी प्रशिक्षण परवाना घेणे व नुतनीकरण करणे इत्यादीकामी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेले ॲड.श्री पी.बी.सोबले, पुणे यांना ई-मेल पाठवून अभिप्राय घेतला असता, दररोज तपासणेत येणाऱ्या नमुन्यावर प्रयोगशाळेची जागा अवलंबून असून सीएफटीआरआयने मागणी केलेल्या रकमेपेक्षा कमी दरात पुणे येथून आम्ही प्रयोगशाळा करुन देऊ असे त्यांनी सांगितले आहे. त्यानुसार एन ए बी एल ची मान्यताप्राप्त असलेली प्रयोगशाळा फुड हायजीन व हेल्थ लॅबोरेटरी, पुणे यांचे दरपत्रक ॲड.पी बी सोबले यांनी ई-मेलद्वारे पाठविलेले आहे. दरपत्रकात जागा, प्रयोगशाळा ले-आऊट, तपसणीचे पद्धती, साहित्याचे पुरवठाधारक तसेच प्रशिक्षणाबाबत माहिती देणार असल्याचे नमुद केलेले

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आहे. या सर्व बाबींकरीता त्यांना रु.३ लाख ४० हजार (व्हॅट व सव्हिर्स टक्स सह) खर्च सांगितलेला आहे. त्यापैकी ७०% पेमेंट हे आदेशासोबत व उर्वरीत ३०% पेमेंट काम पुर्ण झालेनंतर दयावयाचे आहे.

सीएफटीआरआयची प्रयोगशाळा ही बेंगलोर येथे असून त्यासाठी त्यांनी रु.१२,३५,९६०/- खर्च सांगितलेला आहे व फुड हायजीन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी ही पुणे येथील एनएबीएल मान्यता प्राप्त असून त्यांनी रु.३,४०,०००/- खर्च सांगितलेला आहे. संस्थानने फुड ॲण्ड सेप्टी ॲक्ट साठी नेमलेले सल्लागार ॲड.पी.बी.सोबले यांची फुड हायजीन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे यांना शिफारस आहे. तसेच त्यांनी खर्च कमी कळविलेला असल्याने सदरचे काम फुड हायजीन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे यांचेकडून करुन घेता येईल.

तरी प्रयोगशाळा उभारणीकरीता प्रयोगशाळा ले-आऊट बनविणे, तपसणीचे पद्धती, साहित्याचे पुरवठाधारक तसेच प्रयोगशाळेकरीता असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे इ. कामी वरीलप्रमाणे (ब) नुसार प्रशासकीय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ पाणी टंचाईमुळे प्रसाद भोजनासाठी एल डी फोम पत्रावळ खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग चार) मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीनुसार आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१-घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- दि.०७/०३/२०१३ निर्णय क्र.२६१

**प्रस्ताविक :** श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद देण्यासाठी स्टीलचे ताटाचा वापर केला जातो. परंतु सध्या तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याने थर्माकोल पत्रावळीचा वापर करणेत येत आहे. सन २०१२-१३ मध्ये एल डी फोम पत्रावळीसाठी जा.क्र.३७३६ दिनांक १९/११/२०१३ अन्वये मे.देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांना रु.१३५०/- प्रती हजारी दराने खरेदी विभागामार्फत वार्षिक पुरवठा आदेश देणेत आलेला असून आवश्यकतेनुसार त्यांचेकडून पत्रावळी खरेदी केलेली आहे.

प्रसादालयात सध्या ४० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. प्रसादालय विभागाने यापूर्वी खरेदी विभागास माहे मार्च २०१३ ते मे २०१३ अखेर या ०३ महिन्यासाठी अंदाजे ३६ लाख नग पत्रावळी खरेदी करणेची मागणी केलेली होती. सदरील विषयावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१३ चे सभेत चर्चा होऊन, तातडीची गरज म्हणून श्री साईप्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी एक महिन्याच्या कालावधीकरीता १५ लाख नग एल डी फोम पत्रावळी मे. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर यांचेकडून वार्षिक मंजूर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.२०,२५,०००/- मात्रचे खर्चास निर्णय क्र.२६१ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार खरेदी करणेत आलेली पत्रावळी संपलेली आहे.

**मागणी-** प्रसादालयातील पाणी टंचाई विचारात घेता व मे महिन्यातील सुटयांचा विचार करता श्री साईभक्तांची गर्दी वाढू शकते. त्याकरीता माहे मे महिन्यासाठी १५ लाख नग एल डी फोम पत्रावळीची आवश्यकता भासेल. त्यासाठी अंदाजे रु.२०,२५,०००/- खर्च येईल. सदरील खरेदी ही खरेदी विभागामार्फत करणेत येईल.

संस्थान अधिनियम/ठराव : आर्थिक विषय-

**अभिप्राय-** पाणीटंचाईमुळे पत्रावळी खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी १५ लाख नग एल डी फोम पत्रावळी खरेदी विभागामार्फत खरेदी करता येईल.

तरी चालू वर्षाची पाणी टंचाई विचारात घेता व प्रसादालयात साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी १५ लाख नग एल डी फोम पत्रावळी खरेदी करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सध्याची पाणी टंचाई लक्षात घेता, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग / अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री. के. व्ही. रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे पत्र.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** जनसंपर्क विभागाच्या दिनांक १९.०४.२०१३ चे मंजूर टिपणीत श्री.मोहन यादव यांनी, "श्री.के.व्ही.रमणी हे एक जुने साईभक्त आहेत. सन २००५ मध्ये ते शिर्डीला आले असता दर्शन/आरतीनंतर मी त्यांना संस्थानची निवासव्यवस्था बघावी अशी विनंती केली. त्यांनी ती विनंती मान्य केली. त्यानंतर मी त्यांना संस्थानच्या धर्मशाळा-२०० रुम (आजचे श्री साईनाथ रुग्णालय) व साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम) येथे घेऊन गेलो. २०० रुम येथे त्यावेळी निवासासाठी साईभक्तांची मोठी गर्दी होती. त्यानंतर आम्ही साईबाबा भक्तनिवासस्थान येथेही गेलो. तेथेही खोलीच्या प्रतिक्षेत अनेक भक्त उभे होते. त्यातील काही भक्तांना श्री.रमणी यांनी किती वेळापासून आपण रांगेत उभे आहात? असा प्रश्न केला असता अनेक भक्त ५-६ तासांपासून खोलीच्या प्रतिक्षेत होते. तर त्यातल्या काहींना त्याच दिवशी परतीची गाडी होती. प्रचंड गर्दीमुळे खोलीसाठी प्रतीक्षा करणारे ते भक्त पाहून त्यांचे मन हेलावून गेले. बाबांच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांची निवासव्यवस्थेची ती समस्या पाहून त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यावर मी म्हणालो भक्तांच्या निवास व्यवस्थेत वाढ होणे आवश्यक आहे. ते म्हणाले संस्थानने जर मला जागा उपलब्ध करून दिली तर भक्तांच्या निवासाचा प्रकल्प येथे मी उभारु शकेन. त्यानंतर संस्थानचे तत्कालिन अध्यक्ष मा.श्री जयंत ससाणे यांच्याशी त्यांचा संपर्क मी करवून दिला.

तद्नंतर तत्कालीन अध्यक्ष श्री. जयंत मु. ससाणे यांच्या अध्यक्षतेखालील संस्थान व्यवस्थापनाने त्यांची विनंती मान्य करुन भक्तनिवास बांधण्यासाठी त्यांना जागा उपलब्ध करून दिली. काही वर्षातच बांधकाम होऊन आजचा साईआश्रम हा भव्य प्रकल्प पूर्ण झाला. सन २०१२ मध्ये साईबाबांच्या पुण्यतिथी उत्सवात या प्रकल्पाचे श्री. रमणी यांनी संस्थानकडे हस्तांतरण केले. त्यावेळी आनंदाने श्री. रमणी यांनी माझ्या नावे एक पत्र लिहिले, प्रत्यक्ष प्रकल्प सुरु न झाल्याने मी ते आपणास त्यावेळी सादर करु शकलो नाही. त्या पत्रात ते म्हणतात-

Dear Shri Mohanji,

We are glad to inform you that we have successfully completed SaiAshram Package 1 & Package 2 and handed over the same to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi on 24th October 2012, being the most auspicious day of Shri Shirdi Saibabas Mahasamadhi, Punya Tithi and Vijaya Dashami day.

On this special occasion, I fondly remember and recall that the idea of creating accommodation for devotees in Shirdi was seeded in my mind by you. I feel that this concept has been given as a command to me, by Shri Shirdi Saibaba through you.

I am extremely thankful to you for giving this idea and also for your valuable guidance and suggestions during the execution of the entire SaiAshram project. Kindly accept my most sincere thanks to you for assisting me at various stages from the concept to the commissioning of the SaiAshram project.

Best regards.

With blessings of Shri Shirdi Saibaba,

Yours Sincerely,
For, Shirdi Sai Trust,
K.V.Ramani
Founder & Managing Trustee

या प्रकल्पाचा शुंभारंभ राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब यांच्या हस्ते व राज्याचे कृषी व पणन मंत्री मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थानचे अध्यक्ष न्यायमूर्ती मा.श्री जंयत कुलकर्णी व मान्यवरांच्या उपस्थितीत गुढीपाडव्याच्या दिवशी गुरूवार दि.११ एप्रिल २०१३ रोजी झाला. त्यावेळीही आपल्या मंचिय मनोगतात श्री.रमणी यांनी पत्रातल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

या निमित्ताने मला नमुद करावेसे वाटते की, श्री.रमणी यांनी श्रींच्याचरणी ११० कोटी रुपयांच्या दानस्वरूपात साईआश्रम हा भव्य प्रकल्प संस्थानला उभारून दिला आहे. ही बाबांचीच इच्छा आहे. त्यांना ही प्रेरणा देण्यास बाबांनी मला निमित्तमात्र केले हे मी माझे भाग्य समजतो. श्री. रमणी हे दानशूर तर आहेतच परंतु त्याशिवाय ते एक उच्चविद्याविभुषित संगणकतज्ज्ञ आणि उद्योजकही आहेत. तेव्हा एवढ्या मोठ्या व्यक्तीने उदार अतःकरणाने लिखित स्वरुपात पत्र देऊन आपल्या भावना व्यक्त करुन माझ्यासारख्या सामान्य कर्मचाऱ्याचा सन्मान केला, हे मी माझे भाग्य समजतो. यातूनच प्रेरणा घेवून आजही दानशुर व्यक्तींना मी स्वतः संस्थानचे प्रसादालय, हॉस्पिटल हे उपक्रम वेळोवेळी दाखवत असतो. संस्थानच्या मोफत अन्नदान योजनेची माहिती दर्शनासाठी आलेल्या प्रत्येक दानशूर व्यक्तीस मी सांगत असतो. त्यातुनच मागिल वर्षी संस्थानच्या श्री साईप्रसादालयात सुमारे १८० दिवस मोफत अन्नदान दानशूर व्यक्तींच्या देणगीतून देण्यात संस्थानला यश मिळाले असून त्यातही खारीचा वाटा उचलण्याची संधी साईबाबांनी मला दिली आहे, असे मी समजतो" असे म्हटले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी उपरोक्त पत्र व श्री.रमणी यांनी आपल्या प्रकट मनोगतात श्री.यादव यांचा कृतज्ञता पूर्वक केलेला उल्लेख आणि जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करताना संस्थानच्या ऐतिहासीक देणगीला श्री.यादव यांचा लागलेला हातभार ही बाब भूषणावह अशी असल्याने श्री.के.व्ही. रमणी यांनी श्री.मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी यांना दिलेल्या पत्राचा समावेश श्री.मोहन यादव यांच्या संस्थान दप्तरी असलेल्या वैयक्तिक धारिणीत (personal file) करणेस सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

**श्री.मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी यांची संस्थान दप्तरी असलेल्या वैयक्तिक धरिणीत श्री. के. व्ही. रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे पत्राची नोंद घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग/ जनसंपर्क अधिकारी)

---

**दि.२७.०४.२०१३ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.क्र.एसएसएस/वशी-विधी /५/२०१३ दिनांक ०६.०४.२०१३ चे पत्रानुसार संस्थानने आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करावे किंवा कसे याबाबत माहिती मागविलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८(२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे.

तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरू करण्यात आलेली आहे.याबरोबरच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३-१४.०१.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक १७० अन्वये श्रींचे दर्शन व आरतीचे पेड पासेस दररोज चालू ठेवणेबाबत प्रशासनाने नियमावली तयार करावी असा ठराव झालेला आहे.

**शनिवार /रविवार सशुल्क दर्शन/आरती पासेस**

दि.१३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ अखेर सशुल्क **शनिवार/रविवार** दर्शन/आरती पासेसची माहिती.

| अ.न. | सशुल्क दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१३.०३.२०१० ते १०.०७.२०११ | ४१८२०४ | ५,८८,३०,४००/- | १३८ |

दि.११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ अखेर साईटेक प्रकल्पांतर्गत **शनिवार/रविवार** सशुल्क दर्शन/ आरती पासेसची माहिती.

| अ.न. | सशुल्क दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०२ | दि.११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ | ५२३८२० | ७,१४,८०,२००/- | १८४ |

उपरोक्त तक्त्यातील अनु.नं.१ व २ मधील माहितीनुसार दि. १३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ या कालावधीत एकूण ९४२०२४ (नऊ लाख बेचाळीस हजार चोविस मात्र) इतक्या भक्तांनी शनिवार/ रविवार या दिवशी सशुल्क दर्शन/आरती पासेसव्दारे साईदर्शन व आरतीचा लाभ घेतला. व त्यापासून संस्थानला एकूण ३२२ दिवसाला रक्कम रुपये १३,०३,१०,६००/- (अक्षरी रक्कम रूपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न मिळालेले आहे. तर प्रतिदिवसाकरीता ४,०४,६९१/- रुपये उत्पन्न मिळाले.

**ऑनलाईन दर्शन/आरती पासेस-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीने जगभरातील साईभक्तांना लवकरात लवकर साई दर्शन मिळावे म्हणून ऑनलाईन दर्शन/आरती पासेसची सुविधा सुरू केलेली आहे. दि. ११.०७.२०११ पासून हि सुविधा साईभक्तांसाठी खुली केली आहे.

दि. ११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ अखेर आठवड्यातील सर्व दिवस **ऑनलाईन दर्शन/ आरती** पासेसची माहिती.

| अ.न. | ऑनलाईन दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | सरासरी दिवस |
|---|---|---|---|---|
| ०३ | दि. ११.०७.२०११ ते १६.०४.२०१३ | ३८३३८४ | ९,३६,३९,४००/- | ६४५ |

उपरोक्त तक्त्यातील अनु.नं.३ मधील माहितीनुसारऑनलाईन दर्शन/आरती पासेसव्दारे ३८३३८४. (तीन लाख त्रेएंशी हजार तिनशे चौऱ्याएंशी) इतक्या भक्तांनी साईदर्शन व आरतीचा लाभ

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



घेतला. व त्यापासून संस्थानला ९,३६,३९,४००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ कोटी छत्तीस लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र ) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे.

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१,२ व ३ मधील दर्शविलेल्या माहितीनुसार शनिवार/रविवार सशुल्क व ऑनलाईन दर्शन/ आरती पासेसव्दारे रुपये २२,३९,५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये बावीस कोटी एकोणचाळीस लाख पन्नास हजार तिनशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे.

दिनांक १३.०३.२०१० ते १६.०४.२०१३ याकालावधीत आठवड्यातील फक्त शनिवार व रविवार या एकुण ३२२ दिवसासाठी एकुण रक्कम रुपये १३,०३,१०,६००/-(अक्षरी रक्कम रुपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे. प्रतिदिवसाकरिता ४,०४,६९१/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख चार हजार सहाशे एक्यान्नव मात्र) इतके उत्पन्न फक्त शनिवार व रविवार गर्दीच्या काळात मिळालेले आहे. परंतु आठवड्यातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/ आरती पासेस चालु केले तर अंदाजे प्रतिदिवसाला रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) तर वर्षाकाठी अंदाजे रुपये ११,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा कोटी मात्र) इतके उत्पन्न मिळू शकेल. परंतु सध्या महत्वाच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींना तसेच शिफारस पत्र धारकांनाच पासेस दिले जातात. हे पासेस सर्वांसाठी खुले केल्यास उत्पन्नाची मर्यादा वाढु शकेल.

याबरोबरच राज्यातील देवस्थानांच्या दर्शनव्यवस्थेबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाने दि. ०७.०९.२०१० रोजी पारीत केलेल्या आदेशाची माहीती खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचा क्रमांकः संकीर्ण - २०१०/३५/ (प्र.क्र.८५)/ का.सोळा, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०७.०९.२०१० रोजीचे आदेशाव्दारे उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

०१. देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमीत रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये.

०२. कोणत्याही देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये.

०३. प्रत्येक देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गर्दीचा दिवस कोणता आहे याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धर्मादाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील.

०४. कोणत्याही देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरीता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत.

०५. कोणत्याही देवस्थानामध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, जेणेकरुन सर्वसामान्य भाविकांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही. तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलिस यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य रांगेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महत्वाच्या दिवशी तसेच इतर दिवशीही रांगेचे सुयोग्य नियोजन करुन सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन घेण्याची व्यवस्था सर्व देवस्थान समित्यांनी करणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास त्याची शासनाकडून गंभीर दखल घेण्यात येईल व संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असा आहे.

वरील आदेशानुसार संस्थान आयोजित श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी या उत्सवांच्या काळात दर्शन/आरती पासेस बंद ठेवण्यात येतात.वर्षभरातील गर्दीच्या दिवशी ऑनलाईन दर्शन/ आरतीचे दिवस ही लॉक करण्यात आलेले असून गर्दीच्या काळात ऑनलाईन पासेस ही बंद ठेवण्यात येतात. मात्र पासेस बंदच्या कालावधीमध्ये मान्यवर मंत्री महोदय, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्य अतिथी व इतर महत्वाच्या व्यक्ती आदिंची दर्शन/आरती व्यवस्था करण्यात येते.

**<u>याबाबत खालील बाबी विचारात घ्याव्यात असे वाटते.</u>**

**अ)** जनसंपर्क विभागाद्वारें सध्या साईबाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या अंध, अपंग, वयस्कर व अत्यंत आजारी असणाऱ्या व्यक्तींना त्यांचे सोबत एक व्यक्ती देवून दर्शनाची व्यवस्था मोफत करण्यात येते. यासंदर्भात व्यवस्थापन समितीच्या दि.०५.१२.२०१० चे सभेतील विषय नं.२२ अन्वये निर्णय झालेला आहे.

**ब)** शिर्डीतील ग्रामस्थांची दर्शन/आरतीची व्यवस्थाही मोफत केली जाते.

**क)** जनसंपर्क विभागाव्दारे देण्यात येणारे पासेस सर्व दिवसांकरीता सशुल्क करताना खालील महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था मोफत व्हावी असे मत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. मा. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालायाचे सरन्यायाधिश, सर्वोच्च न्यायालायाचे सर्व न्यायाधीश, सर्व राज्यांचे मुख्य न्यायाधीश, मा. पंतप्रधान तसेच केद्रिय मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, देशाचे लष्कर प्रमुख व लष्कराच्या सर्व दलांचे प्रमुख, सर्व राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसेच महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील सर्व सदस्य.

०२. श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, विश्‍वस्त मंडळाचे सर्व सदस्य व त्यांचे कुटुंबीय.

०३. अहमदनगर जिल्हाचे जिल्हा न्यायाधीश, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, श्रीरामपूर प्रांतअधिकारी, राहाता तहसिलदार व त्यांचे कुटुंबीय.

०४. शिर्डी विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी व त्यांचे कुटुंबीय.

०५. श्री साईबाबा संस्थानला रु.२५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या (वस्तूरुप किंवा रोख स्वरुपातील) देणगीदार भक्तांना त्याच दिवसाकरीता दर्शन आरतीची व्यवस्था मोफत करण्यात यावी. तसेच देणगीचे स्वरुप पाहून व्यक्तींची संख्या निश्‍चित करावी.

०६. श्री साईबाबा संस्थानला मोठया स्वरुपात दान दिलेल्या दानशूर व्यक्ती.

०७. श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागाच्या दैनंदिन कामाकरीता येणाऱ्या व्यक्तीं तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व कलाकार.

०८. श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाकरीता राज्याच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातून पालखी घेऊन येणाऱ्या पदयात्रींची दर्शनाची व्यवस्था पालखी गेटने मोफत करण्यात यावी.

०९. देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे साधूसंत.

१०. श्रीसाईबाबा संस्थान सेवेतील व निवृत्त कर्मचारी.

११. दर गुरुवारी शिर्डी व पंचक्रोषीतून येणाऱ्या पदयांत्रींची निश्‍चित वेळ ठरवून त्या वेळेत मोफत व्यवस्था करण्यात यावी.

**ड)** सध्या जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणारे दर्शन आरती पासेस शिफारसपत्र पाहून वितरीत केले जातात. आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस सुरु करताना त्यावरील शिफारसपत्राच्या अटीसंदर्भात व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय होणे आवश्यक आहे असे वाटते. दुसरी महत्वाची बाब अशी आहे की आरतीसाठी असलेला कोटा मर्यादित आहे. त्यामुळे आरतीच्या पासेसची संख्या मर्यादितच ठेवावी लागेल असे वाटते.

सध्या ऑनलाईनवर प्रत्येक आरती करीता ३०० पासेस सर्वांकरीता खुले ठेवले असून जनसंपर्क कार्यालयाद्वारे ३०० पासेस शिफारसपत्रावर दिले जातात. जनसंपर्क कार्यालयाद्वारे दररोज सरासरी अडीच हजार भाविक दर्शनाच्या पासेसचा लाभ घेतात. ऑनलाईनवर साईभक्तांना हे पासेस सशुल्क खुले करण्यात आलेले आहेत.

तरी वरील बाबींवर व्यवस्थापन समितीच्या सभेत सांगोपांग चर्चा होवून निर्णय होण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास समितीने खालीलप्रमाणे घेतलेले निर्णय अंमलात आणता येतील.**

**(१) साईभक्तांसाठी आठवडयातील सर्व दिवस विना शिफारस देणगी दर्शन/आरती पासेस सुरु करणेत यावे.**

**(२) सर्व दिवस विना शिफारस देणगी दर्शन/ आरती सुविधा चालु झाल्यानंतर या प्रक्रियेमधून उपलब्ध होणाऱ्या निधीचा उपयोग साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व सध्या लाडू प्रसादाची विक्री करणेत येते त्याऐवजी समाधी मंदिरात दर्शन घेणाऱ्या प्रत्येक साईभक्तास एक लाडूप्रसाद पाकिट विनामुल्य देण्यासाठी करणेत यावा.**

**(३) शिर्डीतील ग्रामस्थ/ स्थानिक दर्शनासाठी येतात त्यांची ओळख पटणेकरिता त्यांचेकडील आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्राचा वापर करणेत यावा.**

**(४) श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांकडील हार, गुच्छ, नारळ, प्रसाद बंद करणेत यावे, जेणेकरुन मंदिरामध्ये साफसफाई करणेसाठी व भक्तांना दर्शनासाठी कमी वेळ लागेल आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षकांना गेटवर भक्तांना चेक करणे सोपे होईल व दक्षिणा पेटयांमधील गुप्तदानामध्ये वाढ होईल.**

**(५) प्रस्तावित दर्शन क्यु कॉम्प्लेक्स तयार झाल्यानंतर सदर योजना व्यवस्थित राबविता येईल, तोपर्यंत देणगी दर्शन/ आरती पास घेणाऱ्या साईभक्तांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था करणेत यावी.**

**तसेच, उपरोक्त प्रस्तावातील परिच्छेद अ, ब, क मधील नमुद केलेप्रमाणे व्हि.व्हि.आय.पी, व्हि.आय.पी., गावकरी कोण समजावे व देणगी दर्शन/ आरती पास वितरण करताना सवलत कोणास देण्यात यावी. यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुरुप कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१५** **साईभक्तांसाठी विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२-घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच २१ (१-घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-**

१)मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.१२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४६.

२)मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८३१.

**प्रस्ताविक :-** मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.१२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४६ नूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना झालेल्या आहेत.

"साईबाबा संस्थानचे अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत १२५ ते १५० दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे. याबाबीचा विचार करता संस्थानचे साई प्रसादालयात जनरल हॉलमध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देता येईल किंवा कसे? तसेच साई प्रसादालयाचे व्ही.आय.पी. कक्षामध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांसाठी प्रसादभोजनाचा दर रु.४०/- ऐवजी रु.५०/- करणे योग्य होईल किंवा कसे? याबाबत चर्चा झाली. हा निर्णय आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने या बाबत सर्व बाबींचा सर्वांगीण दृष्टया सांगोपांग विचार करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.२ ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.८३१ अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली मात्र याबाबत सर्व माहीती तपशीलासह सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करावा असे, ठरले.

संदर्भिय अ.नं.२ मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेतील विषय क्रं.३२ वरील निर्णय क्रमांक ८३१ नूसार सविस्तर प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

सन २०१२-२०१३ (एप्रिल २०१२ ते मार्च २०१३) मध्ये श्री साई प्रसादालयात १,३९,२५,३४१ साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला आहे. त्यामध्ये श्रींचे दर्शनासाठी आलेले भक्त, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण, ज्या गरीब व्यक्तींकडे प्रसादभोजनासाठी पैसे नाहीत असे गरीब गरजू व्यक्ती, परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर मतीमंद शाळेतील मुले, वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, वृध्दाश्रम यांचा समावेश आहे.

| **साईभक्त** | **व्ही.आय.पी कक्ष** | **रुग्णालयातील रुग्ण** | **मुकबधीर, मतिमंद, अंध, अपंग, वारकरी, व इतर** | **गरीब गरजू व्यक्ती** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १,२२,१८,५१७ | ८,९८,९८२ | ३,१३,४९३ | ३,००,८९६ | १,९३,४५३ | **१,३९,२५,३४१** |

सन २०१२-२०१३ मध्ये वार्षिक सरासरी नूसार प्रती ताटास रु.२०.२५ खर्च आलेला आहे. यामध्ये किराणा साहित्य खर्च, भाजीपाला, एल.पी.गॅस, कायम व कंत्राटी कर्मचारी वेतन खर्च, लाईट, पाणी इत्यादींच्या खर्चाचा समावेश केलेला आहे. त्यानूसार एकूण प्रसादभोजन घेणाऱ्या १,३९,२५,३४१ व्यक्तींसाठी सरासरी ताटाचे खर्चानूसार रु.२०.२५ = रु.२८,१९,८८,१५५/- इतका खर्च झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने सन २००७-२००८ पासून देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु झालेली आहे. सदर योजनेमध्ये सन २००७-२००८ पासून खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली आहे.

| | |
|---|---|
| सन २००७-२००८ | रु.२०,२९,६००/- |
| सन २००८-२००९ | रु.३१,९३,५१५/- |
| सन २००९-२०१० | रु.१,०२,३१,००४/- |
| सन २०१०-२०११ | रु.१,६०,४४,१९१/- |
| सन २०११-२०१२ | रु.३,२२,२०,१३५/- |
| सन २०१२-२०१३ | रु.४,३३,६१,३४४/- |

तसेच अन्नदान निधीमध्ये मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे रक्कम देणगी म्हणून जमा झालेली आहे. तसेच दरवर्षी अन्नदान फंडात खर्ची पडलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. खर्ची पडलेल्या रकमेमध्ये साईभक्तांना देण्यात येणारे प्रसादभोजन, अन्नपाकीटे, मोतीचूर लाडू, चहा, कॉफी, दुध, वगैरेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च, व भक्ताकडून घेत असलेली रक्कम यातील तफावतीची रक्कम खर्ची दाखविणेत येऊन राहिलेली रक्कम शिल्लक दाखविणेत येते. (उदा. प्रसादभोजनासाठी प्रत्यक्ष खर्च येतो रु.२०.२५ - भक्तांकडून घेतली जाते रु.१०/- तफावत रु.१०.२५/-)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| सन | जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|
| सन २००७-२००८ | रु.१४,६०,२६,१५६.८७ | रु. ३,४६,१३,२५२.२४ |
| सन २००८-२००९ | रु.१८,८७,२५,५७९.१८ | रु.६,७७,१९,५४८.०५ |
| सन २००९-२०१० | रु. २२,०९,०२,८०१.९२ | रु.१०,५५,३६,३७५.९३ |
| सन २०१०-२०११ | रु. २८,१२,६५,५४०.३३ | रु.११,८८,१९,७७४.५० |
| सन २०११-२०१२ | रु. ३२,०१,८०,३०७.६६ | रु.२०,५७,८०,०३८.३० |
| सन २०१२-२०१३ अंदाजे | रु. ३१,९१,७२,२५१.०० | रु. २४,०३,१३,०७४.०० |

सन २०१२-२०१३ मध्ये अन्नदान फंडात रक्कम रु.३१,९१,७२,२५१/- इतकी रक्कम जमा झालेली असून मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये रु.४,३३,६१,३४४/- जमा झालेली आहे. दोन्ही मिळून रु. ३६,२५,३३,५९५/- जमा झालेले आहेत.

| वर्ष | प्राप्त देणगी रु. पै. | वार्षिक खर्च रु. पै. | शिल्लक रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|
| २००६-२००७ | १०,२७,४६८९१.७० | १,००,३४,७५५.२४ | ४३,१३,०६,७९३.१५ |
| २००७-२००८ | १४,६०,२६,१५६.८७ | ३,४६,१३,२५२.२४ | ५४,२७,१९,६९७.७८ |
| २००८-२००९ | १८,८७,२५,५७९.१८ | ६,७७,१९,५४८.०५ | ६६,३७,२५,७२८.९१ |
| २००९-२०१० | २२,०९,०२,८०१.९२ | १०,५५,३६,३७५.९३ | ७७,९०,९२,१५४.९० |
| २०१०-२०११ | २८,१२,६५,५४०.०३ | ११,८८,१९,७७४.५९ | ९४,१५,३७,९२०.३४ |
| २०११-२०१२ | ३२,०१,८०,३६०.६६ | २०,५७,८०,०३८.३२ | ११३,९७,०८,३६२.३१ |
| २०१२-२०१३ | ३१,९१,७२,२५१.०० | २४,०३,१३,०७४.०० | १२१,८५,६७,५३९.३१ |

३१ मार्च २०१३ अखेर अन्नदान फंडामध्ये एकूण रक्कम **रु.१२१,८५,६७,५३९.३१** इतकी रक्कम शिल्लक आहे. अशाच प्रकारे अखर्चीत रकमेत वाढ होत राहील्यास भविष्यात आयकर भरावा लागणार आहे. साईभक्तांकडून अन्नदानकरीता जमा होणा-या देणगी रकमेवर आयकर भरण्या ऐवजी साईभक्तांना प्रसादभोजन मोफत देणे सुरु केल्यास धार्मिक तीर्थक्षेत्रात विनामुल्य प्रसादभोजन मिळाल्याचे साईभक्तांना समाधान मिळेल.

**सध्या साईभक्तांचे प्रसादभोजनात खालील पदार्थ देण्यात येतात.**

०१. चपाती/पुरी ०२. भात ०३. वरण (आमटी)
०४. कडधान्याची ऊसळ ०५. फळभाजी/पालेभाजी ०६. चटणी
०७. बर्फी (गोड पदार्थ)

वरीलप्रमाणे पदार्थामध्ये २ प्रकारच्या भाज्या देण्यात येत असल्यामुळे भाजीची आवड/निवड करण्यास संधी मिळते. त्यामुळे जी भाजी आवडत नाही ती भाजी ताटात शिल्लक ठेवली जाते. पर्यायाने ती भाजी वाया जाते. तसेच बरेच भक्त गोड खाण्याचे टाळतात. त्यामुळे बऱ्याच ताटामध्ये बर्फी शिल्लक राहीलेली आढळते. एकंदरीत अन्न वाया जाण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणे सुरु केल्यास खालीलप्रमाणे सुटसुटीत पदार्थ ठेवल्यास अन्न वाया जाण्याची समस्या दूर होईल असे वाटते. तसेच प्रसादभोजन, उत्पादन खर्च काही प्रमाणात कमी होईल.

०१. चपाती/पुरी ०२. भात ०३. वरण (आमटी)
०४. कडधान्याची ऊसळ ०५. चटणी

सध्या मोतीचूर लाडू, अन्नपाकीटे व चहा, कॉफी, दुध यांचा उत्पादन खर्च व भक्तांकडून घेण्यात येत असलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | उत्पादन खर्च सुमारे रक्कम रुपये | भक्तांकडून घेण्यात येणारी रक्कम रुपये | चॅरीटी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | मोतीचूर लाडू पाकीट (सुमारे ५० ग्रॅम वजनाचे ३ लाडू नग) | रु.१७.८५ पै. | १०/- | रु.७.८५ पै. |
| २) | अन्नपाकीटे (५ पुरी,ऊसळ,बर्फी वडी/शिरा) | रु.९.१८ पैसे | ०४/- | रु.५.१८ पैसे |
| ३) | चहा | रु.०३.१० पैसे | ०१/- | रु.२.१० पैसे |
| ४) | कॉफी | रु.०४.२४ पैसे. | रु.०१.५० पैसे | रु.२.७४ पैसे |
| ५) | दुध | रु.०३.३३ पैसे | रु.०१.५० पैसे | रु.१.८३ पैसे |

भविष्यात अन्नदान निधीमध्ये कमतरता भासल्यास मोतीचूर लाडू, अन्नपाकीटे व चहा, कॉफी, दुध यांची चॅरीटीची रक्कम कमी करण्याबाबत विचार करता येईल.

तसेच व्ही.आय.पी. कक्षामध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांसाठी प्रसादभोजनाचा दर रु.४०/- ऐवजी रु.५०/- करणेबाबत.

सध्या व्ही.आय.पी. भोजन कक्षामध्ये दर्रोज सरासरी २००० साईभक्त भोजन घेत असतात. व्ही.आय.पी. भोजन कक्षामधील प्रसादभोजनामध्ये खालीलप्रमाणे पदार्थ देण्यात येतात. काही प्रमाणात साईभक्त विचारतात की- जनरल हॉलमधील प्रसादभोजनात व व्ही.आय.पी भोजन कक्षातील भोजनात काहीच बदल नाही. काहीतरी बदल असायला हवा म्हणून खालीलप्रमाणे पदार्थ असावेत.

१) चपाती २) भात

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | |
|---|---|
| ३) वरण/आमटी | ४) कडधान्य ऊसळ |
| ५) फळभाजी/पालेभाजी | ६) दही |
| ७) पापड | ८) चटणी |
| ९) कांदा/टोमॅटो सलाड | १०) बर्फी |

व्ही.आय.पी. भोजनाचा दर प्रौढ व्यक्तीस रु.४०/- ऐवजी रु.५०/- व लहान मुलाचा दर रु.२० ऐवजी रु.२५/- करणे योग्य होईल. त्यामुळे वरीलप्रमाणे पदार्थ दिल्यास कुणासही तक्रार करणेस संधी रहाणार नाही असे वाटते.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-**

१) साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणे सुरु केल्यास अखर्चीत उत्पान्नाचा विनीयोग होईल तसेच संस्थान व साईभक्तांचे दृष्टीने ऐतिहासिक निर्णय म्हणून गणना होईल. मात्र सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने मुख्य लेखाधिकारी यांचे अभिप्रायानूसार प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर करता येईल.

२) महाराष्ट्र शासन पत्र क्र.सासवि २०११/५३८ प्र.क्र. ६९/पूर्वबांधगि-१२ का सोळा, विधी व न्याय विभाग मुंबई दि. २३/०१/२०१३ अन्वये पायाभूत/धोरणात्मक निर्णय घेणेपूर्वी त्यास व त्यावरील खर्चास शासन मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

३) मोफत प्रसादभोजन केल्यास भोजन घेणाऱ्यांचे संख्येत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे भोजन घेणारांचे संख्येत वाढ झाल्यास सध्या असलेली कर्मचारी संख्या, यंत्र सामुग्री अपुरी पडेल. त्यामुळे कर्मचारी संख्या (पर्यवेक्षक, लिपीक, मुकादम, आचारी, वाढपी) व यंत्र सामुग्री गर्दीचे प्रमाणात वाढवावी लागेल असे वाटते.

४) साईभक्त,परिसरातील नागरीक, स्थानिक नागरीक इत्यांदीचे गर्दीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढल्यामुळे प्रसादभोजनासाठी लागणाऱ्या किराणा माल साहित्यातही मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

५) सध्या असलेली किचन व्यवस्था ही सध्याचेच गर्दीचे प्रमाणात अपुरी पडत असल्याने मोफत प्रसादभोजन सुरु केल्यास वाढीव किचनसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

६) एल.पी. गॅस स्टोअरेज टँकची क्षमता वाढवावी लागेल.

७) गर्दीचे प्रमाणात पाण्याची साठवण क्षमता वाढवावी लागेल.

८) नव्याने सुरु करण्यात आलेल्या "साई आश्रम" या नुतन वास्तूमध्ये अंदाजे १०,००० साईभक्तांची रहाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे नविन भक्तनिवासस्थान व साईनाथ रुग्णालय येथे स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष येथे मोफत प्रसादभोजन सुरु केल्यास नविन भक्तनिवासस्थान व साईनाथ रुग्णालय स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष येथे दर्रोज सरासरी ९,००० ते १५,००० भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सदर ठिकाणी असलेली जागा, कर्मचारी व्यवस्था अपुरी पडेल.

**<u>मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.</u>**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील सुधारीत कलम २१ (१) घ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

घ) भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालवणे.

**२)** संस्थानचा प्रसादालय विभागावर सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात एकूण खर्च रु.५६.०० कोटी एवढा झालेला आहे. या खर्चा व्यतिरिक्त कायम कर्मचारी वेतनावर होणारा खर्च रु.५.०० कोटी एवढा आहे. तसेच मोफत अन्नदान म्हणून रु.१.१० कोटी एवढा खर्च झालेला असून, साधारणपणे प्रसादालयावर होणारा एकूण खर्च रु.६२.१७ कोटी एवढा आहे. त्यामुळे अन्नदान फंडात शिल्लक असलेल्या रु.११३ कोटी रुपयांमधून प्रायोगिक तत्वावर मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरुवात करता येईल.

**३)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० चे सभेतील निर्णय क्रं.३५८(२५) अन्वये शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत निर्णय झालेला आहे. दि.१३/०३/२०१० ते दि.१६/०४/२०१३ या तीन वर्षाच्या कालावधीत आठवडयातील फक्त शनिवार व रविवार या एकूण ३२२ दिवसासाठी एकूण रक्कम रुपये १३,०३,१०,३००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे. प्रतिदिवसाकरीता ४,०४,६९१/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख चार हजार सहाशे ऐक्यान्नव मात्र) इतके उत्पन्न फक्त

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



शनिवार व रविवार गर्दीच्या काळात मिळालेले आहे. परंतू आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/ आरती पासेस चालू केले तर अंदाजे प्रति दिवसाला रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) तर वर्षाकाठी अंदाजे रुपये ११,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये आकरा कोटी मात्र) इतके उत्पन्न मिळू शकेल. हे पासेस विनाशिफारस सर्वांसाठी खुले केल्यास उत्पन्न वाढू शकते.

४) प्रसादालयात दक्षिणा हुंडीची संख्या वाढविल्यास संस्थानच्या उत्पन्नात भर पडेल.

५) जर दर्‍रोज प्रसादभोजन मोफत केल्यास सध्याच्या मोफत प्रसादभोजन योजनेऐवजी ठराविक दिवशी वरीलप्रमाणे देणगी देणाऱ्या भक्तांचे नांव त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येईल.

तरी मोफत प्रसादभोजन सुरु करणे ही धोरणात्मक व खर्चीक बाब असल्याने सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा संस्थानचे अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत १२५ ते १५० दिवस दानशुर साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधून साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे व या योजनेला भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे साईभक्तांतर्फे भविष्यात जास्त दिवस मोफत प्रसादभोजन प्रसादालयामध्ये दिले जाईल, असे वाटते. एका दिवशी प्रसादालयामध्ये सरासरी ३०,००० साईभक्त प्रसाद भोजन घेतात, यावरुन उर्वरित २०० ते २४० दिवसही मोफत प्रसादभोजन दिल्यास प्रती साईभक्तांकडून रु.१०/- याप्रमाणे वार्षिक अंदाजे रु.६ ते ७ कोटी मात्र येणारा संस्थानचा निधी बंद होईल. सन- २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये साईभक्तांनी रु.१०/- प्रती व्यक्ती याप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेऊन रु.९.९६ कोटी मात्र जमा झालेले आहेत. हा निधी बंद होईल परंतु, या बंद होणाऱ्या निधीची भरपाई मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे व्ही.आय.पी. दर्शन पास ऑनलाईन दर्शन सुविधेसारखे विनाशिफारस सर्वांसाठी देणगी आकारुन सुरु केल्यास येणाऱ्या अपेक्षीत रु.११ कोटी मात्र रक्कमेमधुन करता येईल.**

**मोफत प्रसाद भोजन योजना सुरु केल्यास अधिनियमातील तरतुदींची अधिकाधिक उदिष्ठ पुर्ती होईल. प्रसादालयामध्ये दक्षिणा पेट्यांची संख्या वाढविल्यास संस्थानच्या उत्पादनात भर पडेल व दररोज प्रसाद भोजन मोफत केल्यास सध्याच्या मोफत प्रसादभोजन योजने ऐवजी ठराविक दिवशी मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या दानशुर भक्तांची नांवे त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येईल. यामधून अनेक साईभक्तांना प्रेरणा मिळेल. तसेच, व्हि.आय.पी. भोजनाचा दर आहे तोच ठेवण्यात येऊन यामधूनही काही प्रमाणात निधी संस्थानला मिळणार आहे. सर्व दिवस मोफत प्रसादभोजन दिल्यास भक्तांना समाधान मिळेल व भारतातच नाही तर संपुर्ण जगामध्ये साईबाबा संस्थानचा नावलौकीक होईल.**

**मोफत प्रसादभोजन दिल्यास रु.१०/- मात्र माफ होत आहेत म्हणून परिसरातील नागरीक प्रवास करुन अथवा प्रवासासाठी पैसे खर्च करुन मोफत प्रसाद भोजनासाठी प्रसादालयामध्ये येतील आणि गर्दी वाढेल व प्रसादालयाची क्षमता वाढवावी लागेल असे वाटत नाही. या मोफत भोजनाचा लाभ हा दुरवरुन बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांनाच होईल. यावरुन प्रसादालय विभागप्रमुख व मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अभिप्रायामध्ये तथ्य वाटत नाही.**

**तसेच, श्रींचे दर्शन घेऊन मंदिराचे बाहेर येताना प्रत्येक साईभक्तास बाबांचा प्रसाद म्हणून मोफत एक लाडूप्रसाद पाकिट, मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यास देण्याचा विचार आहे. यामुळे भक्तांना लाडूप्रसाद घेणेसाठी पुन्हा रांगेमध्ये उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांचा वेळही वाचेल आणि लाडू विक्री काऊंटर बंद करणेत येऊन तेथील कर्मचारी इतरत्र वापरता येतील.**

**साईभक्तांना विनामुल्य लाडूप्रसाद दिल्यास अंदाजे रु.१८ कोटी मात्र व विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास अंदाजे रु.९.९६ कोटी मात्र ही संस्थानला प्राप्त होणारी रक्कम बंद होऊन तो भार संस्थानला सहन करावा लागणार आहे. सदरहू बाब मेजर फायनान्शीयल असल्याने याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेणेसाठी, विनामुल्य प्रसादभोजन व विनामुल्य लाडूप्रसाद पाकिट दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च येईल याच्या आकडेवारीसह सविस्तर प्रस्ताव तयार करून तो पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ मुख्यलेखाधिकारी/ जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१६** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.४२९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**०१)** संस्थान ऑडीटरने सुचना केलेप्रमाणे बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा या विभागांसाठी घेण्यात येणाऱ्या वस्तुंसाठी व त्या वस्तुंची बीले तपासणीसाठी तीन इंजिनिअरची एक उपसमिती (Technical Evalution Committee) नेमण्यात यावी.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख/ पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ३४४ ते ४२९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी